# विकासकार्यात लॉटरीची भूमिका

आपल्याकडे लॉटरीवर बंदी आणली जावी म्हणून लोक गळे काढत असले तरी वस्तुस्थिती अशी आहे की आज आपल्याच देशातल्या तळागाळातल्या मुलांना शिकता येतंय ते कुणीतरी दूरस्थ नेदरलॅण्डमध्ये लॉटरी खेळतो म्हणून. कितीही अविश्वसनीय वाटलं तरी ते सत्यच आहे.

बंगलोर, कर्नाटकामध्ये काही नागरिकांनी लॉटरीच्या विरोधात सूर लावलेला असला तरीही कर्नाटकातल्या सरकारी प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना दुपारचं जेवणं मिळतंय ते पुन्हा काही नागरिकांनी लॉटरी खेळल्यामुळेच.

अर्ध जग ओलांडल्यावर पृथ्वीच्या आपल्या विरुद्ध बाजूला असलेल्या देशातल्या लॉटरीमुळे भारतीय मुलांचं शिक्षण होतं, हे कसं काय बुवा? नेदरलॅण्डची *नॅशनल पोस्टकोड लॉटरी* (एनपीएल) ही त्यांच्या एकूण उलाढालीच्या ६० टक्के रक्कम देणगी म्हणून देते. देणगी स्वरूपातली ही जगातली सर्वात मोठी रक्कम गणली जाते. गरिबीचं उच्चाटन, मानवाधिकार आणि निसर्ग संधारण या कार्यासाठी वाहून घेतलेल्या ४० डच तसेच जागतिक स्वयंसेवी संस्थांना या देणगीचा लाभ मिळतो. प्रथम ही भारतातील स्वयंसेवी संस्था त्या ४० संस्थांपैकीच एक आहे. २००१ साली एनपीएलने १७७ दशलक्ष युरो (२१३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) इतकी रक्कम विविध संस्थांना देणगीदाखल दिली. लाभार्थी संस्था होत्या नोविब, डब्ल्यू डब्ल्यू एफ फॉर नेचर, रेड क्रॉस, युनिसेफ, ग्रीनपीस, मेडिसिन्स सान्स फ्रण्टिअर्स आणि ॲम्नेस्टी इंटरनॅशनल.

*नोविब* ही १९५६ साली स्थापन झालेली संस्था असून ऑक्सफॅम इंटरनॅशनलची ती नेदरलॅण्ड शाखा म्हणून विकासकार्यासाठी ती योगदान करते. १९९९ साली नोविबने *प्रथम*शी हातमिळवणी केली आणि भारतातील प्रत्येक मुलाच्या शिक्षणासाठी झटण्यास सुरुवात केली. नेदरलॅण्ड लॉटरीकडून प्रतिवर्षी ३ कोटी रुपयांचं वित्तसहाय्य प्रथम-नोविबला भारतातील कार्यासाठी दिलं जातं. त्यातून मुंबई, गुजरात, राजस्थान, दिल्ली आणि बिहार इथल्या शिक्षण आणि विकास कार्याचा खर्च भागवला जातो. थोड्या आकडेवारीत डोकावल्यास लॉटरीतून येणाऱ्या पैशातून *प्रथम-नोविब*सारख्या संस्था किती काम करतात याचा सहज अंदाज येऊ शकतो.

त्यांच्या दिल्ली प्रकल्पात ६ ते ११ या वयोगटातील मुलांच्या शालेय शिक्षणासाठी काही ब्रिज कोर्सेस आहे, बालसखी प्रशिक्षण वर्ग हे गतिमंद मुलांसाठी आहेत तर बालवाडीचे वर्गही या स्वयंसेवी संस्थांकडून चालवले जातात. एकूण ७९ ब्रिज कोर्सेस सध्या दिल्लीत आहेत, ३४७ बालसखी वर्ग आणि ४६ बालवाड्यांतून सुमारे ९००० मुलांना फायदा

मिळतो आहे. राजस्थानमधल्या जयपूर शहरात ब्रिज कोर्सेसशिवाय ग्रामीण भागात जिथे शाळाच नाहीत, तिथे प्रथम एज्युकेशन सेंटर्स चालवली जातात. कम्युनिटी चिल्ड्रन्स सेंटर्समधून मुलांना औपचारिक आणि प्रात्यक्षिकांतून शिक्षण दिलं जातं. १५० ब्रिज कोर्सेस, ३२ प्रथम एज्युकेशन सेंटर्स आणि कम्युनिटी चिल्ड्रन्स सेंटर्समधून ९००० मुलं लाभ घेतात. बिहारमधल्या पटना शहरात १५०० मुलांना अशाच सेंटर्सकडून फायदा मिळतो. २००१च्या भूकंपानंतर प्रथम–नोविबने गुजरातमध्ये अशाच प्रकारचे कोर्सेस राबवले. त्याचा लाभ १६,००० विद्यार्थ्यांनी घेतला. मुंबईत संघटनात्मक कार्य इनोव्हेटिव्ह टीचिंग आणि लर्निंग मेथड्स तसेच रॅपिड मास ॲसेसमेण्ट तंत्र विकसित करण्यासाठी वापरलं गेलं. शाळेची पुनर्बांधणी, पायाभूत सुविधा यासाठीही संघटनांनी काम केलं. हे सगळं शक्य झालं कारण नेदरलॅण्डमधील नागरिकांनी लॉटरीचा सकारात्मक परिणाम ठाऊक होता.

आपल्याला अशा प्रकारचं विधायक कार्य करण्यासाठी इतर देशांकडून येणाऱ्या निधीवर अवलंबून का राहावं लागतं? लॉटरी निधीवर विशेषत्वेकरून, जेव्हा आपल्या देशाची लॉटरीच्या माध्यमातून २० हजार कोटी रुपयांचा महसूल उभा करण्याची ताकद आहे. हा उद्योग इतर कोणत्याही उद्योगाप्रमाणे काम करू शकतो तर तो बंद का करावा? त्यातल्या काही अनियमितता मान्य आहेत. पण कोणत्याही विकासकार्याच्या प्रकल्पाच्या त्रुटी या असतातच. जरी लॉटरी हा काही विकासात्मक प्रकल्प नसला तरीही तशा प्रकारचं योगदान देण्याची क्षमता त्यात नक्कीच आहे. आणि लॉटरीमुळे तर नक्कीच गावं उजाड होत नाहीत किंवा लोक विस्थापित होत नाहीत. काही व्यक्तींचे काही शे पैसे कदाचित तिकिटं खरेदी करण्यात जातील. कोणत्याही विकासात्मक प्रकल्पाचे नकारात्मक पैलू असतात. पण लॉटरीचे काही चेर्नोबिल किंवा भोपाळसारखे घातक परिणाम असणार नाहीत. (१९८६ साली सोविएत रशियाच्या चेर्नोबिल या ठिकाणी आण्विक ऊर्जा प्रकल्पात विस्फोट होऊन अनेक माणसं दगावली आणि २० मैल त्रिज्येच्या परिघात किरणोत्सर्गाचा प्रादुर्भाव झाला होता.)

इतर उद्योगांच्या तुलनेत लॉटरीचे परिणाम अगदीच दुर्लक्ष करण्यासारखे आहेत. लॉटरीच्या अंमलबजावणीत गुंतलेले काही लोक कदाचित गैरप्रकारांनी आपली तुंबडी भरत असतील. असे गैरप्रकार टाळण्यासाठी लॉटरीची पुनर्रचना करायला हवी आहे. त्यानंतर मग आपल्या मुलांच्या अभ्यासासाठी आपलाच पैसा खर्च होऊ शकेल, आणि कदाचित आपणही इतर विकसनशील देशांना मदत करू शकू.

सुनामीच्या तडाख्याने दक्षिण–पूर्व आशियातील अनेक देशांना हानी पोहचवली. श्रीलंका हा देशही त्यापैकीच एक. त्यांनी हे नुकसान भरून काढण्यासाठी तसेच पुनर्वसनाच्या कामासाठी लॉटरीचा वापर करण्याचं ठरवलं. श्रीलंकेच्या नॅशनल लॉटरी बोर्डतर्फे सराना

नॅशनल लॉटरी ही जानेवारी २००५मध्ये केवळ याच उद्देशाने सादर केली गेली. श्रीलंकेच्या स्वातंत्र्य दिनी सोडत झालेल्या या लॉटरीतून ३५ दशलक्ष रुपयांचा निधी उभा राहिला. युनायटेड किंगडमच्या गुड कॉज लॉटरीने सुनामीग्रस्त राष्ट्रांना १२ दशलक्ष स्टर्लिंग पाऊंडची मदत घोषित केली.

खरं तर युनायटेड नेशन्सच्या विकासात्मक प्रकल्पासाठी एका जागतिक लॉटरीचे आयोजन करण्याचे १९७० सालापासून घाटत आहे. प्रथम १९७२ साली *घाना* या देशाकडून हा प्रस्ताव सादर केला गेला होता. २००२ साली विकासात्मक कार्यासाठी वित्तपुरवठा या विषयावरच्या परिषदेत फिनलंडच्या अध्यक्षा तारजा हॅलोनन यांनीही त्यांच्या भाषणात जागतिक लॉटरीची आवश्यकता प्रतिपादन केली.

जगातल्या अनेक लॉटरींच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर ही कल्पना पुढे आली. आता लॉटरीकडे पाहण्याचा दूषित दृष्टिकोन बदलला असून लॉटरीला नवीन प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. १९७० सालापर्यंत लॉटरी ही विक्रेत्यांमधूनच पुढे चालक म्हणून विकसित झालेल्या व्यापाऱ्यांच्या नियंत्रणात होती. यातला मानवी सहभाग हा चुका आणि अनियमिततेतला कारणीभूत ठरत होता. मात्र आता संपूर्ण अंमलबजावणी ही अत्याधुनिक तंत्रज्ञानाने स्वयंचलित पद्धतीने होते. त्यामुळे लॉटरीची विश्वासार्हता आणि पारदर्शकता वाढली आहे. आजचे हे चालक प्रत्यक्षातले उद्योगक्षेत्रातले रथी-महारथी आहेत. ते या लॉटरी व्यावसायिकरित्या चालवतात. मार्केटिंगच्या यशस्वी धोरणांमुळे सुरुवातीला अनुत्सुक असलेला मध्यमवर्गही लॉटरी खेळू लागला आहे. सरकारनेही या तंत्रज्ञानाचा, लोकांच्या मानसिकतेचा योग्य लाभ घेण्याची हीच वेळ आहे. जेणेकरून लॉटरीच्या व्यापारातून मोठा निधी उपलब्ध होऊन आपल्या विकास कार्यावर तो खर्च करता येईल.

एर्स्किन चिल्डर्स आणि ब्रायन उर्कहर्ट यांनी १९९४ साली आपल्या पेपरमध्ये असं म्हटलं होतं की संयुक्त राष्ट्रांकडे थेट उत्पन्न किंवा निधीची उभारणी करण्यासाठी एखाद्या वार्षिक युनायटेड नेशन्स लॉटरीचं आयोजन करता येईल. त्यांनी पुढे जाऊन असंही म्हटलं होतं की विविध राष्ट्रांच्या सरकारांकडेच त्याची परवाना पद्धती राहील, मात्र सेक्रेटरी जनरल यांच्या विशेषाधिकाराखाली ही लॉटरी चालवली जाईल. फिनलंडचे माजी अध्यक्ष मार्टी अहतीसारी यांनीही जागतिक लॉटरीची अशी कल्पना २००३ साली मांडली होती. वर्ल्ड फॉर डेव्हलपमेण्ट इकॉनॉमिक्स रीसर्च या संयुक्त राष्ट्रांच्या संस्थेतर्फे 'विकासात्मक कार्यासाठी वित्तपुरवठा होण्याकरता नवोन्मेष स्रोत' असा एक प्रकल्प राबवला गेला. ऑक्सफर्ड विद्यापीठाचे सर अॅन्थनी अॅटकिन्स हे या प्रकल्पाचे संचालक होते. प्रकल्पांतर्गत टोनी अॅडिसन आणि अब्दुर आर. चौधरी यांनी जागतिक विकासासाठी निधी म्हणून लॉटरी हा एक चांगला पर्याय असू शकतो असं आग्रही प्रतिपादन केलं होतं. या पर्यायाचा पहिला

भाग म्हणून जागतिक लॉटरी राष्ट्रीय पातळीवर संचालित करायची किंवा मग दुसऱ्या पर्यायानुसार एकाच संस्थेला संपूर्ण जागतिक लॉटरीचं व्यवस्थापन करायला सांगायचं. या प्रकल्पानुसार विस्ताराने अशीही चर्चा झाली की जागतिक लॉटरीचा नफा हा राष्ट्रीय सरकारांमध्ये विभागला जावा जेणेकरून ही जागतिक लॉटरी स्थानिक राष्ट्रीय लॉटरीला स्पर्धा म्हणून पुढे येऊ नये आणि त्यामुळे स्थानिक सरकारांकडून त्याला विरोध होऊ नये.

संयुक्त राष्ट्र आणि ऑक्सफर्ड विद्यापीठ या जागतिक पातळीवरच्या अतिशय प्रतिष्ठित आणि मान्यताप्राप्त संस्था आहेत. या संस्थांकडूनच जागतिक लॉटरीचं सुतोवाच केलं गेलं आहे. भूतकाळात डोकावलं तर अगदी ब्रिटिश म्युझियम आणि किंग्ज कॉलेज तसेच सिडनी ऑपेरा हाऊस या सांस्कृतिक तसेच शैक्षणिक संस्थांनीही लॉटरीच्या रचनात्मक परिणामांचा अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी उपयोग करून घेतलेला दिसून येईल. म्हणून आपल्या देशानेही लॉटरीच्या क्षमेतेचा पूर्णपणे लाभ करून घ्यायला हवाय.

# लॉटरीची वाटचाल

## लॉटरी म्हणजे काय?

लॉटरीचा शब्दश: अर्थ आहे... नशिबाच्या दानावर अवलंबून असणारी घटना. लॉटरी हा शब्द मध्य डच *लॉटरिजे* किंवा जुन्या फ्रेंच *लॉतरिए* या शब्दांवरून विकसित झाला आहे.

लॉटरीची वैश्विक व्याख्या अशी काही नाही. तरीही युरोपियन समुदायाच्या विधीमंडळाच्या वर्णनानुसार लॉटरी म्हणजे... जिंकण्याच्या आशेने या नशिबाच्या खेळाची तिकिटं विकत घेऊ पाहणाऱ्या ग्राहकाला तिकिटांचं वितरण, सोडतीच्या घटनेचं संयोजन, बक्षिसांसाठी आलेल्या दाव्यांचा विनिमय, तसेच प्रत्यक्ष बक्षिसांचं वितरण करण्यासाठी असा संचालकाकडून पुरवली गेलेली विशेष सेवा.

डिक्शनरीतील व्याख्येप्रमाणे ही नशिबावर यशापयश अवलंबून असलेली स्वानंदाची क्रिया आहे. एन्सायक्लोपेडिया ब्रिटानिकात वर्णन केल्याप्रमाणे, ‘अनेक राज्य सरकारे स्वतंत्र ताळेबंद असलेल्या लॉटरीला अधिकृत दर्जा देऊन उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून पाहात आहेत. अनेक लॉटरी पद्धतीत दावेकरी क्रमांकाची छापील पावती मिळवतो किंवा दिलेल्या पावतीवर आपल्या इच्छेने क्रमांक भरतो त्यानंतर घोषित झालेल्या क्रमांकाशी पडताळणी करून विजेता घोषित केला जातो. यात बक्षिसाची रक्कम संयोजनाचा खर्च वजा जाऊन आणि सरकारच हिस्सा वगळून राहिलेल्या गंगाजळीतून ठरवले जाते. विजेत्याला मिळालेल्या रकमेवर कर आकारला जातो. शिखरावरची बक्षिसं लाखो रुपयांमध्ये असू शकतात...

## निर्णय होता होता...

लॉटरी फार पूर्वीपासून अस्तित्त्वात आहे. लॉटरीचा उगम नेमका कधी झाला यावरून मात्र इतिहासज्ञ आणि पंडितांमध्ये वाद आहेत. बायबलमध्ये काही थोडे उल्लेख पैजा आणि सोडतींबद्दल आहेत. अर्थात बायबल काळात लॉटरींची उद्दिष्टं वेगळी होती आणि पैशाचा थेट वापर बक्षीस म्हणून होत नव्हता. *ओल्ड टेस्टामेण्ट*मधल्या बुक ऑफ जोशुआत जोशुआने इस्त्रायली १२ जमातींना जमिनी वितरित करण्यासाठी काही पैजा काढल्या होत्या. जोनाह आणि सॅम्युएलच्या पुस्तकातील उल्लेखांनुसार पापी माणसांसाठीही पैजा काढल्या जायच्या. दर्यावर्दी किंवा अनुयायांवर अशा माणसांमुळे आपत्ती येते अशी समजूत त्यावेळी होती. नव्या टेस्टामेण्टनुसार जिझसला क्रूसावर चढवण्यात आल्यानंतर त्याचे कपडे वाटून घेण्यासाठीही सैनिकांनी सोडत ठेवली होती. जुदाहच्या मृत्यूनंतर इतर अनुयायांनीही मथियसला जुदाहच्या जागेवर नेमण्यासाठी सोडतच काढली होती.

आजही अनेक निर्णय अशा सोडतींच्या मार्गाने केले जातात. अनेक हाऊसिंग सोसायट्यांचे फ्लॅट्सही लॉटरी पद्धतीने दिले जातात.

## प्राचीन काळातील लॉटरी

ग्रीस, भारत, रोम, चीन आणि जपान या देशांना लॉटरी पद्धतीच्या खेळांचा प्राचीन इतिहास आहे. ग्रीक तरुण मायनोटॉर या वृषभ–मानवाला बळी जाण्याचा सन्मान प्राप्त करण्यासाठी पैजा लावायचे. महाभारतात जुगाराच्या खेळात युधिष्ठिराने आपलं राज्य पैजेवर लावलं होतं. नलन राजाच्या कथेत त्याने आपला निदाध देश राजा पुष्करणाच्या हाती पैजेवरच दिला होता. रोमन लोक रथांच्या शर्यतीवर पैजा लावत असत.

चीनमध्ये इसवी सनाच्या १९५ वर्षे आधी चेन्ग लेन्ग या हॅन घराण्याच्या राजाने किनो ही लॉटरीची पद्धत विकसित केली. शहराला वेढा पडल्यावर युद्धाची पूर्वतयारी म्हणून त्याला नागरिकांकडून निधी हवा होता. त्यासाठी किनो हा खेळ विकसित केला गेला. पैसा आणि संपत्ती नशिबाच्या हवाली ठेवून हा खेळ खेळला जायचा. किनो हा लॉटरीचा खेळ चिनी कामगारांसोबत अमेरिकेत आला. रेलरोडच्या प्रकल्पात तेव्हा अनेक चिनी कामगार अमेरिकेत येऊन थडकले होते.

## युरोप आणि अमेरिकेतल्या लॉटरी

पुराव्यानुसार युरोप आणि अमेरिकेतील लॉटरी पंधरा ते सतराव्या शतकाच्या दरम्यान अधिक भरभराटीला आल्या. चिनी किनो शिवाय पहिली ज्ञात लॉटरी इटालीच्या फ्लॉरेन्स या शहरात १५३० साली खेळली गेली. खेळण्यासाठी पैसे भरावे लागणारी ही पहिलीच लॉटरी, शिवाय रोख पैसे बक्षीस म्हणून दिला गेलेलाही तो पहिलाच खेळ. बिन्गोशी साधर्म्य असलेला हा खेळ होता. इटालीत ड्रॉसाठी ऑलिव्ह फळाच्या आत क्रमांकाच्या चिठ्ठ्या टाकून सोडत जाहीर होत असे. १५३३ मध्ये हा खेळ इटालीतून फ्रान्समध्ये गेला. त्या काळात फ्रॅन्कॉइस प्रथम हा युद्धाची पूर्वतयारी करत होता. सोळाव्या लुईने आपल्या मुलासाठी लोटो डॉफिन या खेळाचा शोध लावला.

इंग्लंडमधली पहिली लॉटरी १५६६ मध्ये आयोजित केली गेली. जेव्हा युरोपातील नागरिक पुनर्वसनासाठी अमेरिकेत गेले तेव्हा त्यांनी लॉटरी अमेरिकेत नेली आणि अमेरिकेतली पहिली लॉटरी १६१२ साली सुरू झाली. उत्तर अमेरिकेतील लॉटरीवर इंग्लंडमधील लॉटरीचा प्रभाव होता तर दक्षिण आणि मध्य अमेरिकेवर स्पॅनिश लॉटरीचा प्रभाव होता. त्यानंतर इंग्लंडचा राजा जेम्स प्रथम याने लॉटरीला अधिकृत स्थान दिले. अमेरिकेतील व्हर्जिनिया येथील जेम्स टाऊनच्या वसाहतीला मदतनिधी म्हणून या लॉटरीचा उपयोग झाला. जॉर्जियाची पहिली लॉटरी १७८४ ला अधिकृत झाली आणि त्याचा उपयोग

हॉस्पिटलच्या उभारणीसाठी तसेच सॅव्हानाच्या दर्यावर्दींच्या वसाहतीसाठी केला गेला. १७९० ते १८३९ या दरम्यान स्क्रीव्हनचे न्यायालय, मिलेजेव्हिलीचे उपरस्ते आणि ऑगस्टातलं अग्निशमन दल अशा प्रकारच्या अनेक सामाजिक उपक्रमांसाठी लॉटरीने निधी उपलब्ध करून दिला.

## लॉटरी आणि चर्च

चर्चेसनेही त्यांच्या अनेक उपक्रमांच्या निधी उभारणीसाठी लॉटरीचा उपयोग करून घेतला हे जाणून घेणं रंजक ठरू शकेल. जेम्स टाऊनच्या विकासासाठी जी लॉटरी संचालित केली गेली त्यातल्या तीन विजेत्यांपैकी दोन बक्षिसं अँग्लिकन चर्चेसची होती. फ्रान्समधली अनेक चर्चेस ही लॉटरीतून आलेल्या महसुलातून बांधली किंवा जीर्णोद्धारित केली गेली आहेत. १९६० साली केरळमधल्या अनेक चर्चेसनादेखील खाजगी लॉटरींचा फायदा मिळाला. अगदी अलिकडेही भारतातली चर्चेस बिन्गोशी साधर्म्य सांगणारे हाऊजी किंवा तंबोलासारखे सोपे खेळ सुगीच्या दिवसात निधीसंकलनासाठी वापरताना दिसतात.

## कर्जाऐवजी लॉटरी

१९व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत फार कमी बँका अस्तित्त्वात होत्या. १७९०च्या आधीपर्यंत अमेरिकेत अवघ्या तीन संयुक्त बँका होत्या. अनेक राज्य सरकारांना त्यांच्या निधीसंकलनाचं नियोजन करण्यासाठी लॉटरी हाच पर्याय उपलब्ध होता. लॉटरीच्या सुरुवातीच्या पद्धतीत जमा निधीपैकी ८५ टक्के रक्कम ही बक्षिसासाठी खर्च व्हायची व १५ टक्के रक्कम ही वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमासाठी वापरली जायची. हा पैसा महसूल उभारणीपेक्षाही धर्मादाय किंवा लोकोपयोगी योगदान म्हणून अधिक पाहिला जायचा.

## अठराव्या शतकातली बंडखोरी

१८०० नंतर लॉटरी हे मनोविजनाचे साधन म्हणून लोकप्रिय झाले. खाजगीकरण होऊ लागले. लोकप्रियतेने भ्रष्टाचाराला खतपाणी मिळू लागले. अमेरिकेच्या क्रांतियुद्धाच्या दरम्यान लॉटरीची प्रतिमा मलीन झाली, त्यामुळे लॉटरी बंद करण्याची आवश्यकता निर्माण झाली. न्यूयॉर्क हे लॉटरीवर प्रतिबंध लादणारं पहिलं राज्य ठरलं. कॅनडाने मग त्या मागोमाग प्रतिबंध लादला आणि १८७८ सालापर्यंत अमेरिकेतल्या ल्युइसियाना वगळता साऱ्या राज्यांनी लॉटरीवर बंदी आणली. ल्युइसियानानेही १९०५मध्ये लॉटरी बंद केली. परंतु स्पेन आणि नेदरलॅण्डसारख्या देशात लॉटरी लोकप्रियच राहिली. नेदरलॅण्डमध्ये सर्वात जुनी लॉटरी आजही सुरूच आहे. १९६४ मध्ये अमेरिकेतल्या न्यू हॅम्पशायरमध्ये घोड्यांच्या शर्यतीशी लॉटरीचा संबंध लावून लॉटरी बंदीच्या कायद्यातल्या पळवाटा शोधून

काढल्या. त्यानंतर या राज्यात लॉटरी पुन्हा सुरू झाली. त्यानंतर इतर राज्यांनीही त्याचं अनुकरण केलं. १९८०च्या दशकात अनेक देशांमध्ये लॉटरी ही आकर्षक पद्धतीने सादर होऊ लागली. नवी बक्षीसरचना, नवे खेळ, झटपट लॉटरी, बहुआयामी खेळांचं मार्केटिंग आणि मोठ्या बक्षीस रकमा यामुळे लॉटरीकडे लोकांचा मोहरा वळू लागला.

## मुस्लीम आणि कम्युनिस्ट राष्ट्रांमधील लॉटरी

मुस्लीम धर्मकायद्यांप्रमाणे लॉटरीवर प्रतिबंध असतानाही मोरोक्कोसारख्या मुस्लीम देशात लॉटरी संचालित केली जाते. कम्युनिस्ट विचारसरणीतही लॉटरी ही संकल्पना रुचत नसतानाही रशिया, कझाख़स्तान, चीन या देशात लॉटरी अस्तित्त्वात होती.

## लॉटरीचे फायदे-तोटे

इंग्लंडमध्येही बंदीनंतर १८२६ नंतर लॉटरी अस्तित्त्वात नव्हती. १९९४ मध्ये त्यानंतर सरकारी संमतीने राष्ट्रीय लॉटरी सुरू झाली. हा निर्णय घेतला गेला कारण लोक इतर देशांच्या लॉटरी खेळतात आणि त्यांच्या पैशाचा फायदा इतर देशांना होतो हे लक्षात आल्यानंतर.

जगभरातल्या साऱ्या सरकारकडून लॉटरीतून मिळणारं उत्पन्न हे विकास, कला, आरोग्य, शिक्षण, खेळ आणि धर्मादाय कामांसाठी वापरलं जातं. मात्र पैसा उभारणी प्रकल्प म्हणून लॉटरीकडे पाहताना अनेक वादंग निर्माण होतात. लॉटरीचे विरोधक लॉटरीतील काही अनियमितता आणि काही नागरिकांना लॉटरी खेळण्याचं लागलेली सवय या मुद्द्यांवर बोट ठेवतात. जरी काही सवय लागलेले व्यसनी खेळिये असले तरीही तंबाखू किंवा दारूसारख्या आरोग्याला घातक असलेल्या व्यसनांसारखं या सवयींचं स्वरूप नाही हे आधी लक्षात घ्यायला हवंय. त्यामुळे तंबाखू आणि दारूच्या आरोग्य समस्यांशी झुंजण्यासाठी सरकारला हॉस्पिटल्स आणि औषधांचा भार सहन करावा लागतो. प्रत्यक्षात १९९९मध्ये अभ्यासाअंती युरोपियन युनियन मानसोपचार तज्ज्ञांनी इंटरनेटच्या महाजालात भ्रमंती करण्याचं व्यसन हे लॉटरीच्या व्यसनापेक्षाही भयंकर असल्याचं नमूद केलं होतं.

लॉटरीतील अनियमिततेवरच बोट ठेवून लॉटरीवर बंदी आणण्याचा प्रयत्न तामिळनाडूमध्ये वारंवार झाला, पण त्यातून काही योग्य तो तोडगा निघू शकला नाही. उलट इतर राज्यांच्या लॉटरींची तिकिटं तामिळनाडूमध्ये काळ्या बाजारात चढ्या भावाने विकली जाऊ लागली. शिवाय स्थानिक सरकार महसुलाला मुकलं ते वेगळंच. त्याचप्रमाणे इंटरनेटवर परदेशी लॉटरी सहज उपलब्ध आहेत, वैयक्तिक परकीय चलनतातील व्यवहारही शिथील होतायत. त्यामुळे अनेक लोक परदेशी लॉटरींमध्ये पैसे लावत आहेत. परिणामी मोठ्या

प्रमाणात परकीय चलनाचा होणारा तोटा आपल्याला टाळता येणं अशक्य होतं. त्याऐवजी इंग्लंडसारख्या देशात लॉटरीचं व्यवस्थापन यशस्वीरित्या कसं केलं जातं याचा अभ्यास करून त्याप्रमाणे स्थानिक परिस्थितीनुसार सुधारणा आपल्याकडे करवून घेतल्यास आपल्याकडील लॉटरी पद्धतीतील अनेक त्रुटी नाहिशा करता येतील.

### लॉटरी आणि शिक्षण

१९व्या शतकात लोटो सारखे खेळ हे लहान मुलांच्या शिक्षणासाठी वापरले जायचे. या लॉटरी खेळांच्या आयोजनातून मुलांना इतिहास, भुगोल, गणित, प्राणीसृष्टी आणि वनस्पती इत्यादींविषयी ज्ञान उपलब्ध करून देण्यात यायचे.

### पुनर्रचनेसाठी अत्यावश्यक कारणं

लॉटरींवर बंदी हे समस्येला तोंड देण्यापेक्षाही समस्येपासून पळ काढण्यासारखे आहे. कारण भारतात या व्यापारातून अनेक अपंग तसेच अशिक्षित अशा ५० लाख लोकांना रोजगार उपलब्ध होतो. याशिवाय हा व्यवसाय इतर अनेक व्यवसायांना हातभार लावतो. लॉटरीने केवळ सरकारला महसूल मिळतो आणि गरजूंना रोजगार मिळतो असे नाही तर अनेक खाजगी तसेच सामाजिक संस्थांना त्याचा निधी उभारणीसाठी प्रचंड फायदा होतो. उदा. चेन्नई येथील कॅन्सर इन्स्टिटय़ूट. या पुस्तकातील जागतिक पातळीवरील लॉटरींच्या प्रकरणात जगभरातील किती संस्थांना तसेच लोकांना लॉटरीचा फायदा मिळाला आहे याचा सांगोपांग विचार झाला आहे.

ज्या देशांमध्ये लॉटरी खेळली जाते त्या प्रत्येक देशामध्ये लॉटरीतून मिळणारा महसूल हा अनेक चांगल्या कारणांसाठी खर्च होतो. त्यामुळे गरिबी ही समस्या आहे, लॉटरी नाही हे लक्षात घेतलं पाहिजे. लॉटरी खेळणाऱ्यांना याची जाणीव करून देणे आवश्यक आहे की लॉटरी हे जगण्याचं साधन नाही. बंदी घालण्यापेक्षाही लॉटरी व्यवस्थेची पुनर्रचना केली तर सर्व संबंधितांना त्याचा फायदा होऊ शकेल.

# लॉटरी प्रतिबंधक विधेयक, १९९९ -
# समिती बैठकीतली कार्यवाही

लॉटरी प्रतिबंधक विधेयक, १९९९ हे गृहखात्याच्या संसदीय समितीमार्फत चर्चेला आणले गेले. समितीने सहा बैठकींमध्ये या विधेयकावर चर्चा केली. २००० साली राज्यसभेने लॉटरी प्रतिबंधावर लोकप्रतिक्रिया नियतकालिकांतील जाहिरातींद्वारे मागवल्या. पहिल्या आठवड्यातच ७० हजार प्रतिक्रिया नोंदवल्या गेल्या. पैकी बहुतांश या प्रतिबंधाच्या विरोधी होत्या. लोकसभा आणि राज्यसभेतील साधारण २६ खासदारांनी लॉटरीला पाठिंबा व्यक्त करणारा पत्र दिलं. केवळ एका खासदारानेच बंदीशी सहमती दर्शवली. संसदीय समितीच्या चर्चेमध्ये लॉटरी व्यवसायाचा प्रतिनिधी म्हणून या पुस्तकाच्या लेखकानेही सहभाग घेतला. या बैठकीच्या दरम्यान या व्यवसायासंबंधी अनेक दृष्टिकोन नोंदवले गेले.

लॉटरी बंद झाल्यामुळे अनेक लोकांचा रोजगार बुडेल या मुद्द्यावर खासदारांनी विशेष लक्ष वेधले. बंदीमुळे कागद उद्योगावरही परिणाम होईल, कारण लॉटरी उद्योगात एक लाख टन कागद वापरला जातो. खासदारांनी या मुद्द्यावरही लक्ष वेधलं की लॉटरी व्यवसायावर विसंबून असलेल्या ५० सिक्युरिटी प्रिंटरनाही त्यांची प्रेस बंद करण्यावाचून पर्याय उरणार नाही.

बंदीच्या समर्थक आघाडीने असे नमूद केले की बंदी असलेल्या बेकायदेशीर एक क्रमांकाच्या लॉटरीचेही संचालन छुप्या पद्धतीने लॉटरी संचालक करत आहेत, तसेच या व्यवसायावर अवलंबून असलेल्या लोकांची संख्या लॉटरी लॉबीने फुगवून सांगितली असल्याचा त्यांनी आक्षेप नोंदवला तसेच राज्य सरकारला होणारी वित्तीय तूट केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या अतिरिक्त अनुदानातून भरून काढता येईल, असंही त्यांनी नमूद केलं.

कागद उद्योग, प्रिंटिंग प्रेस आणि ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांच्या वतीने आलेल्या प्रतिनिधींनी बंदीमुळे ओढवणाऱ्या व्यावसायिक समस्यांची माहिती समितीला दिली तर प्रिंटर्सनी असे नमूद केले की लॉटरीवर बंदी न आणता ती कायदेशीर करणं आवश्यक आहे.

लॉटरी व्यापाऱ्यांच्या संघटनांनी असे निदर्शनास आणले की लॉटरी व्यवसायातील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी खाजगी लॉटरींवर बंदी आणावी. त्यांनी लॉटरी बंदीमुळे सरकारच्या महसुलात होणारी तूटही नजरेस आणून दिली. बंदीमुळे साधारण २५ लाख लोक बेरोजगार होतील आणि बेकायदेशीर जुगार फोफावेल अशी भीती त्यांनी व्यक्त केली. त्यांचा दावा होता की तंबाखू तसेच दारू यांचे सेवन हे अधिक घातक आहेत. तेव्हा एकट्या लॉटरीला लक्ष्य का केले जात आहे? त्यांनीसुद्धा असे प्रतिपादन केले की

लॉटरी व्यवसाय कायदेशीर करावा.

सामाजिक संस्थांकडून आलेल्या प्रतिनिधींनी असे सांगितले की लॉटरी व्यवसायांने सामाजिक उपक्रमांना आणि संस्थांना उदारहस्ते मदत केली आहे. लॉटरी बंदीमुळे या संस्थांच्या निधीउभारणीचा एक महत्त्वाचा स्रोत लुप्त होईल.

लोकांकडून आलेल्या सूचनांमध्ये सोडतीच्या काळात तसेच निकाल जाहीर होताना कठोर पर्यवेक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली गेली.

त्याचबरोबर दावा न केलेल्या बक्षिसांच्या रकमेचे वितरण समाजकल्याण निधीसाठी केले जावे अशी सूचनाही आली. आणखी एक सूचना अशी होती की सरकारला ठराविक रकमेऐवजी एकूण संमत तिकिटांच्या किमतीच्या किमान टक्केवारी देण्यात यावी. त्यामुळे गैरप्रकाराला आळा बसून अमर्यादित तिकिटांच्या छपाईवरही नियंत्रण येईल. काही लोकांनी असे सुचवले की या तिकीट विक्रीचा ताळेबंद तसेच लेखा परीक्षण राज्य सरकारतर्फे केले जावे. काही सूचना अशा होत्या की सरकारने लॉटरीच्या एकूण उलाढालीवर करवसुली करावी. प्रतिदिनी होणाऱ्या सोडतींच्या संख्येचे नियमन केले जावे. एका व्यक्तीने निर्देश केला की, 'आपल्या देशाने घोड्यांच्या शर्यती, कॅसिनो, जुगार, फॉरवर्ड ट्रेडिंग, स्टॉक आणि शेअर्समधलं डिलिंग, या सगळ्या गोष्टी थांबवल्या नाहीत. या साऱ्यांमध्ये जुगाराचा घटक आहेच. त्याऐवजी त्यांच्या सहजसंवाहनाची काळजी घेण्यात आली. लॉटरीच्या बाबतीत अशीच भूमिका का घेण्यात आली नाही, याची कारणमीमांसा स्पष्ट होत नाही.'

राज्य सरकारांमध्ये काहींनी या विधेयकाला संमती दाखवली, काहींनी विरोध दर्शवला तर काही थोड्यांनी सशर्त पाठिंबा दर्शवला. ज्यांनी आपला विरोध दर्शवला ते बेरोजगारी आणि महसूल गमावण्याच्या मुद्द्याबाबत आग्रही होते. काहिंनी या व्यावसायाचे नियमन करण्यासाठी खंबीर पावलं उचलण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

अरुणाचल प्रदेश सरकारने नियमन तंत्राची आवश्यकता नमूद केली आणि पारदर्शक तसेच परिणामकारक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. या सूचनांमध्ये खालील मुद्द्यांचा समावेश होता. प्रतिदिन सोडती २० ते २५ पर्यंत मर्यादित कराव्यात, प्रत्येक योजनेला उपनामांकनाऐवजी एकच विशिष्ट नाव असावे. बंपर ड्रॉ हे वार्षिक कमाल ४ ते ५ असावेत. आणि सरकारचा नफा हा एकूण उलाढालीच्या ५ ते ६ टक्के असावा. सरकारने स्वखर्चाने प्रत्यक्ष तिकिटांची छपाई करावी. एकूण उलाढालीच्या किमान ५० टक्के रक्कम ही बक्षिसांसाठी वाटली जावी आणि त्याचा खर्च सरकारने करावा.

गोवा, मणिपूर, मिझोराम, सिक्किम आणि मेघालय या सरकारांनी आपल्याकडे पुरेसा

पायाभूत स्रोत नसल्याने आपण वित्तपुरवठ्यासाठी लॉटरीवरच अवलंबून असल्याचे नमूद केले.

महाराष्ट्र सरकारने असे सांगितले की जर सरकारी लॉटरीवर बंदी आणल्यास खाजगी लॉटरी व्यावसायिकांचा गट राज्यघटनेच्या सातव्या परिशिष्टानुसार राज्याच्या अखत्यारितील खाजगी लॉटरींसाठी दबाव आणेल. या घडामोडीमुळे फक्त खाजगी लॉटरी चालकांना फायदा होईल, राज्य सरकारला नाही.

पंजाब सरकारने सांगितले की वेगवेगळ्या राज्य सरकारच्या लॉटरींमध्ये एकसूत्रता नाही. लॉटरीच्या उलाढालीतली  किमान ठराविक टक्केवारी बक्षिसांच्या स्वरूपात द्यावी आणि संगणकीकृत किंवा उपग्रहांद्वारे प्रक्षेपित लॉटरींची आवश्यकता त्यांनी पारदर्शकतेच्या मुद्द्याच्या अनुषंगाने मांडली.

सिक्किमनेही सोडतींच्या प्रतिदिनी किंवा प्रतिमाह संख्येवर मर्यादा आणण्याची आवश्यकता व्यक्त केली.

समितीचे अध्यक्षांनी समारोप करताना आपलं निरीक्षण नोंदवलं की, 'लॉटरीवर बंदी आणण्याच्या मुद्द्यावर समितीमध्ये मतांची तीव्र दरी असली तरी समितीने नमूद केलेल्या निरीक्षणांच्या, विविध भागांतून मिळालेल्या सूचनांच्या तसेच समिती सदस्यांच्या मतप्रदर्शनाच्या पार्श्वभूमीवर सर्वानुमते सरकारने या विधेयकाबाबत व्यापक राजकीय सार्वमत मिळवण्याचा प्रयत्न करावा.'

# लॉटरीचे लाभ : भूतकाळातील पुरावे

चीनमध्ये लॉटरी ही संरक्षणनिधीसाठी तसेच चीनची जगप्रसिद्ध भिंत बांधण्यासाठीही वापरली गेली.

ऑगस्टस सीझर याने प्रथम सामाजिक विधायक कामासाठी सर्वात प्रथम सार्वजनिक लॉटरीचे आयोजन केले होते. रोम शहराच्या जीर्णोद्धारासाठी या लॉटरीचा निधी वापरला गेला.

१४२० साली लेक्लुस या फ्रान्समधील शहराच्या जीर्णोद्धारासाठी लॉटरीचा उपयोग केला गेला. बक्षिसं माल आणि उत्पादनांच्या स्वरूपात होती.

१४६५ साली बेल्जिअममध्ये एक चॅपेल, बंदर आणि अल्महाऊस बांधायला लॉरीचा उपयोग केला गेला.

१५३९ मध्ये फ्रान्सच्या फ्रान्सिस प्रथम या राजाने त्याच्या खजिन्यात भर टाकण्यासाठी लॉटरी विक्री अधिकृत केली होती.

अमेरिकेतल्या व्हर्जिनियातील ब्रिटिश वसाहतीतील जेम्सटाऊनच्या उभारणीसाठी १६१२ मध्ये जेम्स प्रथम या राजाने इंग्लंडमध्ये लॉटरीच्या माध्यमातून निधी जमवला.

१६६५ मध्ये अमेरिकेतल्या न्यू ॲमस्टरडॅम या डच वसाहतीत पैसे उभारण्यासाठी लॉटरीचा उपयोग केला. न्यू ॲमस्टरडॅम आता न्यू यॉर्क म्हणून ओळखलं जातं.

स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्यावर सर्वप्रथम सही करणाऱ्या जॉन हॅनकॉक याने बोस्टनच्या फॅन्युएल हॉलच्या पुनर्उभारणीसाठी अठराव्या शतकाच्या सुरुवातीला लॉटरी प्रक्रियेचा आधार घेतला होता. पीटर फॅन्युएल याने १७४२ साली हा हॉल उभारला होता. आणि स्वातंत्र्य चळवळींच्या सुरुवातीच्या बैठका इथे होत, त्यामुळे या हॉलला स्वातंत्र्याचा पाळणा असेही संबोधले जात होते.

१७४६ साली न्यूयॉर्कमध्ये पहिली सार्वजनिक लॉटरी आयोजित केली गेली. या लॉटरी प्रक्रियेतून उभा राहिलेला निधी शहराच्या विकासासाठी वापरला गेला. याच वर्षात आणखी काही लॉटरींचं आयोजन कोलंबियाच्या किन्ग्ज कॉलेजच्या उभारणीसाठी केलं गेलं.

१७५३मध्ये लॉटरीच्या मदतीने उभ्या राहिलेल्या निधीतूनच ब्रिटिश म्युझिअमची स्थापना झाली.

फ्रेन्चांनी फ्रेन्च आणि इंडियन युद्ध जिंकली. त्यानंतर फ्रेन्च नागरिकांनी त्यांना

शस्त्रसज्ज करावं अशी विचारणा केली. त्यावर न्यूयॉर्कमध्ये १७५६ साली लॉटरीच्या माध्यमातून निधी संकलन करून दारुगोळा विकत घेतला गेला. त्याचवर्षी आणखी एका लॉटरीचे आयोजन करून एका तुरुंगाचीही उभारणी झाली.

१७५८ साली युद्धात कर्जबाजारी झालेल्या अल्बनाय शहराच्या कर्जमुक्तीसाठी लॉटरीने मदत केली.

१७५९ साली फ्रान्सच्या पंधराव्या लुईने ईयोवन्नी ईयाकोमो कॅसानोव्हा यांच्या आग्रहाखातर लॉतरिए रॉयल ऑफ मिलिटरी स्कूलची स्थापना केली. त्यातून राज्याची अनेक कर्ज उतराई झाली. आणि फ्रान्सच्या लॉतरिए नॅशनेलसाठी ही संस्था कारणीभूत ठरली.

१७६१ मध्ये न्यूयॉर्कचं लाइटहाऊस बांधण्यासाठी तसेच सिटी हॉलच्या उभारणीसाठी लॉटरीचं आयोजन केलं गेलं.

१७७६ साली वसाहतीचं लष्कर उभारण्यासाठी लॉटरीच्या माध्यमातून निधी उभारण्यात आला.

अमेरिकेत १७९० ते १८६० या कालावधीत ५० महाविद्यालयं, ३०० शाळा आणि २०० चर्चेसची उभारणी लॉटरी प्रक्रियेतून झाली. यातल्या महत्त्वाच्या संस्था म्हणजे हॉर्वर्ड, येल, प्रिन्स्टन, डार्टमाऊथ, ब्राऊन आणि कोलंबिया विद्यापीठ.

१७९० ते १८६० या कालावधीत अमेरिकेतल्या ३३ पैकी २४ राज्यांनी जेल्स, हॉस्पिटल्स, अनाथाश्रम आणि वाचनालयं बांधण्यासाठी लॉटरी फंडाचा वापर केला.

फिलाडेल्फियाला वाचवण्यासाठी क्रांतीयुद्धात बेंजामिन फ्रँकलिन याने तोफांची गरज ही लॉटरी प्रक्रियेतून भागवली.

१९व्या शतकाच्या सुरुवातीला अमेरिकेत हडसन नदीतील नौकानयन, साहित्यिक चळवळी यांच्यासाठी न्यूयॉर्कमध्ये विविध लॉटरींचं आयोजन करण्यात आलं होतं. नदीकाठचा रस्ता बांधण्यासाठी ब्लॅक रिव्हर लॉटरीचं आयोजन तसेच युनियन कॉलेजसाठीही निधी न्यूयॉर्क शहरातल्या लॉटरीतूनच उभारला गेला.

दोस्त राष्ट्रांच्या वतीने थायलंडला पहिल्या महायुद्धात प्रवेश करता आला तो लॉटरीतून उभ्या राहिलेल्या निधीमुळेच.

थॉमस जेफरसन याने सामाजिक प्रकल्प राबवण्यासाठी लॉटरींचा उपयोग केला.

१९३८मध्ये रॉयल वुम्नस हॉस्पिटलच्या उभारणीसाठी तसेच उपकरणांसाठी क्वीन्सलॅण्ड

राज्याने गोल्डन कॅस्केटचा संपूर्ण निधी वापरला.

१९६८ साली जॉर्ज वॉशिंग्टनने ब्ल्यू रिज पर्वतरांगांमधला रस्ता बांधण्यासाठी लॉटरीचे आयोजन केले होते.

**भारतीय संदर्भ**

१८१३ साली कोलकात्यातील टाऊन हॉलच्या बांधकामासाठी लॉटरी निधीचा वापर झाला.

चेन्नईतील मूर मार्केट, व्हिक्टोरिअन पब्लिक हॉल, रिपन बिल्डिंग आणि सरकारी म्युझिअम थिएटर बांधणीत लॉटरी निधीने मदत केली.

सुचींद्रमच्या थानुमालयन मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सुमारे २०० वर्षांपूर्वी त्रावणकोरच्या राजाने लॉटरीचे आयोजन केले होते. तो आदेश आजही त्या मंदिरात पाहायला मिळतो. (संदर्भ परिशिष्ट २)

# लॉटरीचे प्रकार

जगभरात लॉटरी खेळण्याचे विविध आणि असंख्य प्रकार असले तरी ते काही मूलभूत खेळांचीच विकसित प्रारूपं आहेत. लोटो प्रकारातल्या खेळात दिलेल्या ६० क्रमांकांपैकी ४, ५ किंवा ६ क्रमांकच काढण्याची आवश्यकता असते. जर चारच क्रमांक या ६० क्रमांकातून काढायचे झाल्यास या खेळाला ४/६० लोटो असं म्हटलं जाऊ शकतं. बिन्गो आणि किनो हे याच खेळाची किंचित वेगळी प्रारूपं म्हणावी लागतील.

मल्टि-डिजिट खेळात खेळियाने ०० ते ९९, तसेच ००० ते ९९९ किंवा ०००० ते ९९९९ यांच्या दरम्यानचे क्रमांक निवडायचे असतात. टूडी, थ्रीडी किंवा फोरडी याप्रमाणे या मल्टि-डिजिट खेळाचे विविध पर्याय उपलब्ध आहेत. या खेळातली बक्षीसांची उतरंड खेळाडूचे क्रमांक सोडतीच्याच क्रमाने जुळतात की उलटसुलट क्रमाने जुळतात यावर ठरते. आशिया आणि विशेषत: भारतातल्या पेपर लॉटरी या मल्टिडिजिट प्रकाराच्याच आवृत्त्या आहेत.

भारतात पुढील अप्रत्यक्ष लॉटरी खेळ हे मोठ्या प्रमाणावर खेळले जातात. मॅक्स ३, लकी ३ ही डिजिट खेळाची काही ऑनलाइन प्रारूपं म्हणावी लागतील. फास्ट लोटो, सुपर लोटो आणि थंडरबॉल हे लोटो पद्धतीचे ऑनलाइन खेळ आहेत.

## पॅसिव्ह लॉटरी

पॅसिव्ह लॉटरीत तिकिटं आधीच छापलेली असतात आणि बक्षिसं आधीच अधोरेखित केलेली असतात. तिकिटांच्या विक्रीवर बक्षिसांची रक्कम अवलंबून नसते. अशा प्रकारच्या लॉटरीला ड्रॉ लॉटरी किंवा ट्रॅडिशनल लॉटरीही म्हटलं जातं. ही आशियाईतली आणि विशेषत: भारतातली सर्वात लोकप्रिय लॉटरी आहे. सिंगल डिजिट लॉटरीतले टूडी, थ्रीडी आणि फोरडी गेम्सही या लॉटरीच्या प्रकारात मोडतात.

## १. सिंगल डिजिट लॉटरी

सर्वात लोकप्रिय आणि वादग्रस्त अशी ही सिंगल डिजिट लॉटरी आता भारतात खेळली जात नाही. कारण लॉटरी नियमन कायदा, १९९८ नुसार बंदी आणली गेली. घोषित क्रमांकाशी जुळणाऱ्या तिकिटांच्या ग्राहकाला प्रथम विजेता म्हणून बक्षीस दिलं जातं. बाकी सर्व बक्षिसं ही शेवटच्या क्रमांकावर ठरली जातात. उदा. जर तिकिट क्रमांक ४५७६८४९ असा आहे आणि घोषित विजेता नंबर ९ आहे तर ज्यांच्या तिकिटांच्या शेवटी ९ आहे त्या साऱ्यांना बक्षिसं दिली जातात. या बक्षिसांची रक्कम लहान असली तरी दहापैकी एक तिकिट निश्चितच बक्षिस विजेतं ठरतं. अशा खेळात

जिंकण्यांच्या शक्यता अधिक असल्याने आणि दर अर्ध्या तासाने सोडत असल्याने ही लॉटरी लोकप्रिय ठरली. दिवसाला सकाळी ९ पासून रात्री दहापर्यंतच्या वेळात ५२ वेळा सोडत घोषित होत असे. ९१ टक्के महसूल हा बक्षिसाची रक्कम म्हणून परत जात असे. या सगळ्या कारणांमुळे ही लॉटरी जनमानसात लोकप्रिय होती.

**२. टूडी गेम**

या प्रकारात पहिलं बक्षिस घोषित क्रमांकाशी जुळणाऱ्या तिकिटाला जाते. इतर बक्षिसं तिकिटाच्या शेवटच्या दोन क्रमांकांच्या जुळणीनुसार दिली जातात. याचा अर्थ जर तिकिट क्रमांक १५७८४ असा असेल तर ज्यांच्या तिकिटांच्या शेवटी ८४ हा क्रमांक येईल त्या साऱ्यांना काही बक्षिसं मिळतात. अशा प्रकारे शंभरापैकी एका तिकिट बक्षिसपात्र ठरतं.

**३. थ्री डिजिट किंवा थ्रीडी गेम**

यात बक्षिसं शेवटच्या तीन क्रमांकानुसार ठरतात.

**सेट थ्रीडी गेम**

भारतात काही राज्यांमध्ये 'सेट' किंवा 'सेम' थ्रीडी गेम्स खेळले जातात. सेटमध्ये २०, ४५, ५०, ६० किंवा १०० तिकिटं सारख्या क्रमांकाची म्हणून वाटली जातात. या तिकिटांवरती बक्षिसांची किंमत आणि तिकिटांची संख्या दर्शवली जाते. उदा. ५००० $X$ ६० यामध्ये सर्व ६० तिकिटांना एकच नंबर दिलेला असतो. जसे २७६९५ परंतु श्रेणी वेगवेगळी असते. जशी एबी, एसी वगैरे.

**ऑनलाइन थ्रीडी गेम**

हे थ्री डिजिट खेळाचे ऑनलाइन व्हर्जन आहे. खेळाडूने ००० ते ९९९ या दरम्यानचा क्रमांक निवडायचा. हा खेळ खेळायला अनेक पर्याय आहेत. स्ट्रेट प्लेमध्ये निवडलेला नंबर जाहीर झालेल्या नंबरशी त्याच सिक्वेन्समध्ये जुळणं आवश्यक आहे. बॉक्स प्लेमध्ये निवडलेला नंबर हा सहा शक्यतांमधला एखादा नंबर असू शकतो. जर घोषित नंबर ६७८ असा असेल तर पुढीलपैकी कुठल्याही शक्यतांना जसे ६७८, ६८७, ८७६, ८६७, ७६८, ७८६ यांना बक्षीस मिळतं. बॅक प्लेअर प्लेमध्ये खेळाडूने दोन क्रमांक निवडायचे असतात. आणि जर नंबर घोषित नंबरच्या शेवटच्या दोन नंबरांशी जुळले तर त्याला बक्षीस मिळतं. एनी प्ले या खेळाच्या पर्यायात खेळाडूला तीन नंबर निवडायचे असतात. जर पैकी दोन नंबर जर पहिल्या दोन, मागच्या दोन किंवा वेगळ्या जोडीशी जुळले तर तो बक्षीसपात्र ठरतो. खेळाच्या ऑप्शन्सप्रमाणे बक्षिसाची रक्कम वेगवेगळी होते.

ऑनलाइन थ्रीडी खेळाच्या आणखी एका व्हर्शननुसार सात पर्याय उपलब्ध आहेत.

स्ट्रेट, बॉक्स थ्री, बॉक्स सिक्स, फ्रंट पेअर, बॅक पेअर, स्प्लिट पेअर आणि एनी पेअर. बॉक्स थ्री हा पर्याय जेव्हा तीनापैकी दोन नंबर निवडलेले असताना लागू होतो.

**बंपर ड्रॉ**

बंपर ड्रॉ हा मल्टि डिजिट लो फ्रिक्वेन्सी ड्रॉ आहे. ज्यात मोठे जॅकपॉट असतात. तिकिटंही जास्त किंमतीची छापली जातात. भारतात या तिकिटांची किंमत जॅकपॉटनुसार ५०, १०० किंवा हजारांच्या घरात असते. बंपर ड्रॉ लॉटरीचे ड्रॉ हे बहुधा दसरा-दिवाळीसारख्या सणासुदीचं निमित्त साधून आयोजित केले जातात. पंजाबसारख्या राज्यात बैसाखीला, महाराष्ट्रात गणेशोत्सव यावेळी जॅकपॉट ड्रॉ आयोजित केले जातात. काही राज्यांमध्ये हे दरमहा असतात.

त्रिनादाद ॲण्ड टोबॅगोमध्ये हा विशेष ड्रॉ म्हणून गणला जातो. युकेमध्ये याला सुपर ड्रॉ म्हणतात. तिथे जॅकपॉत हा ५० लाख पाऊंडांच्या आसपास असते.

## लोटो गेम्स

### १. फास्ट लोटो

खेळाडूला १ ते ३१ मधले कुठलेही पाच नंबर निवडून ते घोषित केलेल्या नंबराशी जुळले की दोन लाखांच्या बक्षिसासाठी तो पात्र ठरतो. याचे सात ड्रॉ दर आठवड्याला होतात. ४, ३ आणि २ क्रमांकाच्या जुळणीसाठी बक्षिसं दिली जातात.

### २. सुपर लोटो

हा ६/४९ खेळ आहे. सहाही नंबराशी तिकिटावरचे नंबर जुळल्यास दोन कोटींचं प्राथमिक जॅकपॉट या खेळाडूला मिळू शकतं. ५, ४ आणि ३ नंबर जुळणीसाठीही बक्षिसं दिली जातात. जर कुठल्याच खेळाडूचे सहा नंबर जुळलेच नाही तर या जॅकपॉटची भर पुढच्या आठवड्याच्या जॅकपॉटमध्ये होऊन तो अधिक मोठा होत जातो.

### ३. थंडरबॉल

यात खेळाडूने १ ते ४२ मधले कुठलेही पाच नंबर निवडायचे आणि त्याशिवाय १ ते १५ मधील कुठलाही थंडरबॉल नंबर निवडायचा. जर पाच नंबर आणि थंडरबॉल नंबर विजेत्या क्रमांकाशी जुळले तर खेळाडूला एक कोटीचा जॅकपॉट प्राप्त होतो. कुणीच जिंकलं नाही तर जॅकपॉट पुढच्या खेळात सामील केला जातो. जॅकपॉटशिवाय अवघ्या पाच नंबरांच्या जुळणीसाठीही बक्षिसं असतात. थंडरबॉल अधिक एक क्रमांक, दोन क्रमांक, तीन क्रमांक किंवा चार क्रमांक जुळल्यासही बक्षिसं दिली जातात. तसेच थंडरबॉलशिवाय पाच, चार, तीन क्रमांक जुळणीसाठीही बक्षिसं देण्यात येतात.

अझरबैजनमध्ये हा खेळ ५ + १ लोटो म्हणून खेळला जातो. जिथे पाच साधे नंबर आणि एका गोल्डन नंबराची जुळणी करावी लागते.

काही देशांत त्याला पॉवरबॉल म्हटलं जातं.

अमेरिकेत पॉवरबॉल हा आंतरराज्यीय लोटो गेम म्हणून खेळला जातो. मेगाजॅकपॉट ही या खेळाची खासीयत. प्रत्येक सोडतीत ५३ पांढऱ्या रंगांच्या बॉलमधले पाच बॉल निवडले जातात आणि ४२ लाल रंगांच्या बॉलमधला एक बॉल निवडला जातो. या सोडती बुधवारी आणि शनिवारी खेळल्या जातात.

अमेरिकेतील लोटो पद्धतीची आंतरराज्यीय लॉटरी पुढीलप्रमाणे

### ४. टू बाय टू

१ ते २६ मधले दोन लाल क्रमांक आणि दोन पांढरे क्रमांक खेळाडूला निवडावे लागतात. या लॉटरी अमेरिकेच्या मल्टिस्टेट असोसिएशनतर्फे आयोजित केल्या जातात. या खेळात दरआठवड्याला सहा सोडती असतात. बक्षिसांची रक्कम घोषित क्रमांकांशी जुळणाऱ्या क्रमांकांच्या संख्यप्रमाणे बदलत जाते.

### ५. एनडी हॉट लोटो

२००२ साला नॉर्थ डॅकोटा इथे या लोटोची सुरुवात झाली. या खेळाचं तिकिट अवघ्या एक डॉलरला मिळतं आणि त्याचं बक्षीस १० लाख डॉलर इतकं असतं. खेळाडूला १ ते ३९ या नंबरांमधले ५ नंबर निवडायचे असतात आणि १ ते १९ या नंबरातले हॉट नंबर निवडायचे असतात. हा ड्रॉ बुधवारी आणि शनिवारी पॉवरबॉल ड्रॉनंतर लगेच जाहीर होतो.

### ६. एनडी वाइल्डकार्ड टू

१९९८ साली नॉर्थ डॅकोटातून सुरू झालेली ही लॉटरी अवघ्या एका डॉलरला विकत घेता येते. मात्र खेळाडूला दोन खेळ खेळता येतात. जॅकपॉट एक लाख डॉलर्सचा असतो. खेळाडूला १ ते ३१ मधले ५ क्रमांक निवडायचे असतात आणि वाइल्ड कार्डमधला १ ते १६ नंबरातला एक नंबर निवडायचा असतो.

### ७. मेगामिलियन्स

खेळाडूला १ ते ५२ नंबरातले ६ नंबर निवडायचे असतात. एकूण ९ प्रकारे हा खेळ खेळता येतो आणि त्यांची बक्षिसंही वेगवेगळी असतात.

### पॉवरबॉल मिलिनेअर

अमेरिकेतली १४ राज्य सहभागी असलेला हा झटपट प्रकारातला खेळ आहे. तीन

सहभागी स्पर्धक यात निवडले जातात आणि ते क्रेजी एट्स नावाच्या खेळात सहभाग घेतात.

### स्पायेल गेम्स

स्पायेल गेम हा मूळ साधारणत: लोटो प्रकारच्या लॉटरीच्या खेळाबरोबर पूरक खेळ म्हणून सादर होतो. १९७५ साली जर्मनीत प्रथम हा खेळ सादर झाला. अधिक बक्षिसाच्या आकर्षणाने स्पर्धक या खेळात भाग घेतात. हा खेळ ऑफलाइन किंवा ऑनलाइन खेळता येतो. स्पर्धकाला संगणकाद्वारे नंबरांची एखादी श्रेणी दिली जाते किंवा मग आधीच नंबर प्रिंट केलेलं तिकिट दिलं जातं. स्पाएल गेम हा कॅनडा, युरोप आणि ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेतल्या काही राज्यांमध्ये लोकप्रिय आहे.

### कॉम्प्युटर लॉटरी

भारतात पॅसिव्ह प्रकारच्या लॉटरीला इलेक्ट्रॉनिक रूप देऊन ते विक्रेत्यांच्या दुकानांवर आले जेणेकरून स्पर्धकांना ते कॉम्प्युटरच्या टर्मिनलवर खेळता येईल. यालाच कॉम्प्युटर लॉटरी असं संबोधलं गेलं. काही भाग हा कागदी लॉटरीसारखाच असतो तर उरलेला सोडतीचा भाग कॉम्प्युटर लॉटरीचा असतो.

### जोकर

हा साधा पत्त्याचा खेळ आहे जिथे स्पर्धक इस्पिक, बदाम, चौकट आणि किलवरची पान निवडायची असतात. सोडतीत जाहीर झालेल्या फेस कार्डशी कार्ड जुळणारा विजेता म्हणून घोषित होतो.

### बिन्गो

सध्याचं बिन्गोचं व्हर्शन हे मूळ इटालियन लॉटरीचंच विकसित रूप आहे. जिओको डेल दी इतालिया असं या लॉटरीचं नाव होतं. पहिला खेळ १५३० साली आयोजित केला गेला होता. तेव्हापासून दर आठवड्याला हा खेळ आयोजित होतोय.

लोटोच्या मूळ व्हर्शनमध्ये तिकिटावर तीन ओळी आणि नऊ स्तंभ असायचे. प्रत्येक ओळीत पाच नंबर आणि चार कशाही क्रमाने मोकळ्या जागा असायच्या. नंबर घोषित करणारा एका ९० नंबर असलेल्या बॅगेतून टोकन काढून त्यातला नंबर जाहीर करायचा. जाहीर झालेला नंबर आपल्या कार्डवर आहे की नाही याची पडताळणी स्पर्धकाने करायची असते. ज्याची सर्वात प्रथम ओळ पूर्ण होते तो विजेता ठरतो.

हा खेळ एड लोवे यांनी सर्वप्रथम न्यूयॉर्कमध्ये आणला. त्याने हा खेळ सुक्या बीन्स, रबर स्टॅम्प आणि कार्डबोर्डच्या सहाय्याने आयोजित केला. या खेळात एक जिंकणारी महिला बीन्सना उद्देशून अत्यानंदाने सारखी बिन्गो, बिन्गो असे ओरडत होती. त्यानंतर या

खेळाला बिन्गो हेच नाव पडलं.

हा खेळ लोकप्रिय झाल्यानंतर काही समस्या उद्भवल्या. विल्कसबेअरमधील एका चर्चने स्वत:ला आर्थिक संकटातून सावरण्यासाठी बिन्गोचं आयोजन केलं होतं. त्यासाठी त्यांनी लोवेचा सेटच विकत घेतला. पण प्रत्यक्षात या खेळात अपेक्षेपेक्षा खूप जास्त विजेते निर्माण झाले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात खेळण्यासाठी या खेळात काही बदल करणं गरजेचं ठरलं. लोवेने मग कोलंबिया विद्यापीठातील गणिताचे प्राध्यापक कार्ल लेफलर यांना नव्या मोठ्या प्रमाणात खेळता येईल अशा खेळाचं डिझाइन करायला सांगितलं. त्यात काही क्रमांकांचा समूह पुन्हा येणार नाही याची काळजी घेण्यात आली.

**किनो**

किनो या खेळाचं मूळ चीनच्या हून राजघराण्यात आहे. लेन्ग लेन्गने हा खेळ शोधला त्यानंतर तो लष्करासाठी निधी गोळा करायला वापरला जाऊ लागला. सुरुवातीपासूनच हा खेळ लोकप्रिय राहिला.

मूळ चिनी खेळात १२० चिनी चित्रलिपीतली अक्षरचिन्हं आहेत. ही चिन्हं कन्फुशिअस आणि त्याच्या अनुयायांनी लिहिलेल्या पुस्तकातून घेतलेली आहेत. त्यानंतर या चिन्हांची संख्या ९० पर्यंत मर्यादित करण्यात आली आणि ही मर्यादित संख्या खूप वर्षे टिकली. चीनमधून या खेळाच अमेरिकेत स्थलांतर झालं तेव्हा या अक्षरचिन्हांची संख्या आणखी कमी होऊन ८० वर आली. आणि आजतागायत ती तेवढीच आहे.

हळूहळू चिनी लोकांशिवाय इतरही लोक ही लॉटरी खेळू लागले आणि मग लोकप्रियतेमुळे मूळ चिनी क्रमांक जाऊन त्या जागी अरबी क्रमांक आले. सुरुवातीच्या काळात लाकडी बॉल्सवर नंबर लिहून ते चालकाकडून हातानेच मिक्स केले जायचे. हे बॉल्स मग निवडण्यासाठी एका नळीत यायचे. या नळला नंतर किनो गूज असं नाव पडलं कारण तिचा आकार बदकाच्या मानेसारखा होता. हातानेच बॉल मिसळले जात असल्याने त्यात काही लबाडी होण्याची शक्यता होती. त्यामुळे आता हे नंबर पिन्गपॉन्गच्या बॉलवर छापले जातात आणि हवेच्या झोताने ते मिसळले जातात. मग हवेच्या झोतानेच ते पारदर्शक किनो गूजमधून बाहेर येतात. साधारणत: दोन गूज असतात. आणि प्रत्येकाची १० बॉल धरण्याची क्षमता असते. २० बॉल निवडल्यानंतर खेळ संपतो.

बिन्गो या खेळात विजेता घोषित होईपर्यंत नंबर घोषित करणं चालूच राहतं. पण किनो या खेळात २० नंबर जाहीर केले जातात. आणि त्यात कुणीच जिंकलं नसेल तर लावलेले पैसे कॅसिनोच्या मालकाला जातात. किनोमध्ये कॅसिनोवाल्यांचा मोठा वाटा असला तरीही हा खेळ सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय आहे.

## स्क्रॅच तिकिट

या खेळाला इंस्टंट लॉटरी असंही संबोधलं जातं. नंबर आधीच तिकिटावर असतो फक्त तो लॅटेक्सच्या थराने बंद असतो. हेविया ब्रासिलिनेसिस नावाच्या झाडाच्या चिकापासून ते तयार केले जाते. अनेक ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठीही या तंत्राचा उपयोग करण्यात आला. १९७४ साली मेसेच्युसेट्स हे स्क्रॅच तिकिट लॉटरी काढणारे अमेरिकेतले पहिले राज्य ठरले. १९७३ साली सायंटिफिक गेम्स नावाच्या वैज्ञानिक खेळ निर्माण करणाऱ्या कंपनीतर्फे ही लॉटरी विकसित करण्यात आली. ही संस्थापक कंपनी होती आणि आजही अमेरिकेतल्या स्क्रॅच लॉटरीचा मोठा वाटा या कंपनीला जातो. सायंटिफिक गेम्सने पहिल्या लॉटरीसाठी अडीच कोटी तिकिटं छापली होती. छपाईसाठी त्यांनी तेव्हा शीट-फेड हे तंत्र वापरलं होतं.

१९७८ मध्ये लॉटरी रोमन्दे ऑफ स्वित्झर्लण्ड यांनी सर्वप्रथम युरोपमध्ये स्क्रॅच लॉटरी सुरू केली. १९९ मध्ये त्यांनी युरोपात प्रथम ऑनलाईन लॉटरीही सुरू केली. टॅक्टिलो इलेक्ट्रॉनिक लॉटरी ही इलेक्ट्रॉनिक पद्धतीने स्क्रॅच तिकिट सुरू झाली.

झटपट लॉटरीतही अनेक प्रकार आहेत. काही चिन्हांवर तर काही राशींवरही बेतलेल्या अतात. प्रथम खेळाडूने पाच स्टार स्क्रॅच करायचे असतात. मग दोन स्टारच्या खालील चिन्हं जर सारखी आली तर मग त्याने विनबॉक्समधील स्क्रॅच एरिया खोडायचा आणि काय बक्षीस लागलंय ते पाहायचं. बेल्जिअमच्या कॅब्रियो या लॉटरीत खेळाडूला मुख्य स्क्रॅच तिकिट जिंकता आलं नाही तरी बोनस स्क्रॅच एरियाही मिळतो. काही देशांनी स्क्रॅच तिकिटातच बिन्गोचा प्रकारही मिसळून टाकलाय. या तिकिटाचे दोन भाग असतात. एका भागात स्क्रॅच करायच्या बॉल्सची चित्रं असतात. त्यातून १८ नंबर मिळतात. ते तिकिटाच्या दुसऱ्या भागातल्या बिन्गो नंबरशी जुळतात का ते पाहायचे. हे जुळणारे नंबर बिन्गो कार्डवर मार्क करायचे. नंबर जुळणीच्या पॅटर्नप्रमाणे बक्षिसं मिळतात. प्रत्येक देशाचा स्क्रॅचगेम बक्षिसांच्या रकमेप्रमाणे वेगवेगळा आहे. बेल्जिअममध्ये १६ स्क्रॅच गेम्स आहेत आणि स्वित्झर्लण्डमध्ये १४ आहेत.

### प्रॉबेबिलिटी गेम्स

स्क्रॅच गेम्सप्रमाणेच या गेम्सच्या तिकिटांवर झाकलेले नंबर असतात. प्रॉबेबिलिटी खेळात प्रत्येक तिकिट विजेतं होऊ शकतं, फक्त खेळाडूने योग्य भागीच स्क्रॅच केलं पाहिजे.

### पूल-टॅब गेम्स

पूल-टॅब गेम्स हे झटपट लॉटरीतीलच आणखी एक वैविध्य. या लॅमिनेटेड

तिकिटाच्या पुढच्या भागात लॉटरीविषयी माहिती आणि बक्षिसाच्या रकमेविषयी छापील मजकूर असतो. पाठच्या बाजूला तीन किंवा पाच छोट्या चौकोनात विजेती चिन्हं झाकलेली असतात. त्यावरचं टॅब नखलून आतलं बक्षीस बघायचं असतं. त्याला पिकल्स किंवा ब्रेक-ओपन्स असंही म्हटलं जातं.

### पैजांचे खेळ

बेटिंग अर्थात पैजा हा प्रकार जुना आहे. घोड्यांच्या शर्यती किंवा इतर शर्यतींवर बेटिंग घेतलं जातं. मात्र भारतात घोड्यांच्या शर्यतीवर लॉटरी अस्तित्त्वात नाही. शापूरजी अॅण्ड पालनजी यांच्यासारख्या उद्योगसमूहाने अशा लॉटरीसाठी सरकारकडे संमती मागितली आहे.

### स्पोर्टस् लॉटरी

स्पोर्टस् लॉटरी हा बेटिंग गेम्ससारखाच प्रकार. मात्र फरक एवढाच इथलं बेटिंग हे सामन्यांच्या निकालावर घेतलं जातं. फूटबॉल, टेनिस आणि क्रिकेट हे खेळ बेटिंगमध्ये गुंतलेले दिसून येतात. भारतात मॅचफिक्सिंगच्या काही घटनांच्या शंकेमुळे बेटिंग चालवणाऱ्यांच्या खिशात भरपूर पैसे गेल्याचं बोललं जातं. भारतात क्रीडा लॉटरी अस्तित्त्वात नाही.

### ऑनलाइन गेम्स

लोटो टाइप नंबर गेम्स हे इंटरलिन्क्ड कॉम्प्युटर्सवरही खेळले जातात. याला ऑनलाइन लॉटरी असं म्हटलं जातं. ऑनलाइन लॉटरीबद्दल पुढच्या प्रकरणात विस्ताराने सांगितलेलं आहे.

### कस्टमाइज्ड गेम्स

काही लॉटरी खेळांचे सादरकर्ते स्थानिक रितीरिवाज आणि प्रथांनुसार खेळांची आखणी करतात. उदा. स्वीडन आणि मेक्सिकोमध्ये लॉटरी खेळणारे काही दिवस चालणाऱ्या साधारण ३५ क्रीडा सामन्यांच्या निकालावर बाजी लावतात.

### टेलिव्हाइज्ड गेम्स

इंटरॅक्टिव्ह टेलिव्हाइज्ड व्हिडियो गेम्स हे टीव्ही गेम्सची मजा आणि पारंपरिक लॉटरी यांचं मजेशीर मिश्रण आहे. खेळाडू ऑनलाइन ऑपरेटर्सकडून तिकिटं विकत घेतात आणि टीव्हीवरती लॉटरीचा कार्यक्रम प्रक्षेपित होत असताना सहभागी होतात.

### व्हिडीयो लॉटरी

अनेक जलद गेम्स एकाच उपकरणात इन्स्टॉल करता येतात. कॉइन्स किंवा बिलांच्या

माध्यमातून पैसे भरता येतात. हे खेळ ॲनिमेटेड असतात. पोकर किंवा ब्लॅकजॅक हे खेळही लॉटरीसाठी वापरले जातात.

**कॅसिनो गेम्स**

हे खेळ कॅसिनोमध्ये खेळले जातात. पॅसिव्ह लॉटरी आणि कॅसिनो गेम्समध्ये फक्त किनो हा खेळच कॉमन आहे. काही कॅसिनो गेम्स हे ऑनलाइन खेळांसाठी विकसित केले गेले आहे. लोकप्रिय कॅसिनो गेम्सपैकी ऑनलाइन खेळांमध्ये लोकप्रिय असलेले गेम्स पुढीलप्रमाणे... बॅक्कॅरट, ब्लॅकजॅक, क्रॅप्स, रॉलेट, किनो, स्लॉट मशीन्स, व्हिडियो पोकर, कॅरिबिअन स्टड पोकर, लेट इट राइड, हॉर्स रेसिंग, पै गो पोकर. बॅक्कॅरट, ब्लॅकजॅक, क्रॅप्स, रॉलेट आणि स्लॉट मशीन्स यांना भारतात भरपूर वाव आहे. काही ऑनलाइन लॉटरी ऑपरेटर्सनी याची मागणी नोंदवली आहे.

**१.बॅक्कारट**

हा खेळ इटालीत शोधला गेला. तो नंतर फ्रान्स आणि युरोपमध्ये लोकप्रिय झाला. युरोपातील कॅसिनोंचं हा खेळ म्हणजे मुख्य आकर्षण होता. युरोपियन लोकप्रिय व्हर्शनचं नाव आहे शेमिन दे फर आणि दुसऱ्या व्हर्शनचं नाव आहे बॅक्कारट एन बॅन्क्यूए. बॅक्कारट हा इटालियन बॅकाराचं फ्रेन्च अपभ्रंश आहे. त्याचा अर्थ शून्य असा होतो. कारण या खेळात १० आणि बाकी साऱ्या फेस कार्डचं मूल्य शून्य इतकंच असतं. किती खेळाडू आहेत याला महत्त्व न देता या खेळात फक्त खेळाडूचा आणि बँकरचा असे दोघांचेच हातचे लक्षात घेतले जातात. खेळाडू त्याचे पत्ते खेळतो तेव्हा तो ९ या संख्येच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतो. दश्शा आणि फेसकार्ड्स यांचे मूल्य शून्य पकडले जाते. एक्क्याचे मूल्य १ असते आणि बाकी कार्ड त्यांच्या फेसव्हॅल्यूप्रमाणे गणली जातात.

दोघांकडूनही प्रत्येकी दोन पत्ते  झाकलेले हात म्हणून खेळले जातात. डीलर हा आधी खेळाडूचा हात पाहतो, मग बँकरचा. आधी पहिलाच पत्ता जर नव्वा आला तर त्याला नॅचरल असं संबोधून खेळ संपतो आणि त्या हाताला नॅचरल विजेता म्हणून घोषित केलं जातं. पहिला पत्ता जर ८ आला तरीही तो विजेता म्हणून घोषित होतो, कारण दुसरा पत्ता जर नॅचरल ९ आला तरच त्याला हरवू शकतो. जर दोन्ही पत्त्यांची बेरीज ९ पेक्षा अधिक झाली तर त्या दोन अंकी संख्येचा शेवटचा आकडा मूल्य म्हणून पकडला जातो. समजा ९ आणि ४ असे हात आले तर त्यांचं मूल्य १३ होईल. म्हणजे त्यांचं खरं मूल्य ३ हेच पकडलं जाईल. जर पहिल्या दोन पत्त्यांमध्येच खेळ संपला नाही, तर तिसरा पत्ता खेळला जातो. बॅकारटमध्ये शक्यतो तीन पत्त्यातच खेळ संपतो.

### २. ब्लॅकजॅक

'बीट द डीलर' हे एडवर्ड थॉर्पचं पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर ब्लॅकजॅक किंवा २१ हा खेळ दोन दशकांपासून लोकप्रिय झाला आहे. या पुस्तकात गणितज्ञांचा हवाला देऊन आणि कॉम्प्युटरवरील माहितीच्या सहाय्याने हा खेळ जिंकण्यासाठी विस्तृत आराखडे दिलेले आहेत.

ब्लॅकजॅक हा ५२ पत्त्यांनी खेळता येतो. याला सिंगल डेक गेम असंही म्हणतात. किंवा एकापेक्षा अधिक पत्त्यांच्या डेकने (मल्टिपल डेक गेम) हा खेळ खेळता येतो. या खेळात फेस कार्डांची किंमत १० असते, तर बाकीच्या पत्त्यांची दर्शनी मूल्य कायम असते. एक्क्याला मात्र दोन किमती असतात १ किंवा ११. खेळाडूने ते ठरवायचे असते.

या खेळात डीलर आणि १ ते ७ खेळाडू असतात. डीलर हा कॅसिनोचा प्रतिनिधी असतो आणि तो पत्त्यांचं डिलिंग करतो. सर्व खेळाडूंनी त्यांच्या पैजा लावून झाल्यावर डिलर प्रत्येकी दोन पत्त्यांचा हात झाकलेल्या अवस्थेत खेळतो. तो स्वत:चा हात मात्र एक पत्ता झाकलेला तर एक पत्ता उघड असा खेळतो. जर डीलर किंवा खेळाडू यांना एक्का आणि १० किमतीचं कार्ड मिळालं तर त्यांना एकूण २१ ही किंमत अर्थात ब्लॅकजॅक मिळतो. आणि तो हमखास विजेता होतो आणि ३-२ असा जिंकतो. ज्या खेळाडूची बेरीज १४ होते त्याला हिट बहाल होते आणि तो आणखी एक पत्ता खेळू शकतो. जर तिसऱ्या पत्त्याने त्याची बेरीज ३१ पेक्षा झाली तर तो हरतो. ज्या खेळाडूची बेरीज १७ किंवा १८ होते तो स्वत:ला स्टॅण्ड म्हणून घोषित करतो आणि अतिरिक्त हात खेळत नाही. अगदी जेव्हा २१ ही बेरीज होत नाही, पण खेळाडूची बेरीज डीलरच्या पत्त्यांच्या बेरजेपेक्षा कमी असेल तर खेळाडू हरतो. उदा. खेळाडूच्या पत्त्यांची बेरीज १७ किंवा १८ आहे आणि तो हरतो तेव्हा डीलरच्या कार्डची बेरीज २० असू शकते.

मल्टिपल डेकमध्ये २, ४ किंवा अगदी ६ डेकही वापरले जातात. जागेप्रमाणे खेळाचे नियम बदलू शकतात.

### ३. क्रॅप्स

क्रॅप्स हा अतिजलद आणि रोमांचक खेळ आहे. ब्लॅकजॅकच्या खेळात खेळाडू हा डीलर किंवा कॅसिनोच्या विरुद्ध खेळतो. परंतु क्रॅप्समध्ये खेळाडू डीलरच्या बाजूनेही खेळू शकतो. त्याला राइट बेटिंग म्हणतात. शूटरच्या विरुद्ध खेळण्याला रॉन्ग बेटिंग म्हणतात. क्रॅप्समध्ये अनेक बेटिंग मेथड्स आहेत. जशा पास लाइन/डोन्ट पास लाइन, कम / डोण्ट कम बेट, बाय बेट, ले बेट वगैरे. जर शूटरने पास लाइन बेट लावली असेल आणि त्याने ७ किंवा ११ हे आकडे रोल केले तर त्याने आइण ज्या खेळाडूंनी

पास लाइन बेटवर पैसे लावले असतील ते सारे जिंकतात. जर २, ३ किंवा १२ हे आकडे अवतरले तर शूटर आणि त्याच्या बाजूचे सगळे बाजीगर हरतात. जर इतर कोणता नंबर अवतरला तर त्याला पॉइण्टर नंबर म्हणून घोषित करतात. त्यानंतर कोणत्या नंबरवर खेळाडूंनी पैजा लावल्या आहेत त्यावर खेळ पुढे चालू राहतो.

या खेळात फासा वापरला जातो. त्याला *कॅसिनो डायस* असेही म्हणतात. हे नेहमीच्या फाशांपेक्षा वेगळे असतात. कॅसिनो डायस हे इंचभरापासून ते तीन-चार इंचही मोठे असतात. ते लाल रंगाचे आणि पारदर्शक प्लास्टिकने बनलेले असतात. पारदर्शकता अशासाठी की आत एखाद्या आकड्याच्या बाजूला वजन तर टाकलेलं नाहीना याची खातरजमा व्हावी. सुरक्षिततेचा भाग म्हणून त्यावर कोड नंबरही असतात.

### ४. रॉलेट

रॉलेटचा अर्थ लहान चाक. हा मुळात फ्रेंच गेम आहे. रोमन लोकांना मनोरंजनाचे आणि जुगाराची मुळापासून आवड. त्यामुळे ते रथाचं चाक फिरवून काही जुगाराचे खेळ खेळायचे. रॉलेट हा खेळ सतराव्या शतकात सुप्रसिद्ध फ्रेंच गणितज्ञ पास्कल याने शोधून काढला. १८२० साली या खेळाने इंग्लंडमध्ये प्रवेश केला आणि तिथून हा खेळ अमेरिकेत आला. हा युरोपमधला सर्वात लोकप्रिय खेळ. तीन शतकांच्या वाटचालीत हा खेळ फारसा बदललेला नाही.

रॉलेटच्या चाकाला अनेक आरे असतात. त्याप्रमाणे त्याचे भाग पडतात. युरोपियन चाकाला ३७ भाग असतात आणि अमेरिकेतल्या चाकाला ३८ असतात. या चाकावर १ ते ३६ नंबर असतात. सम-विषम संख्येप्रमाणे त्यांना लाल आणि काळा रंग दिलेला असतो. उरलेल्या भागाला हिरवा रंग असतो. युरोपियन चाकाला शून्य असा नंबर असतो, तर अमेरिकन अडतीसाव्या चाकाला ०० असा नंबर असतो. फिरत्या चाकाच्या आऱ्यांमधून उसळत चेंडू येऊन कोणत्याही भागाच्या खाचेत विसावू शकतो.

इथे खेळाडू डीलरच्या विरुद्ध पैज लावतात. ते एखाद्या नंबरवर किंवा अनेक नंबर्सवर किंवा रंगावरही पैज लावू शकतात. प्रत्येक खेळाडूने आपापल्या नंबरावर पैज लावल्यावर चाक फिरवलं जातं आणि त्यातला चेंडू उसळवला जातो. जेव्हा विजेत्या नंबरवर येऊन चेंडू विसावतो तेव्हा डीलर पैजेप्रमाणे प्रत्येक खेळाडूकडून पैसे घेतो. प्रत्येक चक्राआधी पैज घेतली जाते.

### ५. स्लॉट मशीन

सॅन फ्रान्सिस्कोचा तंत्रज्ञ चार्ल्स फे याने स्लॉट मशीनचा शोध लावला. १८९० सालापासून ही स्लॉट मशीन्स लॉटरी व्यवसायात कार्यरत आहेत. सुरुवातीला ही स्लॉटिंग

मशीन्स बारमध्ये बसवलेली होती. चिन्ह रांगेत आल्यास विजेत्या ग्राहकाला मोफत दारू मिळत असे. यातली चिन्हं ही पत्त्यांच्या खेळातली इस्पिक, किलवर, बदाम, चौकट किंवा मग घंटा, हॉर्सशू, राशीनक्षत्र यांची असतात. सुरुवातीच्या काळात ग्राहकाला दोन हॉर्सशू आणल्यास एक निकेल आणि तीन बेल्स रांगेत आणल्यास दहा निकेल इतकी दारू मिळत असे. त्यामुळे या मशीनला लिबर्टी बेल असंही नाव पडलं.

आजघडीला या स्लॉटिंगमशीन्समध्ये विविध चिन्हांकित तीन रीळं असतात. प्रत्येक रिळात एक जॅकपॉट चिन्हं असतंच. खेळाडूने नाणं टाकून रिळं फिरवायची. ठराविक कॉम्बिनेशन्सना बक्षिसं मिळतात. कॅश हे बटन दाबल्यावर तेवढ्या बक्षिसाची कॉईन्स मशीनमधून खाली पडतात.

हे मशीन पैसे घेताना आणि देताना स्वयंचलित पद्धतीने काम करत असल्याने ते खूपच लोकप्रिय झालं. हर्बट स्टीफन मिल्सने मग स्लॉटिंग मशीनचा अधिक विकसित प्रकार सादर केला. या मिल्स मशीन्सना मोठी हॅण्डल होती आणि हाताळायला ती अधिक सोपी होती. १९३० च्या दशकात या स्लॉटिंग मशीन्सवर बेकायदेशीरपणाचा ठपका होता. एका न्यायमूर्तीने या मशीनला एका हाताचा दरोडेखोर अशी संज्ञा बहाल केली होती. या मशीन्सच्या वापरातून कॅसिनो मालकांनी लाखो डॉलर्सची प्रचंड मिळकत केली आणि हे नाव सार्थ केलं.

सतराव्या शतकात युरोपमध्ये खेळले जाणारे खेळ.

**१. लोटो डाऊफिन**

या खेळात ८ ते १२ बोर्ड असायचे आणि त्यात ९० नंबर असायचे. प्रत्येक बोर्डाला एक युवराज असायचा. चार रंगातल्या वीस सोंगट्या आणि वीस तबकड्या खेळात असायच्या. खेळाडू एक किंवा अधिक बोर्डही घेऊ शकायचा. खेळाडू आपल्या सोंगट्या निवडलेल्या विविध नंबरवर ठेवायचा त्यानंतर तो आपला युवराज रंगीत तबकडीसह त्याच्या आवडत्या नंबरावर ठेवायचा. जर त्याने निवडलेल्या नंबरप्रमाणे नंबर घोषित झाले तर तो खेळाडू जिंकायचा.

**२. लोटो देस मोन्यूमेण्ट्स दे पॅरिस**

या खेळात लिथोग्राफ्ड कार्डस् वापरली जायची. त्यावर पॅरिसमधल्या प्रेक्षणीय स्थळांची रंगीत जलचित्रे असायची. कार्डावरच्या कॉलममध्ये नंबर्स असायचे आणि घोषित नंबराप्रमाणे हे कार्डावरचे नंबर बिन्गोच्या खेळाप्रमाणेच छोट्या पारदर्शी सोंगड्या ठेवून झाकले जायचे.

**३. बिरिबी**

७० नंबर असलेल्या चौकोनांचे एक कार्ड यात वापरले जायचे आणि असेच नंबर असलेली एक चिठ्ठी घडी घालून ऑलिव्हच्या फळात घातली जायची. ऑलिव्हची फळ असलेली थेली झाकायला शिरस्त्राणाचा उपयोग केला जायचा. खेळाडू आपील बाजी लावायचा आणि मग ऑलिव्हची फळं काढली जायची. त्यातल्या चिठ्ठीतल्या सोडतीप्रमाणे विजेता घोषित व्हायचा. विजेत्याला लावलेल्या रकमेच्या ६४ पट रक्कम मिळायची.

### ४. कॅव्हाग्रोल

हा बिरिबीसारखाच खेळ. मात्र खेळाडूला पाच किंवा नऊ नंबरांच्या चौकोनांचे कार्ड दिले जायचे.

### ५. बार लॉटरी

हा खेळ बार किंवा कॅफेमध्ये चक्रावर खेळला जायचा. लोखंडी भोवऱ्यावर एक चाक घट्ट बसवलं जायचं. हा खेळ हाताने रंगवलेला असायचा. यात ग्रामीण निसर्गचित्रं आणि पुराणातले विषय असायचे.

### ६. बॅगाटेली, ककेलोरम आणि तिव्होली

छोटा चेंडू किंवा एखादी रिन्गसारखी वस्तू उतारावरच्या या खेळावर घरंगळत येऊन विसावायची. ज्या नंबरच्या चौकटीत ती विसावायची. हा खेळ म्हणजे आधुनिक पिनबॉल मशीनचा पूर्वज म्हणावा लागेल.

## पैजेचे प्रकार

### १. सिंगल बेट

जेव्हा खेळाडू एकाच सोडतीचं लॉटरी तिकिट काढतात किंवा ऑनलाइन खेळात एकच ड्रॉ खेळतात तेव्हा त्याला सिंगल बेट गेम म्हणतात.

### २. मल्टिपल बेट्स

एकाच वेळी खेळाडू एकापेक्षा अधिक प्रवेशिका घेऊ शकतो. अनेक लोटो पैजा किंवा स्क्रॅच तिकिटांचं पॅकच तो विकत घेऊ शकतो.

### ३. सबस्क्रिप्शन

लॉटरी व्यवस्थापलनातलं एखादं अकाऊंटच खेळाडू उघडतो. लॉटरी चालक मग खेळाडूने निवडलेले नंबर खेळाडूने नेमून दिलेल्या लॉटरीवर लावतो. हा सहभाग वर्गणी संपेपर्यंत चालू राहतो.

### ४. ग्रुप बेट्स

याला सिण्डिकेट पूल बेटिंग असंही म्हणतात. या अनेक खेळाडू एकत्र त्यांचा पैसा अधिक खेळांवर लावतात. त्यामुळे त्यांचे जिंकण्याची शक्यता वाढते. जिंकल्यास बक्षिसाची रक्कम सिण्डिकेट सदस्यांमध्ये विभागून घेतली जाते.

# ऑनलाइन लॉटरीज

जागतिक ऑनलाइन खेळ आता गेली २५ वर्षे परिचित आहेत. ते व्यापारीदृष्ट्या अत्यंत यशस्वी मानले जातात. ऑनलाइन लॉटरीच्या सुरुवातीनंतर लोकांचा सहभाग वाढत गेला. अमेरिकेतल्या ९० टक्के प्रौढांना या ऑनलाइन लॉटरीत सहभाग घेतल्याची आकडेवारी उपलब्ध आहे. ऑनलाइन लॉटरीच्या व्यवसायात अमेरिका ही मोठी बाजारपेठ मानली जाते आणि तिथे आतापर्यंत १५०० लक्षाधीश लॉटरीने निर्माण केले आहेत. इंग्लंडमध्ये ऑनलाइन गेम्स १९९७मध्ये १० हजार आऊटलेटसह सुरू झाले आणि आता या देशात ३६ हजारहून अधिक आऊटलेट्स आहेत. त्यामुळे खेळाडूंचा सहभाग ६० टक्क्यांहून अधिक झालाय असं सहज म्हणता येईल. विकसित देशांशिवाय अनेक विकसनशील देशांतही ऑनलाइन लॉटरी लोकप्रिय आहे. भारत, ब्राझिल आणि फिलिपिन्समध्येही गेल्या काही वर्षात ऑनलाइन लॉटरी झपाट्याने वाढली. जागतिक ऑनलाइन बाजारपेठ ही अंदाजे १२५ अब्ज डॉलर्स इतकी किंवा ६००० अब्ज रुपये इतकी मानली जाते. ही बाजारपेठ अंदाजे १० टक्क्यांनी वाढते आहे. यंदाच्या वर्षात भारतीय ऑनलाइन लॉटरीची बाजारपेठ २५,००० कोटी रुपयांवर जाईल असा अंदाज, प्राइसवॉटरहाऊस कूपर्स या स्वतंत्र सर्व्हेक्षण संस्थेने वर्तवला आहे.

ऑनलाइन लॉटरीने भारतीय बाजारपेठेत मार्च २००२ मध्ये प्रवेश केला. सिक्कीमने सर्वप्रथम ऑनलाइन लॉटरी सुरू केली. सिक्किमचे मुख्यमंत्री श्री. पवनकुमार चामलिंग यांनी ही ऑनलाइन लॉटरी सुरू करण्याचा निर्धार केला होता. एस्सेलग्रुपच्या प्लेविन ही पहिली ऑनलाइन गेमिंग कंपनी जिने भारतात सिक्किमसाठी सुपरलोटो ही ऑनलाइन लॉटरी सादर केली. पहिला सुपरलोटो खेळ हा १ कोटी ८० लाख तिकिटांच्या विक्रमी विक्रीने खेळला गेला. सोडतीनंतर कुणीही जॅकपॉट विजेता ठरला नाही आणि जॅकपॉटची रक्कम पुढच्या स्पर्धेत सामावली गेली. त्यानंतर मे महिन्यात बिमलकुमार गजमार यांनी ८.६१ कोटी रुपयांचा जॅकपॉट जिंकला. करपरती करून त्यांच्या हातात ७.७५ कोटी इतकी रक्कम उरली. ऑनलाइन लॉटरी सुरू करणारं कर्नाटक हे दुसरं राज्य ठरलं.

अनेक देशांमध्ये खेळाडू ऑनलाइन लॉटरीकडे वळले आहेत. भारतातही पुढील पाच वर्षात ऑनलाइन लॉटरी पेपर लॉटरीची जागा घेईल असा अंदाज आहे. पेपर लॉटरीत छापील नंबरांची तिकिटं स्टेशन, बसस्टॉप आणि इतर सार्वजनिक ठिकाणी लॉटरी दुकांनांतून विकली जातात. सोडतीचे निकाल स्थानिक भाषिक वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केले जातात. ऑनलाइन लॉटरी खेळण्यासाठी स्पर्धकाला एखाद्या ऑनलाइन लॉटरी आऊटलेटमध्ये जावं लागतं. नोंदणीनंतर युजरनेम आणि पासवर्ड दिला जातो. खेळाडू त्यानंतर प्ले-स्लीप घेतो आणि त्याने निवडलेले नंबर त्यावर प्रिंट होऊन येतात. त्यात लकी-पिक नावाचा

पर्यायही असतो. त्यात कॉम्प्युटर स्वत:च एक नंबर खेळाडूसाठी निवडतो. या लॉटरी आऊटलेटमधले कॉम्प्युटर हे पॉइण्ड ऑफ सेल किंवा पीओएस टर्मिनल्स म्हणून ओळखले जातात. संपूर्ण देशातले पीओएस टर्मिनल्स हे मुख्य सर्व्हरला जोडलेले असतात. हा सर्व्हर मोठ्या केंद्रवर्ती शहरात असतो. खेळाडूने निवडलेला नंबर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सर्व्हरला कळवला जातो. हे माध्यमं सीडीएमए, व्हीएसएटी (व्हेरी स्मॉल अपार्चर टर्मिनल) किंवा जीपीआरएस (जनरल पॅकेट रेडियो सर्व्हिस) किंवा रेडियो यापैकी कोणतेही असू शकते. हा नंबर, तिकिटाच्या खरेदीचा दिनांक आणि वेळेसह तसेच सोडतीच्या तारखेचा संदर्भ आणि टर्मिनलच्या आयडी क्रमांकासह सर्व्हरला नोंदवलं जातं. मुख्य सर्व्हर हे नंबर लॉक करतो. त्यामुळे इतर कुणीही खेळाडू तो नंबर निवडू शकत नाही. जेव्हा प्लेस्लीप डीलरकडे दिली जाते तेव्हा तो ही प्ले-स्लीप पुन्हा टर्मिनलमध्ये सरकवतो. त्यानंतर त्या प्ले-स्लीपच्या ऐवजी तेच नंबर घेऊन संरक्षककवच असलेली थर्मल-स्लीप प्रिंट केली खेळाडूला दिली जाते.

ऑनलाइन लॉटरीचं तिकिट अगदी शेवटच्या क्षणापर्यंत विकलं जाऊ शकतं. इतर फायदे असे की अतिशय वेगवान खेळ आणि लाइव्ह टेलिव्हिजनवर याची सोडत पाहता येते. त्यामुळे या खेळाला पारदर्शकता बहाल होते. हे निकाल वर्तमानपत्र किंवा ऑनलाइन रिटेल आऊटलेटवरही पाहता येतात. विजेत्या कॉम्बिनेशनशी जुळणारा दावा कुणी केला नाही तर बक्षिसाची रक्कम पुढच्या सोडतीत जमा होते. बाकी बक्षिसाच्या रकमेचा दावा आदी प्रक्रिया पेपर लॉटरीप्रमाणेच असते.

खेळाडूला कुठूनही खेळता येईल अशी सुविधा प्रदान करण्यासाठी ऑनलाइन लॉटरीचे ऑपरेटर खेळाडूला एक स्मार्टकार्ड देतात. अशा स्मार्ट कार्डच्या खरेदीनंतर खेळाडूला १२ आकडी अकाऊंट नंबर मिळतो आणि चार आकडी पासवर्ड दिला जातो. त्याद्वारे खेळाडू फोनद्वारे संपर्क करून ऑनलाइन लॉटरी खेळू शकतो. फक्त हा फोन कॉईन ऑपरेटेड पब्लिक फोन असता कामा नये. लॉटरी ऑपरेटरला टेलिफोनद्वारे तो आपला अकाऊंट नंबर आणि पासवर्ड देऊन लॉगइन होऊ शकतो आणि आपले नंबर फीड करून योग्य त्या ऑनलाइन लॉटरीत सहभागी होऊ शकतो. या व्यवहाराचे तिकिट प्रिंट करून भविष्यातील संदर्भासाठी जतन करून ठेवले जाते. खेळाडूला आपले बक्षीस घेण्यासाठी आपले कार्ड दाखवावे लागते. अशाच प्रकारे हा खेळ मोबाइलद्वारे एसएमएस सुविधा वापरूनही खेळता येतो.

**ऑनलाइन लॉटरीतल्या भारतीय कंपन्या**

भारतीय राज्य सरकारने ऑनलाइन लॉटरी सुरू करताना त्यांना तंत्रज्ञानाच्या सहाय्यासाठी परदेशी कंपन्यांवर हातमिळवणी करण्याची अट घातली गेली. त्यामुळे अनेक भारतीय

कंपन्यांना तांत्रिक सहभागासाठी परदेशी कंपन्यांची मदत घेण्याशिवाय पर्याय नव्हता. भारतीय उद्योगक्षेत्रातील कंपन्यांनी मग जी-टेक, एण्ट्रालॉट, आयएलटीएस, ऑलिव्हिटीसारख्या जागतिक कंपन्यांशी करार करून त्यांची सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर तंत्रज्ञान विकत घेतले.

आपल्या देशातील एक जुनीजाणती लॉटरी कंपनी म्हणून सुगाल ॲण्ड दामाणी यांनी आपले स्रोत विकसित करून स्वत:ची कॉम्पलॉट ही ऑनलाइन लॉटरीपद्धती सादर केली. संपूर्णत: भारतीय बनावटीच्या हार्डवेअर तसेच सॉफ्टवेअरचा अवलंब करून कॉम्प्युटर टर्मिनलवर त्यांनी ही ऑनलाइन लॉटरी सुरू केली. त्यामुळे त्याचे लॉटरीच्या आयोजनाचा खर्च कमी झाला, तसेच अधिक नियंत्रण आणि क्षमतेमध्ये वाढ हे फायदे झाले. त्यांनी महाराष्ट्र आणि पंजाबमध्ये ६००० टर्मिनल्स विकसित केली. स्थानिक खेळाडूंच्या गरजा लक्षात घेऊनच ही कॉम्प्युटर टर्मिनल्स स्वत:च विकसित केली गेली. सुगल ॲण्ड दमानी यांनी विकसित केलेली ही ऑनलाइन लॉटरी जगातल्या कोणत्याही अद्ययावत लॉटरीइतक्या क्षमतेची आहे. अत्याधुनिकता, विश्वासार्हता, लवचिकता, सुरक्षितता या कारणांसाठी ही लॉटरी प्रसिद्ध आहे. सीडीएमए तंत्रज्ञानाचा वापर करून डाटा जोडणारी ही पहिलीच कंपनी.

भारतातल्या इतर उद्योगसमूहांच्या ऑनलाइन लॉटरी पुढीलप्रमाणे... अपोलो इंटरनॅशनल, एस्सारग्रुपची फॉर्च्युन लॉटरी, मार्टिन लॉटरी ग्रुपचे इनलॉट तंत्रज्ञान आणि स्मार्टविन, व्हिडियोकॉन ग्रुपचे धुत एण्टरटेन्मेण्ट, एस्सेलग्रुपची प्लेविन लॉटरी, फोर्ब्ज ग्रुपची लॉटरी डिविजन धनधनाधन, सिक्सो आणि के.के. मोदी ग्रुपची सनशाइन लॉटरी.

# भारतीय लॉटरी

भारतातील लॉटरीची बाजारपेठ साधारण २०००० कोटी रुपयांची असल्याचा अंदाज आहे. एकूण ३० राज्यांपैकी १२ राज्य आणि ७ केंद्रशासित प्रदेश लॉटरी चालवतात. त्यामुळे आपल्या देशात लॉटरी व्यवसायाची बाजारपेठ रुंदावण्यास खूप वाव आहे. अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मिझोराम, नागालॅण्ड आणि सिक्किम ही ईशान्य भारतातील बहुतांश राज्ये त्यांच्या महसुलासाठी लॉटरी व्यवसायावर विसंबून आहेत. कारण त्यांच्याकडे दुसरे स्त्रोत उपलब्ध नाहीत. हरियाणा, पंजाब, केरळ, कर्नाटक आणि महाराष्ट्र ही राज्ये त्याशिवाय लॉटरी व्यवसायात आहेत.

## वसाहतवादी राज्यकर्त्यांकडून चालवल्या गेलेल्या लॉटरी

भारतीय लॉटरीलाही ३०० वर्षांचा इतिहास आहे. पोर्तुगीज आमदनीतच गोव्यात लॉटरी सुरू झाली. कोलकात्यात ब्रिटिश आमदनीत लॉटरी सुरू झाली. आज तामिळनाडू राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जुन्या मद्रास प्रांतात १७०० मध्ये लॉटरीच्या सोडती व्हायची. भारतातील पहिल्या राज्य लॉटरीचा दफ्तरी उल्लेख मात्र लॉर्ड मेकॅर्टिनीच्या कारकिर्दीच्या सुरुवातीला १७८१ साली आढळतो. २६ जानेवारी १७८२ रोजी इंग्लंडला पाठवलेल्या अधिकृत पत्रामध्ये लॉर्ड मेकॅर्टिनी याने नमूद केले होते की 'हैदर अलिच्या सैन्याच्या उधळपट्टीमुळे मद्रास प्रांताली रयत कंगाल झाली असून सरकारी खजिना रिकामा झाला आहे.' त्याने पुढे लिहिले की कौन्सिलचे सदस्य मानधनाशिवाय आपल्या चाकरीतील जबाबदाऱ्या निभावत आहेत. तसेच इंग्लंडमधून पैसे मागवण्यावर निर्बंध असल्यामुळे मेकॅर्टिनीने बंगालकडे कर्जयाचना केली व लॉटरीच्या मार्गाने उत्पन्नाच्या स्त्रोताचाही विचार केला होता. जरी लॉटरीच्या मार्गाने खजिना भरण्याचा त्याचा प्रयत्न फसला तरीही महसूल गोळा करण्यातल्या लॉटरीच्या योगदानाचा तो पहिला प्रयत्न मानायला हवा. त्यानंतर हा मार्ग त्यानंतर अनेकांनी चोखाळला.

एक व्यापारी पीटर मॅसे कसिन याच्या दस्तावेजावरून असे लक्षात येते की त्याने सेंट जॉर्ज किल्ल्यामध्ये व्यापारी वखार बांधण्याचा प्रस्ताव ठेवला होता, ज्याचा खर्च लॉटरीच्या आयोजनातून भागवला जाणार होता. त्याच्या २९ जून १७८७ रोजी सरकारशी झालेल्या पत्रव्यवहारात असे सुचविले, 'ही जागा व्यापारासाठी, लोकांना भेटण्यासाठी आणि त्यांच्यातील कज्जे सोडवण्यासाठी वापरली जाईल. त्याच्या प्रस्तावांना सरकारसंमती मिळाली. मुख्य इंजिनीअर कर्नल रॉस यांना कॅसनने प्रस्तावित वखारीसाठी सुचविलेली जागा अयोग्य वाटल्याने कॅसनने श्रीयुत रॉबर्ट ह्युजेस यांची जागा नव्याने सुचविली. त्याच्या पत्रात त्याने पुढे सांगितले की खाजगी संपत्तीतून घेतलेल्या जागेमुळे प्रस्तावित व्यापारी केंद्राचा खर्च वाढेल त्यामुळे त्याने लॉटरी निधी वाढवण्याचा पर्याय स्वीकारण्याचे

स्वातंत्र्य घेतले असल्याचे नमूद केले. त्याने असंही सुचवलं की मिळालेला पैसा सरकारी खजिन्यात जमा करावा, व पुढच्या लॉटरीच्या सोडतीपर्यंत तो तिथेच ठेवावा. त्यानंतर कराराप्रमाणे बक्षिसांचे वितरण करण्यासाठी तो निधी वापरावा.

त्याच्या सूचना होत्या की एक लाख पॅगोडांचे १० पॅगोडाला एक तिकिट असे १० हजार तिकिटांच्या समभागात विभागणी करावी. पहिलं पारितोषिक ५००० पॅगोडा, दुसरं पारितोषिक २५०० पॅगोडा तर तिसऱ्या क्रमांकांच्या पाच पारितोषिकांना प्रत्येकी १००० पॅगोडा, एकूण दहा चौथ्या क्रमांकाच्या पारितोषिकाला प्रत्येकी ५०० पॅगोडा तर वीस पाचव्या पारितोषिकाला प्रत्येकी २५० पॅगोडा, ५० सहाव्या क्रमांकाच्या पारितोषिकाला १०० पॅगोडा तर १०० सातव्या पारितोषिकाला ५० पॅगोडा आणि ३२१२ आठव्या पारितोषिकांची प्रत्येकी २० पॅगोडा अशी बक्षिसं असावीत. यात सरकारला १०,००० पॅगोडांचा फायदा होतो. आज जिथे फोर्ट म्युझियम आहे तिथे तेव्हा श्री. ह्युजेस यांचं घर विकत घ्यायला हे पैसे वापरता येणार होते.

**मेमोरॅण्डम**

| बक्षीस | क्र | कि. | एकूण |
|---|---|---|---|
| १ | १ | ५००० | ५००० |
| २ | २ | २५०० | ५००० |
| ३ | ५ | १००० | ५००० |
| ४ | १० | ५०० | ५००० |
| ५ | २० | २५० | ५००० |
| ६ | ५० | १०० | ५००० |
| ७ | १०० | ५० | ५००० |
| ८ | २७५० | २० | ५५००० |

२९३८ बक्षिसांची किंमत स्टार पॅगोडा ९०,०००

७०६२ ब्लॅन्क्स

१०,००० तिकिटं

विशेष सूचना सर्वात कमी बक्षीस हे दोन तिकिटांच्या किमती इतकं असावं.

हा मेमोरेण्डम जुन्या मद्रास प्रांताच्या दफ्तरात होता तसाच इथे सादर केला आहे.

मार्च १७९१ मध्ये नेटिव्ह रहिवाशांचा ५० हजार पॅगोडांची मद्रास लॉटरी फंड आयोजित केला गेला आणि हा नफा पुरुषांचा आश्रम तसेच अंध, गरीब आणि अपंगांच्या

कल्याणासाठी बहाल केला गेला.

डिसेंबर १७९१ मधे ५०,०० पॅगोडांची आणखी एक लॉटरी सादर झाली. त्या लॉटरीचा नफा, जे रस्ते सरकारी देखभालीच्या खाली येत नाही त्यांच्या दुरुस्तीसाठी देण्यात आले.

१७९५ आणि १७९६ मध्ये माऊंट रोडसाठी दुरुस्तीकाम हाती घेण्यात आलं. वार्षिक लॉटरीचा नफा या रस्त्यासाठी देणगीदाखल देण्यात आला. आश्रमा तसेच सार्वजनिक हिताचे अनेक प्रकल्प तडीस नेण्यात आले. कॉजवे तसेच पुलाची कामंही त्यातून झाली.

१७९६ साली शंभराहून अधिक स्थानिक ख्रिश्चन रहिवाशांचं एक शिष्टमंडळ चर्चसंबंधी एक मागणी घेऊन आलं. या चर्चचे एक षष्ठांश काम आश्रमाच्या लॉटरीमुळे साकार झालं.

१७९९ साली आश्रम तसेच रस्ता लॉटरीची समितीतर्फे ऑगस्ट १७९५ आणि नोव्हेंबर १७९९ या दरम्यान या लॉटरीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा ताळेबंद दिला आणि या लॉटरीचा कालावधी वाढवून देण्याची विनंती केली. त्यांचा ताळेबंद पुढीलप्रमाणे होता.

| | |
|---|---|
| कॉजवे बांधकामासाठी दिलेली रक्कम | २९१७ |
| पुलाच्या बांधकामासाठी दिलेली रक्कम | २८०६-२१-५६ |
| प्रोटेस्टंट चर्चच्या बांधकामासाठी दिलेली रक्कम | १५०० |
| मदर कंट्री मदतनिधीसाठी दिलेली रक्कम | ५००० |
| लष्करी आश्रमासाठी मोजलेली रक्कम | ६००० |
| मद्रास परिसरात रस्तादुरुस्तीसाठी मोजलेली रक्कम | १२१७० |
| शिल्लक | १२०९-१०-७६ |
| पॅगोडा | ३१६०२-३२-३२ |

पायदळाचे लेफ्टनंट मॅथ्यू कॅम्पबेल यांच्या डायरीतून त्यांनी १८२३ ते १८२८ या कालावधीत त्यांनी त्यांच्या मित्रांशी कोणकोणत्या पैजा मारल्या याची मनोरंजक माहिती मिळते. या पैजा अगदी साध्या होत्या जशा तो पाच वर्षांत इंग्लंडला परतेल की नाही किंवा लेफ्टनंट प्रिचर्ड बँगलोरमधून जाईल का वगैरे. मात्र प्रत्येक पैज म्हणजे एक लॉटरीचं तिकिट होतं. त्यातून त्याकाळच्या लॉटरीचं महत्त्व आणि लोकप्रियता लक्षात येते. फाल्कन आणि कॅम्पबेलच्या डायरी जिथे प्रिंट केल्याह होत्या त्या मेल असायलम प्रेसला लॉटरीचा फायदा दिला गेला. मद्रास प्रांताचे गव्हर्नर सर चार्ल्स एडवर्ड ट्रेव्हलिन यांनी १८५० साली लिहिलेल्या आपल्या पत्रात राज्याने चालवलेल्या लॉटरींची आर्थिकदृष्ट्या सामाजिक कामांसाठी असलेली उपयुक्तता नमूद केली आहे. मद्रास प्रांतात मूर मार्केट (ते नंतर आगीत भस्मसात झाले.) व्हिक्टोरिया पब्लिक हॉल, रिपन बिल्डिंग आणि गव्हर्मेण्ट

म्युझियम थिएटर हे सर्व लॉटरी प्रक्रियेतून बांधले गेले आहे.

या समिती व्यतिरिक्त अनेक इतर सामाजिक संस्थांनाही त्यांच्या प्रकल्पांचे निधी भागवण्यासाठी लॉटरी चालवण्याची परवानगी दिली गेली. अशाचपैकी एक म्हणजे लॉटरी रॅफल. जे सेंट जोसेफ मुलांच्या अनाथाश्रमासाठी चिंगलपेट जिल्ह्यात सुरू झाले. १९२० पासून रॅफल लॉटरी या संस्थेला मदत करत आली आहे. पहिल्या १० बक्षिसांत २०००रुपयांची मोटारकार, ५०० रुपयांच्या हिऱ्याच्या अंगठीपासून ते २० रुपयांपर्यंतच्या बक्षिसांचा समावेश होता. या दहा बक्षिसांव्यतिरिक्त इतर ९९० बक्षिसांची किंमत २ रुपयांपासून ते १० रुपयांपर्यंत होती. विजेत्यांना बक्षिसांऐवजी रोख पैसे घेण्याचीही मुभा होती.

सरकारने त्याकाळी फक्त चांगल्या कामासाठीच लॉटरी चालवण्याची अनुमती दिली होती.

डॉ. कृष्णा रेड्डी यांनी कडप्पा जिल्ह्यात जमीन घेतली होती. कौटुंबिक कलहामुळे या जमिनीची विभागणी करण्यासाठी त्यांनी लॉटरी पद्धतीचा अवलंब करण्याची परवानगी तेव्हा मागितली होती आणि तशी परवानगी त्यांना नाकारण्यात आली.

## मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी लॉटरी

तामिळनाडूमध्ये धार्मिक कारणांसाठी लॉटरीचा उपयोग करण्याचाही ज्ञात इतिहास आहे. सुचिंद्रमचे तानुमलायन हे मंदिर मोडकळीस आले होते. त्रावणकोरचा राजा श्री. अईल्यम थिरुनाल यांनी मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे ठरवले. जीर्णोद्धाराचे काम १८७५ मध्ये सुरू झाले. अर्थात आर्थिक कारणांमुळे काम बंद पडले. उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी ७० हजार रुपयांची आवश्यकता होती. राजाने त्याचा दरबार भरवला तेव्हा वायकोमचे ब्रह्म श्री पाचू मोथाथू यांनी लॉटरीच्या माध्यमातून निधी उभारण्याची कल्पना मांडली. त्यांच्या सल्ल्यानुसार राजाने लॉटरी तिकिटं छापण्याचा आदेश दिला. तेव्हा सोनं ३ रुपये तोळा होतं तेव्हा या तिकिटाची किंमत १ रुपया एवढी होती. ही योजना खूपच यशस्वी ठरली आणि त्यातून ४० हजार रुपये जमले. उरलेले पैसे सरकारने भरून दिले आणि जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाले. लॉटरी महसूल हा १३३५० तोळे सोनं घेण्यासाठी पुरेसा होता. आजच्या हिशेबात सोनं साडेचार हजार रुपये तोळा आहे तेव्हा आज ही रक्कम सहा कोटी इतकी होते.

## लॉटरीची निर्णायक क्षमता

विधायक कामासाठी निधी संकलनाशिवाय लॉटरी सोडतीचा वापर काही निर्णय

तडीस नेण्यासाठीही करण्यात आला. पालिका किंवा पंचायत निवडणुकांमध्ये उमेदवारांना समान मतं मिळतात तेव्हा लॉटरी पद्धतीने ड्रॉ काढून उमेदवार ठरवला जातो. गोव्यातील श्री शांतादुर्गा मंदिरातील आगरशाळेतले फ्लॅट्स हे लॉटरी पद्धतीनेच काढले जातात. विशेषत: माघपंचमी आणि इतर उत्सवाच्या काळात अनेक अर्ज असतात तेव्हा हाच मार्ग अवलंबला जातो.

फेब्रुवारी २००४मध्ये मध्य प्रदेश सरकारने मद्यविक्री दुकानांचे वाटप करताना लिलाव पद्धती काढून घेऊन त्याऐवजी लॉटरी ड्रॉचा वापर केला. त्यामुळे मद्यमाफियांना शह बसला.

## स्वातंत्र्योत्तर लॉटरी

स्वतंत्र भारतातील केरळ हे राज्य लॉटरी सुरू करणारे पहिले राज्य ठरले. अर्थात आधीपासून खाजगी लॉटरी सुरूच होत्या. केरळचं अनुकरण मग इतर राज्यांनीही आपल्या विशिष्ट कारणांसह केलं. काही राज्यांनी त्यांच्या आर्थिक स्त्रोतांची व्याप्ती वाढवण्यासाठी तर काहींनी सट्टा आणि मटकासारख्या अनधिकृत जुगाराला आळा घालण्यासाठी तर काहींनी समाजकल्याण योजनांसाठी आर्थिक निधीसंकलनासाठी म्हणून लॉटरीचा अवलंब केला. ७० च्या दशकाच्या सुरुवातीला तामिळनाडूने अंध मदत निधी तसेच भिकाऱ्यांच्या मदतीसाठी निधीसंकलनासाठी लॉटरी सुरू केली. भारत–पाक युद्धानंतर संरक्षण दलाच्या मदतीसाठीही त्यांनी लॉटरीचे आयोजन केले. राजस्थाननेही सामाजिक कार्यांना मदत देण्यासाठी भगवान महावीर विकलांग सहायचा समितीतर्फे लॉटरीचे आयोजन केले. कारणं काहीही असोत मात्र लॉटरी लोकप्रिय झाली ही वस्तुस्थिती आहे. भारतात वित्त खात्याच्या अखत्यारित लॉटरी संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकारतर्फे लॉटरी चालवली जाते.

## लॉटरीची कार्यपद्धती

पेपर लॉटरीच्या कार्यपद्धतीत रेखाटन, छपाई, कागदपुरवठा, तिकिटांच्या पावत्या, तिकिटांची विक्री, सोडतीचे आयोजन, निकालांची प्रसिद्धी, विजेती तिकिटांची स्वीकृती, विजेत्या तिकिटांची सत्यता पडताळणी, बक्षिसांच्या रकमेचे वितरण, सोडतीच्या हिशेबाचे परीक्षण, न विकलेल्या तिकिटांचे लगदाकरण, दावा न केलेल्या बक्षिसांची रक्कम सरकारजमा करणे आणि त्या लॉटरीचे हिशेब खाते पूर्णत्वास नेणे.

**भारतात लॉटरी तीन प्रकारात मोडतात.**

१. केंद्र सरकारकडून चालवलेली लॉटरी.
   सध्या केंद्र सरकारकडून कोणतीही लॉटरी चालवली जात नाही.

२. राज्य सरकारकडून चालवलेली लॉटरी

३. केंद्र वा राज्य सरकारकडून स्वीकृत केली गेलेली खाजगी लॉटरी.

पहिले दोन प्रकार भारतीय घटनेच्या केंद्रीय यादीत ४० व्या नोंदीच्या अंतर्गत येतात तर खाजगी लॉटरी ही राज्य घटनेच्या यादीत ३४ व्या नोंदीच्या अंतर्गत येते. अनेक धर्मादाय आणि वैद्यकीय लॉटऱ्या या तिसऱ्या वर्गात मोडतात. १८७० सालापासूनच भारतीय दंड विधानाच्या परिच्छेद २९४ (अ)नुसार राज्य सरकारच्या परवानगीशिवाय आयोजित केलेली लॉटरी हा गुन्हा मानला जातो.

आर.एम.डी.सी. प्रकरणी, सर्वोच्च न्यायालयाने कलम १९ (१)(जी) नुसार लॉटरीला व्यापारी दर्जा देण्याच नकार दिला आणि विशेष प्रकारची आर्थिक प्रक्रिया म्हणून लॉटरी ग्राह्य धरण्याचा प्रयत्न बाद ठरवला.

## १. सरकारी कायदे

एक खेळ म्हणून लॉटरीच्या संदर्भात केंद्र तसेच राज्य सरकारांनी अनेक कायदे अधिग्रहीत केले. १९९८ सालापर्यंत राज्य लॉटरीसाठी काही कायदेच नव्हते. राज्याला लॉटरीसाठी कलम २५८(१) नुसार राष्ट्रपतींच्या आदेशावर विसंबून राहणं गरजेचं होतं. एच अनराज विरुद्ध महाराष्ट्र राज्य या खटल्याच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की संसदेने राज्य लॉटरीसाठी कोणतेही कायदे केलेले नाहीत त्यामुळे राज्य सरकारने परवानगी मागण्याची आवश्यकता नाही. एप्रिल १९९४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्य लॉटरीच्या आयोजनाच्या दृष्टीने काही तपशीलवार खुलासा केला. त्यातले राज्य सरकारांनी पुढे कार्यवाहीसाठी घेतलेले काही तपशील पुढीलप्रमाणे.

(अ) राज्य सरकारचा लोगो आणि बोधचिन्हं लॉटरीच्या तिकिटावर छापणं गरजेचं आहे.

(ब) राज्य सरकारने लॉटरी तिकीट विक्रीसाठी एखादा किंवा अनेक वितरक किंवा विक्री दलाल नेमणं आवश्यक आहे.

(क) तिकिटांच्या विक्रीतून आलेली रक्कम ही सरकारच्या निधीत जमा व्हायला पाहिजे.

(ड) सोडती या राज्य सरकारकडून संचालित होणं गरजेचं आहे.

(ई) दावा न केलेल्या बक्षिसांचा पैसा पुन्हा राज्य सरकारच्या निधीत जमा व्हायला पाहिजे.

या तरतुदी १९९८च्या लॉटरी नियमन कायद्यात सामावल्या गेल्या आणि या कायद्याची घटनात्मक वैधताही सर्वोच्च न्यायालयाकडून प्रस्थापित केली गेली.

### ३. लॉटरी एक मालमत्ता

लॉटरीच्या तिकिटाची खरेदी आणि विक्रीसंदर्भात दोन प्रकारचे हक्क खरेदीदाराला बहाल करण्यात आले आहेत.

१. सोडतीत सहभागी होण्याचा हक्क आणि

२. बक्षीस लागल्यास त्यासाठी दावा करण्याचा हक्क.

लॉटरीच्या तिकिट विक्रीने खरेदीदाराकडे लॉटरीत सहभागी होण्याच्या हक्कांच्या स्थानांतराबरोबर इतर सारे लाभदायक हेतूही बहाल होतात, हे न्यायालयाने लक्षात घेऊन त्यामुळेच हा  व्यवहार हा मालाचे स्थानांतरण या कक्षेत येऊन बक्षिसाच्या रकमेचा प्रत्यक्ष दावा करण्याचा हक्कही खरेदीदाराला प्रदान करतो. न्यायालयाने माल म्हणून स्थानांतर हे भारतीय राज्य घटनेतील क्रमांक २ च्या यादीतील ५४ व्या नोंदीप्रमाणे विक्री कराला धार्जिणे ठरते, हेही नमूद केले.

### ३. लॉटरीचे वितरण

लॉटरी वितरक किंवा एजंट होण्यासंबंधीच्या शर्ती राज्य सरकारने घोषित केलेल्या आहेत. हे निर्देश हे राज्य सरकारप्रमाणे वेगवेगळे असू शकतात. या निर्देशांमध्ये वयाची मर्यादा, राहण्याचे ठिकाण, किमान विविक्षित तिकिटं उचलण्याची प्राथमिक क्षमता इत्यादी. गोष्टी येतात. तिकिटाच्या दर्शनी मूल्याप्रमाणे कमिशन घेण्याची मुभा एजंटला देण्यात येते. विविध राज्यांमध्ये ५ टक्क्यांपासून ते ४० टक्क्यांपर्यंत कमिशनची व्याप्ती वेगवेगळी आहे. जेव्हा एखादा एजंट ट्रेझररीकडून तिकिटं विकत घेतो तेव्हा तो आपलं कमिशन वजा जाऊन तेवढीच रक्कम ट्रेझररीला देतो. एजंटने विकलेलं तिकिट बक्षीसपात्र ठरल्यास एजंट बक्षिसाच्या रकमेच्या विशिष्ट टक्क्यांइतका बोनस मिळण्यासही पात्र ठरतो. विकली न गेलेली तिकिटे बक्षीसपात्र ठरत नाहीत. जेव्हा सोडतीत विक्री न झालेल्या तिकिटाचा क्रमांक निघतो तेव्हा ती सोडत पुन्हा घेतली जाते. जोपर्यंत विक्रीस गेलेल्या तिकिटाच्या नंबराशी जुळत नाही तोपर्यंत ड्रॉ पुन्हा पुन्हा होत राहतो. काही ठिकाणी विकल्या न गेलेल्या तिकिटाचा क्रमांकही सोडतीसाठी ग्राह्य धरला जातो. ही विकली न गेलेली तिकिटं विक्रेत्याच्या मालकीची गणली जातात. अशा तिकिटांपैकी केवळ एकच तिकिट एखाद्या विशिष्ट सोडतीच्या बक्षिसासाठी पात्र ठरते. आणि जर एकापेक्षा अधिक विक्री न झालेल्या तिकिटांना बक्षिसं जाहीर झाल्यास सर्वात जास्त किमतीच्या बक्षिसाचीच रक्कम तिकिटधारकाला मिळते. सर्वसाधारण प्रथा अशी आहे की अशा न विकलेल्या तिकिटांच्या बक्षिसांसाठी एक वितरक नेमून टेण्डर पद्धती अवलंबली जाते.

## ४. तिकिटाची छपाई

निविदा पद्धतीने एखाद्या व्यक्तीला किंवा कंपनीला तिकीट छपाईचे हक्क बहाल करण्यात येतात. छपाईमध्ये तिकिटाचे रेखाटन आणि डिलिव्हरी ही कामंही अंतर्भूत असतात. जे लॉटरी तिकिटासाठी आपला निविदा पाठवतात ते सिक्युरिटी प्रिंटर्स म्हणून नोंदणीकृत असणं गरजेचं आहे. या निविदेसाठी दोन प्रकारे बिड करता येते. वित्तीय बिड आणि तांत्रिक बिड. तांत्रित बिडमध्ये कंपनीच्या कर्मचाऱ्यांची क्षमता, श्रेणी वगैरे गोष्टी येतात, तसेच प्रिंटिंग प्रेसबद्दल विस्तृत माहिती येते. राज्य सरकारच्या लॉटरी संचालनालयातर्फे सिक्युरिटी प्रेसची तपासणी केली जाते. लॉटरी तिकिटाची बनावट तसेच त्यातील खोडसाळ बदल केले जाऊ नयेत यासाठी अनेक संरक्षक उपाय योजले जातात. कराराप्रमाणे या तिकिटांचा विमा उतरवला जातो. एकदा तिकिटांची डिलिव्हरी झाली की छपाईच्या काळात अर्धवट छपाई झालेले किंवा छपाईदरम्या उरलेलेल्या कागदी कचऱ्याची सरकारी प्रतिनिधींच्या उपस्थितीत योग्य निर्देशाप्रमाणे विल्हेवाट लावली जाते.

## ५. बक्षीस रचना

तिकिटं साधारण वेगवेगळ्या मालिकांमध्ये आणि सहा नंबरांमध्ये छापली जातात. या मालिका इंग्रजी आद्याक्षरांवर बेतलेल्या असतात. नंबर ०००००० ते ९९९९९ या दरम्यान असतात. त्यानुसार प्रत्येक मालिकेत फक्त १० लाख तिकिटं छापली जाऊ शकतात.

सोडतीच्या पुढील प्रक्रियांनुसार बक्षीस विजेते निश्चित केले जातात.  उदा. काही खेळांमध्ये पहिलं पारितोषिक हे केपी ८२५६१९ या सहा नंबरांचं पण विशिष्ट मालिकेतलं असू शकतं. (संदर्भासाठी परिशिष्ट क्र. ३ पहा.) काही काही खेळात उत्तेजनार्थ पारितोषिके त्याच क्रमांकाला पण विविध मालिकांमध्ये जाहीर केली जातात. जसे केडी ८२५६१९, केएल ८२५६१९ आणि केएफ ८२५६१९. साधारणतः दुसऱ्या पारितोषिकासाठी तीन विजेते क्रमांक काढले जातात, मात्र तेही वेगवेगळ्या मालिकेचे असतात आणि सहा नंबरांचे असतात. तिसऱ्या पारितोषिकासाठीही हीच प्रक्रिया अवलंबल जाते, मात्र काही वेळा तिसऱ्या बक्षिसांचे तीन किंवा पाच विजेते असू शकतात. चौथ्या आणि पाचव्या बक्षिसाला विजेत्यांची संख्या वाढत जाते. मात्र सहाऐवजी शेवटचे पाचच नंबर लक्षात घेतले जातात. तसंच मालिकाही विचारात घेतली जात नाही. यानंतरची बक्षीसं चार किंवा तीन नंबरांवरच काढली जातात. सोडतीचा निकाल हा सरकारी गॅझेटमध्ये तसेच काही स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये जाहीर होतो.

### ६. बक्षिसांसाठीचा दावा

५००० रुपयांपर्यंतची पारितोषिकं तिकिट जमा करून एजंट किंवा जिल्हा लॉटरी कार्यालयातून मिळवता येतात. बक्षीसासाठी सोडत जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दावा करावा लागतो. जर बक्षिसांची रक्कम जास्त असेल तर लॉटरी संचालनालयात अर्ज करून बक्षिसांसाठी दावा करावा लागतो.

भारतात अवघे १८ टक्के लोक लॉटरी खेळतात. पैकी केवळ ८ टक्के लोक नियमित लॉटरी खेळतात. पेपर लॉटरी अजूनही भारतीय लॉटरी व्यवसायात आपला सिंहाचा वाटा मिळवून आहे. केंद्र सरकारने १९९९चा लॉटरी नियमन कायदा रद्द करून संपूर्ण देशातील लॉटरी व्यवसायावर बंदी घालण्याचा प्रयत्न केला. या निर्णयाचा विरोध करताना अनेक राज्यांनी या व्यवसायातून मिळणाऱ्या महसूल आणि रोजगाराच्या मुद्द्यावर भर दिला. त्यामुळेच संपूर्ण बंदीऐवजी लॉटरी व्यवसायाचं नियमन केलं जावं असा पवित्रा लॉटरी व्यावसायिक तसेच राज्य सरकारांनी घेतला.

# भारतातील राज्य लॉटरी

## अरुणाचल प्रदेश

अरुणाचल प्रदेशातील लॉटरी १९८० सालापासून सुरू झाली. प्राथमिक पातळीवर राज्य सरकारने काही सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून लॉटरी व्यवसाय विकसित करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर लॉटरीच्या वैधतेच्या अनुषंगाने काही समस्या निर्माण झाल्याने अरुणाचल सरकारने स्वत:च लॉटरी चालवायला सुरुवात केली. लॉटरी त्यामुळे वित्त मंत्रालयाच्या अखत्यारित आली. अरुणाचल प्रदेशात सप्टेंबर २००३ नंतर ऑनलाइन लॉटरी सुरू झाली.

## कर्नाटक

कर्नाटक राज्य लॉटरीची सुरुवात १९६९ साली झाली. म्हैसूनर सेल्स इंटरनॅशनल लिमिटेड, ही शासकीय अधिपत्याखालील कंपनी एकमेव एजंट होती आणि लॉटरीवर बंदी येईलपर्यंत कारभार पाहात होती.

ही लॉटरी प्रथमपासूनच लोकप्रिय होती. १९८५ साली सरकारने लॉटरीवर सेल्स टॅक्स लावला होता. नुकताच गॅम्बलिंग टॅक्स जाहीर झाल्यावर सेल्स टॅक्स मागे घेतला गेला. सेल्स टॅक्सचा महसूलच ५० ते ६० लाखांच्या आसपास होता.

कर्नाटकातला लॉटरी व्यवसाय हा त्या राज्य सरकारसाठी जोरदार बिझनेस आणत होता. जुलै २००४ मध्ये लॉटरीवर बंदी येईपर्यंत ऑनलाइन आणि पेपर लॉटरी मिळून कर्नाटक सरकारला ३०० कोटींचा महसूल सालिना बहाल करत होता. कर्नाटकातली ऑनलाइन लॉटरी तर कमालीचा व्यापार करत होती. ऑनलाइन चालकांनी तर पहिल्याच वर्षी राज्य सरकारला १०० कोटींचा महसूल देऊ केला होता. हा इतर कोणत्याही ऑनलाइनपेक्षा जास्त महसूल होता. हा पैसा कर्नाटकातल्या शाळांमधल्या अक्षरादासोहा या दुपारच्या जेवणाच्या योजनेसाठी वापरला गेला. हा ३०० कोटींचा प्रकल्प सर्व सरकारी शाळांच्या विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण पुरवतो. पण सध्याच्या बंदीमुळे सरकारला आता दुपारच्या जेवणासाठी इतर निधीकडे मोहरा वळवावा लागला. फेब्रुवारी २००४मध्ये कर्नाटक सरकारने भूतान आणि सहा इतर राज्यांतल्या लॉटरीच्या कर्नाटकातील विक्रीवर बंदी आणली. त्यामागचं कारण असं होतं की या सरकारांनी राज्य लॉटरी कायदा, १९९९ च्या नियम २० प्रमाणे सर्व दस्तावेजांचे पूर्तीकरण केलेले नव्हते. न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर मार्च २००४ रोजी ही बंदी उठवली गेली.

म्हैसूर सेल्स इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनीने अनेक लॉटरी योजना जाहीर केल्या होत्या. म्हैसूर मल्लिगे आणि कर्नाटक लक्ष्मी हा साप्ताहिक ड्रॉ खूपच लोकप्रिय होता.

कर्नाटकातल्या लॉटरीच्या योजना, बक्षीस रचना आणि तिकिट छपाई आदी बाबी राज्य सरकार आणि एमएसआयएलचे सदस्य ठरवतात. बंपर ड्रॉ आणि प्रथम व द्वितीय क्रमांकाचं बक्षीस हे तिकिटांच्या विक्रीनंतरच ठरवलं जातं.

## केरळ

डीसी किळ्ळकेमुरी हे केरळातल्या लॉटरीचे संस्थापक. कोट्टायमच्या बालवाचनालयासाठी त्यांनी १९६६ साली लॉटरीचे आयोजन केले होते. तिकिटाची किंमत एक रुपया होती आणि बक्षीस होते ॲम्बॅसेडर कार. विजेतं तिकिट घोषित करण्यासाठी ड्रॉ मशीनचा वापर करण्यात आला. तेव्हाचे मुख्य न्यायाधीश श्री. शंकर आणि फॅक्टचे व्यवस्थापकीय संचालक श्री. एम. के. के. नायर यांनी सोडती काढल्या. या लॉटरीतून सव्वाचार लाख रुपये मिळाले. त्यांनतर किळ्ळकिमेरू यांनी  रशियातील भारतीय राजदूत के. पी. एस. मेनन यांच्या मध्यस्थीने या लॉटरीला सरकारची संमती मिळवली. त्यांनी मग ४.८५ लाख मिळवले. त्यांनी त्यानंतर साहित्यिक पारितोषिकासाठी निधी उभारण्यासाठी आणखी एका लॉटरीचं आयोजन केले. कोट्टायम म्युनिसिपल कौन्सिल आणि बॅसिलिस कॉलेज यांनीही त्यानंतर हा मार्ग चोखाळला. कळ्ळकेमुरी सांगतात की त्यांनी आयोजित केलेली लॉटरी काही पहिली लॉटरी नव्हती. क्विलॉनमधल्या एका महिला संघटनेने अशाप्रकारे प्रथम लॉटरीचे आयोजन केले होते. दरम्यान आरोग्य खात्यानेही त्यांच्या कुटुंबकल्याण सेवेसाठी अशा प्रकारच्या लॉटरीचे आयोजन केले.

त्यानंतर कामगार वर्गाचं पिळवणूक करणाऱ्या खाजगी बेकायदेशीर लॉटऱ्यांचं पेवच फुटल्याने केरळ राज्य सरकारने स्वत:च लॉटरीचं आयोजन करायला सुरुवात केली. यामागची बुद्धी अर्थात त्यावेळचे वित्तमंत्री श्री. पी. के. कुंजूसाहेब यांची होती. त्यामुळे १९६७ मध्ये राज्य लॉटरीचं खातं निर्माण केलं गेलं आणि श्री. सय्यद महम्मद हे त्याचे पहिले संचालक होते. या काळात श्री. केळ्ळकेमुरी यांचा सल्ला लॉटरीच्या संचालनासाठी महत्त्वाचा ठरला. केळ्ळकेमुरी यांनी केवळ लॉटरीच्या सोडतीसाठी सल्लाच दिला नाही तर त्यांनी तयार केलेलं ड्रॉ मशीनही त्यांनी सरकारला सुपूर्द केलं.

लॉटरी करविभागाच्या अखत्यारीत येते. एजंटांची नोंदणी, नूतनीकरण, ५००० रुपयांपर्यंतच्या बक्षिसांचे वितरण हे जिल्हा लॉटरी कार्यालयाच्या अखत्यारित येते. लॉटरीवरचं एकूण नियंत्रण, बक्षीसं, एजंट वगैरे राज्य लॉटरी संचालनालयाच्या अख्यत्यारित येतं. सुरुवातीला फक्त एकच साप्ताहिक लॉटरी होती. सध्या चैतन्य, पेरियार, कैरळी आणि सुभाग्य असे चार साप्ताहिक ड्रॉ होतात. ठराविक काळाने बंपर ड्रॉचेही आयोजन केले जाते. त्यांच्या बक्षिसांची रक्कम साधारण ५० लाख ते १ कोटीपर्यंत जाते. तिकिटांची किंमत साधारण २०, ३० आणि ५० रुपये इतकी आहे. तिकीटं सरकारी किंवा इतर सिक्युरिटी प्रेसवर

छापली जातात. सरकार न्यायाधीशांचे पॅनेल निर्देशित करते. त्यांच्या निगराणीखाली लॉटरीचे ड्रॉ काढले जातात. २००३ साली संपलेल्या आर्थिक वर्षात केरळच्या लॉटरीचा एकूण महसूल १३९ कोटी इतका होता, तर प्रत्यक्ष नफा १३.४५ कोटी इतका होता. ऑनलाइन लॉटरीच्या आगमनानंतर पेपर लॉटरीची विक्री २० टक्क्यांनी कमी झाली.

**हरयाणा**

हरयाणाची राज्य लॉटरी १९६८ साली अस्तित्त्वात आली. हरयाणा पेपर लॉटरीचे आयोजन करते आणि त्यावर विक्री कर लादला जातो.

**मिझोराम**

अतिरिक्त निधीस्त्रोतासाठी मिझोरामची राज्य लॉटरी मार्च १९८६ मध्ये सुरू झाली. सामाजिक विधायक उपक्रम तसेच क्रीडा उत्कर्षासाठी लॉटरी उत्पन्नाचा उपयोग केला गेला. २००३ च्या आर्थिक वर्षात ५.५ कोटींचा महसूल मिझोरामला मिळाला. मिझोरामच्या वित्तविभागाच्या अंतर्गत लघुबचत शाखा लॉटरीचं आयोजन करते.

**नागालॅण्ड**

नागालॅण्ड राज्य लॉटरी संचालनालयाच्या स्थापनेबरोबरच नागालॅण्डमधली लॉटरी १९७२ साली अस्तित्त्वात आली. नागालॅण्डच्या लॉटरीच्या वितरणासाठी संचालनालयाने भारतभरासाठी एकच वितरक नेमला. डिसेंबर २००२ मध्ये डिपार्टमेण्टने ऑनलाइन लॉटरीही सुरू केली. नागालॅण्डमध्ये उत्पन्नाचा दुसरा कोणताही ठोस मार्ग नसल्याने त्यांच्या निधीचा स्त्रोत म्हणून लॉटरी हे अतिशय महत्त्वाचे साधन आहे.

**पंजाब**

पंजाबची राज्य लॉटरी १९६९ मध्ये सुरू झाली. बेकायदेशीर मटका आणि सट्टा यांना पायबंद घालण्यासाठी वित्तविभागाच्या अखत्यारित लॉटरी संचालनालयाची स्थापना झाली. राज्य सरकारसाठी अधिकाधिक महसूल निर्माण करण्याचाही उद्देश त्यात होताच. आजघडीला लॉटरी विभाग पंजाब सरकारला १५० कोटींचा महसूल प्रतिवर्षी उपलब्ध करून देतो. विविध पेपर लॉटरींसाठी बक्षिसासाठी रक्कम ८० ते ९० टक्क्यांच्या घरात आहे. संचालनालयाने आता इंटरनेटच्या सहाय्याने कॉम्प्युटर टर्मिनलवर तिकिटं विकण्याची पूर्ण मुभा एकमेव विक्री एजंटला दिली आहे. पंजाब राज्य लॉटरीने बम्पर लॉटरी योजनाही राबवली असून त्याची बक्षीसं १०० रुपयांपासून ते दोन कोटींपर्यंत आहेत. या योजनेचं वैशिष्ट्य म्हणजे पहिलं बक्षीस नेहमी विकल्या गेलेल्या तिकिटांमधूनच निश्चित होतं. बम्पर लॉटरीतून पंजाब सरकारला २० कोटींचे उत्पन्न मिळते.

सध्या लॉटरी कार्यरत नसलेली काही राज्य

**गोवा**

गोव्यातली लॉटरी पोर्तुगीजांनी प्रोवदेरिया दी असिस्टण्ट पब्लिकासाठी निधीपुरवठा म्हणून सुरू केली. खाजगीरित्या कार्यरत असलेली प्रोवदेरिया आजही सुरू आहे. अनाथाश्रम, वृद्धाश्रम आणि आर्थिकदृष्ट्या मागासांना मदत असा सामाजिक विधायक कामांसाठी हा महसूल उपयोगात आणला जायचा. गोव्याची लॉटरी ही कोकणपट्टीत लोकप्रिय होती. स्वातंत्र्यानंतरही ही लॉटरी त्याच संस्थेतर्फे सुरू होती. गोव्याचं केंद्रशासित प्रदेश हे स्थान जाऊन ते राज्य बनले तेव्हा नव्या सरकारने गोवा राज्य लॉटरी सुरू केली.

**हिमाचल प्रदेश**

अतिरिक्त महसूल स्त्रोत विकसित करण्यासाठी हिमाचल प्रदेश सरकारने १९७९ साली नूतनवर्षारंभी लॉटरी सुरू केली. त्याआधी काही खाजगी चालकांची लॉटरी हिमाचलमध्ये सुरू होती. मात्र त्या १९९९पर्यंत बंद झाल्या.

फेब्रुवारी २००४ मध्ये राज्य सरकारने आंतरराज्य लॉटरींवर बंदी आणली.

**मणिपूर**

मणिपूर राज्य सरकारकडे पेपर आणि ऑनलाइन अशा दोन्ही लॉटरी कार्यरत होत्या परंतु आता सरकार एकही लॉटरी योजना राबवत नाही.

**तामिळनाडू**

मद्रास शहरात सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिशांनी लॉटरी सुरू केली होती. फोर्ट सेंट जॉर्ज म्युझिअमची वास्तू १७९५ साली बांधण्यात आली. वरचे सभागृह हे लॉन्ग रूम किंवा पब्लिक एक्स्चेंज हॉल म्हणून गणले जाते. इतर अनेक गोष्टींबरोबरच या सभागृहात लॉटरींचेही आयोजन होत असे.

तामिळनाडू रॅफल्स योजना म्हणून हल्ली प्रसिद्ध असलेली लॉटरी ही दिवंगत मुख्यमंत्री सी. एन. अण्णादुराई यांनी १५ ऑगस्ट १९६८ साली सुरू केली होती. अनेक सामाजिक उपक्रमांसाठी निधी पुरवठ्याच्या उद्देशाने ही लॉटरी सुरू केली गेली. सप्टेंबर १९७५ ते ऑगस्ट १९७६ या काळात ही लॉटरी एक वर्षासाठी स्थगित केली गेली होती. त्यानंतर ती पुन्हा सुरू करण्यात आली. जानेवारी २००३ साली पूर्ण राज्यभर लॉटरीवर बंदी आणली गेली. बंदी अंमलात येण्याआधी तामिळनाडू राज्याच्या व इतर राज्यांच्या लॉटरीच्या विक्री करांतून येणाऱ्या महसूलाची वार्षिक रक्कम ७० कोटी इतकी होती.

**त्रिपुरा**

त्रिपुराच्या डाव्या आघाडीच्या सरकारने कोलकातास्थित एका कंपनीच्या सहकार्याने

आपल्या राज्यातही १९७८ साली लॉटरी सुरू केली. १९८३मध्ये वादंग झाल्याने ही लॉटरी बंद करण्यात आली.

**पश्चिम बंगाल**

पश्चिम बंगालमधल्या लॉटरीची सुरुवात स्वातंत्र्यपूर्व काळातच झाली होती. १८०३ लॉर्ड वेलस्ली याने शहरांतील रस्ते तसेच सार्वजनिक इमारतींच्या बांधकामांसाठी सुधारणा समितीची स्थापना केली होती. या समितीने लॉटरीच्या माध्यमातून निधी उभारला. या समितीचे नाव १८१७ मध्ये लॉटरी कमिटी असे बदलण्यात आले. १८१३ साली बांधलेला टाऊन हॉल हा बेंगॉल लॉटरी फंडमधून उभ्या राहिलेल्या अनेक वास्तूंपैकी एक आहे.

मद्रासमध्ये १७८८ मध्ये थॉमस पॅरी याचे आगमन झाले. आजही त्याच्या नावाने पॅरी’ज कॉर्नर नावाचे ठिकाण अस्तित्त्वात आहे. या पॅरीनेच त्याच्या इतर व्यवसायांसोबत बेंगॉल लॉटरी विकण्याचा व्यवसाय केला होता.

खाजगी लॉटऱ्या तेव्हाही कार्यरत होत्या. त्यातली विशेष उल्लेख करावी अशी डॉन बॉस्को चॅरिटीज या लॉटरीने धर्मादाय कामांसाठी लॉटरीचा निधी उभा केला. सरकारने १९७० साली आपली लॉटरी सुरू केली. १९८४ मध्ये सरकारने विक्री कर लादला.

इंग्लिश हेरिटेज, लंडन रिजनचे संचालक फिलिप डेव्हीस हे सरकारला कोलकात्याच्या पुरातत्त्व वारसा जपण्यासाठी मदत करत आहेत. त्यांनी अशा जतनकार्यासाठी हेरिटेज लॉटरीचे आयोजन करावे असा प्रस्ताव मांडला आहे.

# जागतिक लॉटरी

## ऑस्ट्रेलिया

### पश्चिम ऑस्ट्रेलिया

लॉटरीवेस्ट ही पश्चिम ऑस्ट्रेलियाची राज्य सरकारी लॉटरी. पूर्वी याच लॉटरीला दी लॉटरीज कमिशन ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया असं म्हटलं जायचं. ऑस्ट्रेलियातील सरकारी संस्थांच्या मार्गदर्शनाखाली लॉटरीवेस्ट काम करते.

लॉटरी महसूलाचं वितरण हे लॉटरीज कमिशन ॲक्ट १९९० प्रमाणे होतं. २००३ साली लॉटरीवेस्टने लॉटरीच्या विक्रीच्या माध्यमातून ४९१ दशलक्ष डॉलर्स (३४० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) कमावले. त्यांनी १४३.९ डॉलर्स इतकी रक्कम समाजार्याला, ७५.१ दशलक्ष डॉलर्स आरोग्य क्षेत्राला, ९.४ दशलक्ष डॉलर्सचे अनुदान एकूण १५०९ धर्मादाय संस्थांना दिले. या संस्थांमध्ये सर्फ लाइफ सेव्हिंग, सी सर्च ॲण्ड रेस्क्यू, अबोरिजिनल कॉर्पोरेशन, लॅण्डकेअर ग्रुप्स या पश्चिम ऑस्ट्रेलियातील संस्थांचा तसेच हेरिटेज कन्झर्व्हेशन या प्रकल्पाचा समावेश होता.

प्रत्येक राज्याची स्वत:ची लॉटरी आहे. अपवाद फक्त व्हिक्टोरिया, तस्मानिया आणि नॉर्दन टेरिटरीचा, तिथे टेस्टरसाल्सद्वारे लॉटरी चालवली जाते. झटपट स्क्रॅच गेम्सपैकी आऊटबॅक ॲडव्हेन्चर, सॉकर पूल्स आणि कॅश ३ हे खेळ लोकप्रिय आहेत.

### दक्षिण ऑस्ट्रेलिया लॉटरी ( साल )

दक्षिण ऑस्ट्रेलियाने १९६७ साली आपल्या लॉटरीची स्थापना केली. त्यांचं घोषवाक्यच होतं, 'मेकिंग विशेस कम ट्रू' तुमच्या इच्छा वास्तवात आणणारी लॉटरी. दक्षिण ऑस्ट्रेलियाचं लॉटरी कमिशन स्थापण्यासाठी राज्याच्या संसदेकडून विधेयक संमत झालं आणि मगच ही लॉटरी सुरू झाली.

दक्षिण ऑस्ट्रेलिया आणि न्यू साऊथवेल्स ही १९७० साली इन्स्टंट गेम्स सुरू करणारी पहिली राज्यं. इतर राज्यांनी इन्स्टंट गेम्स सुरू करायला ८० चं दशशक उजाडावं लागलं. इन्स्टंट स्क्रॅच मनीगेम्स सालनेच पुढाकार घेतला. १९८४ साली या झटपट लॉटरीज सादर झाल्या. १९८९ च्या जानेवारीत एकूण विक्री १ अब्ज डॉलर्स एवढी वाढली. १९९४ साली सालने ईझीप्ले क्लबची स्थापना केली. क्लबने इतर अनेक गोष्टींबरोबरच खेळाडूंच्या बक्षिसांच्या संरक्षणाची व्यवस्थाही सुधारली.

### गोल्डन कॅसकेट लॉटरी कॉर्पोरेशन

क्वीन्सलॅण्डची गोल्डन कॅसकेट लॉटरी ही सरकारी प्रकारातलीच लॉटरी आहे. गेली

८५ वर्षे ती कार्यरत आहे. या लॉटरीची वार्षिक उलाढाल ७२१ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स इतकी आहे. २०० दशलक्ष डॉलर्सचं उत्पन्न सरकारला मिळतं. त्यातून अनेक सामाजिक उपक्रमांना निधी मिळतो. १९१६ साली सुरू झआलेल्या या लॉटरीने पहिल्या महायुद्धातील सैनिकांसाठी असलेल्या क्वीन्सलॅण्ड पॅट्रिऑटिक फंडसाठी सर्वप्रथम निधी उपलब्ध करून दिला. पहिला ड्रॉ १९१७ साली काढला गेला. तेव्हाचं बक्षीस होतं ५००० स्टर्लिंग पौंड. अर्थात तेव्हा रोखीत बक्षीस देण्याची पद्धत नव्हती. त्यामुळे सोन्याची कॅसकेट (छोटी संदूक) दिली जायची. नंतर या कॅसकेटच्या मोबदल्यात कॅश दिली जायची.

सध्या ही लॉटरी गोल्ड लोट्टो, ओझेट लोटो, पॉवरबॉल, इन्स्टंट गेम्स, द पूल अ‍ॅण्ड कॅस्केट अशा खेळांचं आयोजन करते.

या खेळांवर किंवा आंतरराज्यीय खेळांवरही इथलं राज्य सरकार कोणताही कर लादत नाही.

गोल्डन कॅसकेट लॉटरीची मदत द मदरहूड, बालकल्याण निधी आणि हॉस्पिटल्सना मोठ्या प्रमाणावर होते. शिवाय बुश नर्सिंग असोसिएशन, ९५ सुतिकागृह, १५० मुलांची क्लिनिक्स, क्रेश, किंडरगार्टन, टीबी सैनिकांची गृहयोजना, मेटर चिल्ड्रन हॉस्पिटल ट्रस्ट, कॅन्सर कॅम्पेन कमिटी आणि ऑस्ट्रेलियन सनिकांचा फंड, विधवा व त्यांच्या कुटुंबासाठी बांधलेल्या अ‍ॅन्झा कॉटेजेस यांना या लॉटरीचा फायदा मिळाला. सार्वजनिक हॉस्पिटल्समध्ये मोफत वैद्यकीय सेवा गोल्ड कॅसकेट लॉटरीद्वारे पुरवल्या जातात.

त्याशिवाय क्वीन्सलॅण्ड विद्यापीठ, रेड क्रॉस, सर्फ लाइफ सेव्हिंग असोसिएशन, स्सिटर एलिझाबेथ केनी पोलियो क्लिनिक्स आणि क्वीन्सलॅण्ड परफॉर्मिंग आर्टस् कॉम्प्लेक्स हे लॉटरी निधीचे लाभार्थी आहेत.

**व्हिक्टोरिया**

व्हिक्टोरियाच्या लॉटरी कार्यवाहीची जबाबदारी टेटरसॉल स्वीप कन्सल्टेशन या संस्थेवर आहे. टेटरसाल ही ऑस्ट्रेलियातली सर्वात मोठी खाजगी कंपनी १९८१ मध्ये स्थापन झाली. संस्थापक जॉर्ज अ‍ॅडम्स याने १९८१ मध्ये सिडनी कपवर एका स्वीप लॉटरीचं आयोजन केलं होतं. बँक ऑफ व्हॅन डायमेन्स लॅण्डमधलं संकट आणि तस्मानियन अर्थव्यवस्थेची ढासळती गत यात जॉर्ज अ‍ॅडम्सने आपला व्यवसाय वृद्धिंगत करता आला.

टॅटरसाल आता शनिवारच्या हॅट्स लोटो, आयोजित करते. बुधवारी टॅटसलोटो, पॉवरबॉल, ओझेट लोटो, सुपर६६, द पूल्स, टॅटल किनो आणि इन्स्टंट स्क्रॅचीस, सुपरलोटो हा शनिवारच्या टॅटलोटोचा पूरक खेळ आहे. या ड्रॉ मशीन्सना सहा कंपार्टमेंट

असतात. प्रत्येक कंपार्टमेंटमधअये १० बॉल असतात. प्रत्येक कंपार्टमेंटमधून एक बॉल काढला जातो आणि सहा कंपार्टमेंटमधले ६ बॉल क्रमाने सहा नंबरांची सुपर ६६ ही लॉटरी सोडत काढतात.

टेटरसाल्स कंपनी त्यांच्या लॉटरी फंडमधून ६०० दशलक्ष डॉलर्स (४१५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स)एवढी देणगी देते. जॉर्ज ॲडम्सच्या इच्छापत्राप्रमाणे टेटरसाल्स लॉटरीचा मोठा हिस्सा गंभीररित्या आजारी मुलांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, तसेच गरजू मुलांचा निवारा, शिक्षण तसेच अपंग मुलांची काळजी यासाठी दिला जातो. जगभर मानवतावादी दृष्टीकोनातून या लॉटरीतर्फे मदत दिली जाते.

व्हिक्टोरिया लॉटरीची मदत रॉयल चिल्ड्रन्स हॉस्पिटल, व्हेरी स्पेशल किड्स, रॉयल डिस्ट्रिक्ट नर्सिंग सर्व्हिस, आल्फ्रेड हॉस्पिटल, वेस्ट विमेरिया हेल्थ सर्व्हिसस मेण्टर हेल्थ फाऊंडेशन, गॅण्डरा पॅलिएटिव्ह केअर युनिट, नॉर्थर्न हॉस्पिटल, सेंट व्हिन्सेण्ट हॉस्पिटल आणि पीटर मॅक्कॅलम कॅन्सर इन्स्टिटयूट या संस्थांनाही जाते.

रेड क्रॉस, केअर ऑस्ट्रेलिया, एमएस सोसायटी ऑफ व्हिक्टोरिया, रायडिंग फॉर द डिसएबल्ड असोसिएशन, सेव्ह द चिल्ड्रन, हार्टली लाइफकेअर, मॅली फॅमिली केअर आणि टीएलसी फॉर किड्स, या संस्थांनाही मदत केली जाते.

**न्यू साऊथ वेल्स**

१९३१ च्या जागतिक मंदीच्या काळात या सरकारी लॉटरीची स्थापना झाली. जॅक लॅन्ग यांच्या नेतृत्त्वाखालील राज्य सरकारने तेव्हा लॉटरीचा निर्णय घेतला. सरकारी हॉस्पिटल्सच्या निधीसाठी तेव्हा पैसा हवा होता. लॉटरी सादर झाल्यानंतर लोकांनी अक्षरशः रांगा लावून लॉटरीत सहभाग घेतला. पिटमधल्या हर मॅजेस्टीज थिएटरमध्ये पहिली सोडत सादर झाली. ॲटर्नी जनरल यांनी एक लाख लाकडी गोट्यां एक गोटी निवडून काढली, आणि सोडतीला सुरुवात झाली.

१९५७ साली या लॉटरीच्या फंडातून सिडनीच्या ऑपेरा हाऊसचं बांधकाम झालं. २ लाख डॉलर्सच्या बक्षिसासाठी १० डॉलरचं तिकिट ठेवण्यात आलं होतं. १९७९ मध्ये लोटो सादर करण्यात आली आणि तेव्हापासून तो सर्वात लोकप्रिय खेळ म्हणून स्थान टिकवून आहे. या खेळातून आतापर्यंत ५०० दशलक्षांची कमाई झाली आहे. १९८२ झटपट स्क्रॅच लॉटरी सादर झाली. या लॉटरीतला एक तृतीयांश हिस्सा सरकारला जातो. ६० टक्क्यांहून अधिक रक्कम बक्षीस म्हणून जाते. १९८२ मध्ये ड्रॉ काढण्यासाठी रॅण्डम नंबर जनरेटर सादर झाला. १९८८ नंतर ऑनलाइन लॉटरी सादर झाली.

राज्य सरकार सुमारे १६०० आऊटलेट्सच्या माध्यमातून तिकिटं विकते. दरवर्षी

बक्षीस म्हणून ६०० दशलक्ष डॉलर्स राज्य सरकार देते. स्क्रॅच लॉटरीमध्ये फन फ्लॉवर्स, पिन्क पॅन्थर, फॅरो बिन्गो, मोनोपोली, विन फॉर लाइफ आणि ब्रिटिश ट्रेझर अशा लॉटरीज आहेत.

### अझरबैजन

अझरबैजन रिपब्लिकची लॉटरी सुरू करण्यासाठी नोव्हेंबर २००१ मध्ये तिथल्या राष्ट्राध्यक्षांनी कायदा केला. त्यानंतर अझरलॉटरिया नावाची लॉटरी सादर केली. आर्थिक विकास विभागाच्या मंत्रालयामार्फत या लॉटरीची स्थापना झाली आणि राज्यपातळीवरील समिती या लॉटरीचे आयोजन करते.

या खेळातली कमीत कमी ५० टक्के रक्कम ही बक्षिसासाठी ठेवलेली असते. ५० हजार मनातपेक्षा कमी रक्कम वितरकांकडून दिली जाते. त्यापेक्षा जास्त रक्कम लोटो याविम कंपनीकडून दिली जाते. ड्रॉ काढण्यासाठी कास्क्स किंवा लोटोट्रॉन मशीनचा उपयोग केला जातो. टीव्हीवर सोडतींचे थेट प्रक्षेपण केले जाते.

अझरलॉटरिया इन्स्टंट लॉटरी क्विझिल कैसे आणि ऐले सेविन्ची, जिस्मत अकारी आणि उगुर्लू रिगेम हा नंबर गेमही आयोजित करते. या सगळ्या खेळांच्या बक्षिसांमध्ये पैसे, मालमत्ता, गाड्या यांचा समावेश असतो. लोकांचा रस वाढावा म्हणून वेगवेगळ्या पातळीवर उत्तेजनार्थ अनेक बक्षीसं या लॉटरींमध्ये आहेत. त्यामुळे नव्या कल्पनां सतत मांडल्या जातात आणि लोकांना त्या प्रसिद्धी माध्यमांद्वारे कळवल्या जातात.

### बेल्जिअम

बेल्जिअमची वसाहत कॉन्गो इथल्या आर्थिक डबघाईमुळे खरं तर बेल्जिअमची लॉटरी सुरू झाली. चार्ल्स ब्रेकविलने बजेटमधली तूट लॉटरीच्या माध्यमातून भरून काढण्याचं ठरवलं आणि मे १९३४ मध्ये तसा कायदाही अस्तित्त्वात आणला. या वसाहत लॉटरीची पहिली सोडत सर्क्यु रॉयल इथे ऑक्टोबर १९३४ मध्ये काढली गेली. या लॉटरीच्या व्यवस्थापन समितीच्या निरीक्षणाप्रमाणे मात्र ही लॉटरी तितकीशी यशस्वी ठरू शकली नाही. खूपच जास्त तिकिटं छापली गेली आणि त्यानंतर समितीला त्या प्रमाणात तिकिटं विकता आली नाहीत. या समस्येचं निराकरण करण्यासाठी काही पावलं उचलली गेली.

१९३४ च्या काळातली वर्तमानपत्रं, रेडियो, सिनेमा ही सगळी माध्यमं त्यासाठी वापरली गेली. मान्यवर रचनाकारांना बोलावून तेव्हा पोस्टर्स, पत्रकं आणि तिकिटं तयार करून लोकांना आकृ,ट करण्याचा प्रयत्न केला गेला. कमी तिकिटं छापली गेली आणि तिकिटांची किंमतही निम्म्यापर्यंत आणून ठेवली गेली. त्यामुळे अपेक्षित प्रतिसाद मिळा. १९४०

मध्ये या वसाहत लॉट रीने ५०० दशलक्ष फ्रॅन्क्सचा व्यवसाय केला. पैकी ६० टक्के रक्कम बक्षीस म्हणून वाटली गेली आणि उरलेली रक्कम युद्धात जायबंदी झालेल्या सैनिकांच्या नॅशनल चॅरिटी आणि अशाच २० संस्थांना देणगीदाखल दिली गेली.

आजघडीला नॅशनल लॉटरीची तिकिटं पुस्तकालयं, पोस्ट ऑफिस, सर्व्हिस स्टेशन्स, सुपरमार्केट, कॅफे, वर्तमानपत्रांचे स्टॉल्स इत्यादी ठिकाणीही मिळतात. नॅशनल लॉटरी अनेक झटपट खेळांचंही आयोजन करते. अॅस्ट्रो, कॅब्रिओ, क्लिओपॅट्रा, कोर्सो, लोक्सो, हेड्स ॲण्ड टेल्स, प्रेस्टो, शूट गोल, सुबिते आइण विन फॉर लाइफ हे काही झटपट खेळ आहेत. काही कसिनोही झटपट खेळ सादर करतात. पैकी ब्लॅकजॅक, जॅकपॉट, क्रॅप्स आणि रॉलेट हे खेळ लोकप्रिय आहेत. तीन प्रकारच्या लॉटरी सोडती इथे काढल्या जातात. नॅशनल लॉटरीची साप्ताहिक उलाढाल १८,७५०,००० युरो इतकी आहे.

नॅशनल लॉटरीतून मिळणाऱ्या नफ्याच्या वितरणासाठी ग्रॅण्ट्स विभागाची स्थापना करण्यात आली. हे वितरण शाही आदेशानुसार होतं. राजाकडूनच वितरणाचा प्रस्ताव मंत्र्यांकडे जातो. या नफ्यातला मोठा भाग हा विकासाच्या कामासाठी विकसनशील देशांकडे जातो. राजकीय आश्रयाला आलेले, तसेच संक्रमित झालेल्या लोकांसाठी, गरिबीच्या उच्चाटनासाठी, संशोधनासाठी या लॉटरीने फ्लेमिश, फ्रेन्च आणि जर्मन भाषा बोलणाऱ्या लोकांनाही मदत केली आहे. नॅशनल डिझॅस्टर फंड, किंग बोडोविन फाऊंडेशन, थर्ड वर्ल्ड सर्व्हायव्हल फंड, स्पेशल ऑलिंपिक्स, क्वीन एलिझाबेथ संगीत स्पर्धा, रेड क्रॉस, चाइल्ड फोकस आणि रिसेप्शन सेंटर टू कॉम्बॅट ट्रॅफिकिंग ऑफ ह्यूमन्स या संस्थाही या लॉटरीच्या लाभार्थी ठरल्या.

एका वेगळ्या योजनेखाली प्रसिद्धी होतूने नॅशनल लॉटरी अनेक कार्यक्रमांना पुरस्कर्ता या नात्याने आपलं पाठबळ बहाल करते. दी ग्रॅण्ड प्रिक्स आणि सायकलिं स्पर्धा, वॅलून, पिनोसरॅमी ग्रॅण्ड प्रिक्स, मूज मॅरेथॉन, व्हॅन डॅम मेमोरिअल ॲथेलॅटिक्स, क्रॉस कप-क्रॉस कंट्री स्पर्धा, मोटोक्रॉस चॅम्पिअनशिप, बेल्जिअम व्हीलचेअर टेनिस ओपन, बेल्जिअम माऊंटन बाइकिंग कप, इंटरनॅशनल ट्रायथलन या क्रीडास्पर्धांना नॅशनल लॉटरी पुरस्कर्ता म्हणून पाठबळ दिलं जातं. काही सांस्कृतिक कार्यक्रमांनाही ही लॉटरी पुरस्कार देते. संगीत, सिनेमा-नाट्य ते प्लॅस्टिक आर्टस्पर्यंत, तसेच साहित्यिक क्षेत्रात 'एस्पेस जिनिअस ऑथर' ही लेखकांची स्पर्धा, त्याचप्रमाणे चिनी कथा महोत्सव, जॅझ, रॉक, लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीत यांचे महोत्सव-स्पर्धा, फाइन आर्टस्, फिल्म्स अशा विविध क्षेत्रांना पुरस्कर्ता म्हणून या लॉटरीचा निधी उपलब्ध होतो.

### कंबोडिया

कंबोडिया लॉटरी कॉर्पोरेशन लिमिटेडची स्थापना १९९२ मध्ये झाली. वित्तविभाग

आणि परकीय गुंतवणुकीच्या राष्ट्रीय समितीच्या देखरेखीखाली या लॉटरीचे आयोजन केलं जातं. सीएलसी ७ आकड्यांच्या खेळाच्या लॉटरीचे आयोजन मुख्यत्वे करते. उदा. मॅग्नम, सीएलसी, फोनम, पेन्ह नंबर, वॉरिसन, व्हिएतनॅम आणि फॉर्च्यून, ६/२९ लोटो, ३६ फ्लॉवर्स ही चिनी खेळाची आधुनिक आवृत्ती या काही लॉटरी इथे खेळल्या जातात. जुलै २००३ मध्ये लास वेगासच्या विनविन गेमिंग इनकॉर्पोरेशनच्या सहयोगाने पे डे नावाची पहिली स्क्रॅच तिकिट लॉटरीही इथे सादर झाली.

## कॅनडा

अॅटलांटिक लॉटरी कॉर्पोरेशन (एएलसी)

१९७६ मध्ये चार अॅटलांटिक प्रांतांच्या सरकारांची मिळून अॅटलांटिक लॉटरी कॉर्पोरेशन स्थापन झाली.

न्यू ब्रिन्सविक, नोवा स्कॉटिया गेमिंग कॉर्पोरेशन, प्रिन्स एडवर्ड आयलण्ड लॉटरी कमिशन, न्यू फाऊण्डलॅण्ड आणि लॅब्राडो हे एएलसीचे समभागधारक आहेत.

एएलसी सुरुवातीला बराच काळ ए १ नावाचा एकच लॉटरी खेळ सादर करत होती. मात्र काही गोष्टी सर्वप्रथम करण्याचा मान एएलसीलाच जातो. त्यांनी कॅनडात सर्वप्रथम स्पाएल हा खेळ सादर केला. या खेळाचं स्थानिक नाव आहे टॅग. व्हिडियो लॉटरी तसेच कॉम्बो इन्स्टंट किंवा पूल टॅब तिकिटांची लॉटरीही कॅनडानेच सर्वप्रथम प्रत्यक्षात आणली. ट्वाइस लकी हा एका बाजूने लॉटरी खेळ तर दुसऱ्या बाजूने टॅब तिकिटाचा प्रकारही त्यांनी आणला. टिक-टॅक-टो नावाचा झटपट खेळ कॅनडात १९८३ साली सर्वप्रथम सादर झाला. त्यानंतर लोटो ५०, ६/४९ लोटो, बान्को स्क्रॅच, बिन्गो, किनो, सेट फॉर लाइफ स्क्रॅच आणि पे डे हे खेळ यथावकाश सादर झाले.

एएलसीने बँक व्हॅलिडिटी नावाचा एक अभिनव प्रकारही सुरू केला. त्यामुळे लॉटरीच्या तिकिटांचे बक्षीस विजेते थेट नोवा स्कॉटिया बँकेकडे बक्षिसांसाठीचा दावा करू शकतात. २५० डॉलर्सपर्यंतची बक्षिसं विक्रेत्याकडे, १० हजार डॉलर्सपर्यंतची बक्षिसं बँक ऑफ नोवा स्कॉटियाकडे आणि त्यापेक्षा अधिक रकमेची बक्षिसं एएलसीच्या कार्यालयात मिळू शकतात.

## ब्रिटिश कोलंबिया कॉर्पोरेशन ( बीसीसी )

बीसीसी ही ब्रिटिश कोलंबियामध्ये लॉटरीचं आयोजन करणारी मध्यवर्ती संस्था. १९७४ साली स्थापना झाल्यापासून या लॉटरीतर्फे सामाजिक, धर्मादाय तसेच पुरस्कृत उपक्रमांना ६ अब्ज डॉलर्सचं योगदान मिळालं आहे.

या सरकारी लॉटरीचं आयोजन सरकारच्या क्रीडा धोरण आणि अंमलबजावणी शाखेमार्फत होतं. लॉटरी आणि कॅसिनोतून येणाऱ्या उत्पन्नातून सुमारे ५८०० धर्मादाय आणि सामाजिक संस्थांना आतापावेतो १३२ दशलक्ष डॉलर्सची मदत केली गेली आहे. प्रतिवर्षी ४ दशलक्ष डॉलर्सचा महसूल ही लॉटरी मिळवते.

१९९१ साली कॉर्पोरेशनने स्वयंचलित ड्रॉ मशीन्स सादर केली. बीसीसीच्या वैशिष्ट्यपूर्ण लिव्हिंग लार्ज लॉटरी विशेष लोकप्रिय आहेत. २० डॉलर्सच्या या लॉटरी तिकिटाचे तीन भाग असतात. स्वतंत्ररित्या हे भाग तीन पर्यायांमध्ये परिवर्तित करता येतात. बोनस इंटरनेट कॉण्टेस्ट, अर्ली बर्ड ऑप्शन आणि मेन ड्रॉ हे हे तीन पर्याय आहेत. ६/४९ लोटो, बीसी ४९, डेली ३, सुपर ७, किनो आणि चेसर हे इतर लॉटरी खेळही सादर केले जातात.

**चीन**

१९४९ साली चीन प्रजासत्ताकाची स्थापना झाली तेव्हा तिथल्या नव्या सरकारने लॉटरीवर बंदी आणली. १९८७ साली झटपट लॉटरीच्या आयोजनाला मुभा दिली गेली. आता अत्याधुनिक उपकरणं आणि सॉफ्टवेअर्स यांच्या सहयोगाने चीनची लॉटरी वृद्धिंगत झाली असून रशिया तसेच राष्ट्रसंघाच्या काही स्वतंत्र देशांमध्येही चीनची लॉटरी लोकप्रिय आहे.

चायना सोशल वेलफेअर लॉटरी आणि चायना स्पोर्टस् लॉटरी अशा दोन लॉटऱ्यांचे संयोजन चीनमध्ये केले जाते. २००० साली केलेल्या एका अभ्यासानुसार दोन वर्षात ११ अब्ज युआन इतकी विक्री या सोशल वेलफेअर लॉटरीने करून दाखवली आहे. १९८७ च्या सुरुवातीच्या विक्रीच्या तुलनेत ही वाढ ६५० पट अधिक आहे.

१९८७ पासून चीनच्या कल्याणकारी लॉटरीने १० अब्ज युआनचं योगदान दिलं आहे. त्यातून ८१ हजार कल्याणकारी योजनांना आर्थिक बळ मिळालं. या योजनांमध्ये १०३ संस्था या बालकल्याणासाठी झटणाऱ्या आहेत. शिवाय २००० अपंग मुलांच्या उपचारासाठीही या लॉटरीतूनच निधी उपलब्ध होऊ शकला. २००१ साली वृद्धांसाठीही एका निधीचं आयोजन कल्याणकारी लॉटरीने केलं. चीनमधल्या १५ हजार बेरोजगार तरुणांना तिकीटविक्रीच्या कामामुळे रोजगार उपलब्ध झाला आहे.

सुरुवातीला या लॉटरीची बक्षिसं कार किंवा घरगुती उपकरणांच्या स्वरूपात दिली जात होती. मात्र त्यातून अपेक्षित महसूल मिळत नव्हता. १९९९ साली नागरी मंत्रालयाने बक्षिसांच्या रकमा रोखीत वितरित करण्याचा आदेश दिला.

चीनच्या ॲथेलिट खेळाडूंच्या प्रशिक्षणासाठी आवश्यक निधी या लॉटरीतूनच उभा

राहिला. त्यामुळे २८ सुवर्णपदकांची कमाई चीनचे खेळाडू ऑलिम्पिकमध्ये करू शकले. २००२ साली चीनने वर्ल्ड कप फुटबॉलच्या अंतिम फेरीत धडक मारल्यानंतर वर्ल्ड कप लॉटरीचेही आयोजन केले गेले होते.

१९९९ मध्ये ऑनलाइन लॉटरीचे संयोजन करणअयासाठी शांघाय फेन्गकई लॉटरीची स्थापना झाली. २००२ मध्ये इलेक्ट्रॉनिक लॉटरीची संकल्पना सादर केली गेली. त्यामुळे खेळाडूंना फोनवरूनही तिकिटं मागवता येणं शक्य झालं. बीजिंगच्या स्थानिक टॅक्स ब्युरोने रिसिट लॉटरीही सादर केली. ग्राहकांनी माल खरेदी केल्यानंतर त्यांच्याकडे ज्या पावत्या जमा होतात, त्यावर ही लॉटरी खेळली जाते. या लॉटरीमुळे ग्राहक आपल्या खरेदीची पावती आवर्जून घेऊ लागले आणि त्यामुळे व्यापाऱ्यांच्या करचुकवेगिरीला आळा बसला.

मे २००४ साली फसवणुकीचं एक प्रकरण झाल्यामुळे लॉटरी संयोजनावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. दोन महिन्यांनी स्क्रॅच तिकिटांच्या सादरीकरणासह हे निलंबन उठून लॉटरी पुन्हा पूर्ववत सुरू झाली.

**सायप्रस**

सायप्रस सरकारची लॉटरी १९५८ मध्ये अस्तित्त्वात आली. १९६०-६१ साली स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात लॉटरीवर निलंबनाीच कारवाई झाली होती. त्यानंतर त्या पुन्हा सुरू झाल्या. आकड्यांच्या आणि झटपट लॉटरी आता सायप्रसमध्ये सादर केल्या जातात. तिकीटविक्रीतून आलेल्या रकमेच्या ४१ टक्के भाग सरकार आर्थिक आणि सांस्कृतिक विकासासाठी वापरतं. कला-संस्कृती, शिक्षण आणि क्रीडा या क्षेत्रांना लॉटरी निधीचा लाभ होतो.

**झेक रिपब्लिक**

शारीरिक शिक्षण आणि क्रीडा समितीच्या वतीने साझका या कंपनीने सर्वप्रथम ऑगस्ट १९५६ च्या काळात झेक रिपब्लिकमध्ये लॉटरीचे आयोजन केले. क्रीडा सामन्यांच्या निकालावर साझका बेटिंग घेत असे. या लॉटरीचा नफा हा खेळ आणि पर्यटनाच्या विकासासाठी वापरला जायचा. त्याआधी १९५६ पर्यंत सरकारी बेटिंग ऑफिसमार्फत स्टासका ही लॉटरीही खेळली जायची.

कम्युनिझमच्या पडझडीनंतर १९९२ साली झेक रिपब्लिक आणि स्लोव्हॅक रिपब्लिक अशी दोन राष्ट्रांची स्थापना झाली. त्यानंतर झेक रिपब्लिकची साझका ाणि स्लोव्हिकियाची स्पोर्टका या दोन वेगवेगळया लॉटऱ्या सुरू राहिल्या.

२००२ साली साझकाने किनो हा खेळ सादर केला. दर पाच मिनिटाला त्याचा ड्रॉ होत असे. ऑगस्ट ाणि डिसेंबर महिन्यातल्या किनोचा महसूल हा पूरग्रस्तांसाठी देण्यात येतो. इतर लॉटरीपैकी ६/४९ लोटोसारखाच स्पोर्टका, ५/४० साझका, ५ झे ४०, सान्स (जोकर), स्तास्तानिक १० आणि सान्स मिलियन या लॉटऱ्या लोकप्रिय होत्या. आकड्यांच्या लॉटरीचा या सर्व लॉटऱ्यांच्या तुलनेत ८८ टक्के इतका मोठा वाटा राहिला आहे.

स्पोर्टकाच्या बेटिंग धर्तीवर साझका, साझका सिलेक्ट, स्कोअर प्लस आणि साझका ना व्हितेज हे खेळ आहेत. साझकामार्फत सात झटपट खेळांचेही आयोजन केले जाते. ट्रेझर, स्तास्त्ना सिसला, स्ट्रिको, होरोस्कोपी, स्बेराटेलेस्का लॉतरिए, पॅना-ओरेल आणि कॅसिनो हे ते खेळ आहेत.

साझकाने सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य आणि इतर धर्मादाय उपक्रमांनाही निधी उपलब्ध करून दिला आहे. झेक रिपब्लिकनच्या विविध वर्गात्लाय १०० यशस्वी कंपन्यांमध्ये साझकाची वरच्या श्रेणीत सार्वमताने निवड झालेली आहे.

**डेन्मार्क**

डॅनिश संसदेत स्पेशल डॅनिश पूल्स अ‍ॅक्ट संमत झाल्यानंतर जुलै १९४८ मध्ये डेन्मार्कमध्ये डॅन्स्क रिप्सेत्जेनेस्ते ही लॉटरी प्रस्थापित केली गेली. डॅनिश सरकारचा ८० टक्के तर डॅनिश स्पोर्टस् फेडरेशन आणि डॅनिश जिम्नॅस्टिक्स अ‍ॅण्ड स्पोर्टस् यांचे प्रत्येकी १० टक्के समभाग डॅन्स्क रिप्सेत्जेनेस्तेमध्ये आहेत. गेली ४० वर्षे टिप्स १ बाय टू हा सॉकर पूल हा एकमेव इथे खेळला जातोय. अलिकडेच विधीमंडळात कायदे करून आकड्यांचे खेळ, स्पोर्टस् गेम, स्क्रॅच कार्ड गेम्स, घोड्यांच्या आणि कुत्र्यांच्या शर्यती तसेच ऑनलाइन लॉटरी खेळांचा मार्ग मोकळा केला गेला.

डॅनिश लॉटरीची वार्षिक उलाढाल ८ दशलक्ष डॅनिश क्रोन इतकी आहे. डॅनिश संसदेने घालून दिलेल्या दंडकाप्रमाणे लॉटरी निधी हा क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी वितरित केला जातो. अपंगांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, धर्मादाय संघटना, जायबंदी सैनिकांच्या संघटना, तरुणांच्या चळवळी, ना-नफा तत्त्वावर चालणाऱ्या संस्था, टीम डेन्मार्क, ऑलिम्पिक समिती आणि राष्ट्रीय शिक्षण संस्था यांना मोठ्या प्रमाणात निधी वितरित केला जातो.

सध्या डॅनिश लॉटरीची विक्री करणारे ४००० किरकोळ विक्रेते आहेत. आकड्यांच्या लॉटरीतून एकूण लॉटरीच्या ७० टक्के महसूल प्राप्त होतो. क्रीडा खेळातून १८ टक्के आणि स्क्रॅच खेळांतून १२ टक्के महसूल मिळतो. सॉकर पूल खेळाला इथे टिप्स

म्हणतात. शर्यतींच्या बेटिंगला ऑडेस्ट, फुटबॉल किंवा आइसहॉकीच्या बेटिंगला मॅलजॅग म्हणतात. क्वीक नावाचा स्क्रॅच गेम १९९२ मध्ये इथे सादर झाला. १९९० साली ऑनलाइन लॉटरी सुरू झाली. २००१ मध्ये गेमिंग मशीन्स आल्या. गेमशॉप नावाची नवी संकल्पना उदयाला आली. तिला पिट्स्टॉप असं नामाभिधान मिळालं. सध्या असे तीसहून अधिक पिट्स्टॉप कॅफे डेन्मार्कमध्ये चालवले जातायत.

**फ्रान्स**

राजा फ्रॅन्कॉइस प्रथम, याने १५०५ मध्ये आयोजित केलेली लॉटरी ही फ्रान्सच्या इतिहासातली पहिली नमूद झालेली लॉटरी. त्यानंतर दोन शतकांसाठी लॉटरीवर फ्रान्समध्ये बंदी होती. सतराव्या शतकात पब्लिक लॉटरी म्हणून लॉटरीचा पुन्हा उदय झाला, पॅरिस म्युनिसिपालिटीसाठी *लॉतरिए दे ल'होतेल दे विले* ही लॉटरी सुरू झाली. अठराव्या शतकात धार्मिक कारणांसाठी निधी उभारण्यासाठी लॉटरींचं आयोजन मोठ्या प्रमाणात केलं जायचं. फ्रान्समधली १५ मोठी चर्चेस याच काळात बांधली गेली. सेंट सलपाइस हे प्रसिद्ध चर्चही लॉटरीच्या निधीतून बांधलं गेलं. सुरुवातीला चर्चला आपल्या खजिन्यातून पैसे द्यावे लागू नयेत म्हणून राजाने जरी धार्मिक उद्देशाने परवानगी दिली नाही तरी नंतर लॉटरीतून भरपूर महसूल येऊ लागल्यावर चर्च आणि राजा यांच्यात खडाजंगी होऊ लागली. त्यानंतर १७७४ मध्ये *लॉतरिए दे ल'एकोल मिलितेअर*ची स्थापना झाली आणि ही लॉटरी वगळता बाकी सर्व लॉटऱ्यांवर बंदी लादली गेली. *मादम दे पाम्पादोअर*ने *लॉतरिए दे ल'एकोल* ही लॉटरी सुरू केली. कॅम्प दी मार्स आणि मिलिटरी अकादमीसाठी या लॉटरीचं प्रामुख्याने आयोजन केलं गेलं होतं. नेपोलियन याच अकादमीतला विद्यार्थी होता. काही वर्षांनी ही लॉटरी *लॉतरिए रॉयाले दे फ्रान्स* या नावाने मान्यताप्राप्त झाली. या लॉटरीतून सरकारला ५ ते ७ टक्के महसूल मिळतो.

१७८९च्या फ्रेन्च राज्यक्रांतीनंतर १७९१ पासून सर्व राज्य लॉटरींवर बंदी आणली गेली. १९३६ साली समाजवादी सरकार आल्यानंतर 'लोटो' ही लॉटरी महसूलवाढीसाठी सादर केली गेली. *ला फ्रॅन्कॉइस देस जेक्स* म्हणून राज्य लॉटरीचं पुनर्वसन करण्यात आलं. आजही या लॉटरीची फ्रान्समध्ये मोनोपली आहे.

आज ही एक या पब्लिक लॉटरी कंपनी असून सरकारचा वाटा ७२ टक्क्यांचा आहे. २० टक्के वाटा संचालक, ३ टक्के एजंट आणि ५ टक्के कर्मचारी अशी विभागणी करण्यात आली आहे. सरकारी नियंत्रणाखाली या खेळाची करप्रणाली कंपनीच्या बजेटमध्येच संमत केली जाते.

**घाना**

घाना या देशाचा राष्ट्रीय लॉटरी विभाग १९५८ मध्ये स्थापन करण्यात आला. त्यांनी 'पेनल्टी' या नावाने लोटो प्रकारातला तसेच काही स्क्रॅच गेम्स सादर केले. खाजगी लॉटरी चालकही लॉटरी चालवत होते. सरकारने खाजगी लॉटरी चालकांवर बंदी आणली होती, मात्र खाजगी चालकांच्या कडव्या विरोधानंतर ही बंदी लादणारं विधेयक २००३ साली मागे घेण्यात आलं. २००३ मध्ये नॅशनल लॉटरीने 'सोशल रॅफल' नावाचा नवा खेळ सादर केला. त्यासोबत काही नवीन कल्पनाही सादर झाल्या. या योजनांप्रमाणे प्रत्येक खेळाचा विशिष्ट महसूल काही सामाजिक प्रकल्पांना वळता केला जाऊ लागला. विजेत्यांनीच आपला आवडीचा प्रकल्प निवडायचा असतो. त्यानंतर विजेत्याचं नाव त्या शाळेला किंवा हॉस्पिटलला किंवा कोणत्याही लाभार्थी प्रकल्पाला देण्यात येऊ लागलं.

**हाँगकाँग**

हाँगकाँगची लॉटरी ही रॉयल हाँगकाँग जॉकी क्लबतर्फे चालवली जाते. हाँगकाँग लॉटरीज बोर्डकडून परवानाप्राप्त ही संस्था १९१५ सालापासून लॉटरीचं आयोजन करते आहे. तेव्हापासून धर्मादाय उपक्रमांसाठई क्लबने भरपूर निधी उपलब्ध करून दिला आहे. *'रेसिंग फॉर चॅरिटी'* अर्थात धर्मादाय कारणांसाठीची दौड असं घोषवाक्य घेऊन क्रीडा, मनोरंजन, संस्कृती, शिक्षण आणि प्रशिक्षण, समाजसेवा, वैद्यकीय तसेच आरोग्यक्षेत्र यासाठी मोठंच योगदान त्यांनी दिलं आहे.

२००३ साली जेव्हा सार्सचा मोठा प्रादुर्भाव झाला होता तेव्हा १२५ दशलक्ष हाँगकाँग डॉलर्स इतकी देणगी ट्रस्टने देऊ केली होती. त्यामुळे बालवाड्या, शाळा आणि आरोग्य केंद्रांना प्रतिबंधात्मक उपाय योजण्यात मदत झाली.

रतनजी ॲण्ड टॅन्ग शिऊकिन हॉस्पिटलसाठी १६ दशलक्ष हाँगकाँग डॉलर्सची मदत देऊ केली गेली. २००३ मध्ये जॉकी क्लब आर्टस् फॉर दी डिसएबल्ड या संस्थेची स्थापना करून अपंगांमधल्या कला आणि सृजनशीलतेला वाव देण्याचा प्रयत्न केला गेला. या लॉटरीची वार्षिक विक्री ५८२ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपेक्षा अधिक आहे.

**हंगेरी**

हंगेरीला लॉटरीचा २०० वर्षांचा इतिहास आहे. १७७० साली बुडा इथे हंगेरीतली पहिली लॉटरी आयोजित केली गेली. १९४७ मध्ये आधुनिक लॉटरी खेळ सादर झाले. पूल्स हा सर्वात लोकप्रिय खेळ राहिला आहे. १९५७ मध्ये ५ आकड्यांचा ड्रॉ सादर झाला. सुरुवातीला ऑर्सझागोस टेकरपेनत्झार या राष्ट्रीय बचत बँकेमार्फत लॉटरीचं आयोजन होत असे. १९९१ साली सरकारने झेर्नेस्तझाटेक ही स्वत:ची कंपनी थाटून लॉटरी चालवायला घेतली.

सुरक्षिततेचा उपाय म्हणून या कंपनीने मानवचलित लॉटरी प्रक्रिया करणं थांबवलं. २००१ साली लक्झर ही किनो पद्धतीची लॉटरीही अंमलात आणली गेली. अगदी पोस्ट ऑफिस, दुकानांचे गाळे, वर्तमानपत्रांचे स्टॉल्स इथेही तिकिटं विकली गेली. पोस्ट ऑफिसातून विकली गेलेली तिकिटं सर्वाधिक होती. २०० साली सहस्रक समाप्तीच्या निमित्ताने नव्या वर्षाच्या पूर्वसंध्येला क्लोज-आऊट लोटो आयोजित केला गेला होता. कंपनी टोटो पूल्स, ५९० लोटो, ६/४५ लोटो आणि इन्स्टंट गेम्सही या कंपनीतर्फे चालवले जातात.

लॉटरीच्या माध्यमातून जमा होणारा निधी क्रीडा, ऑलिम्पिक सहभाग, सांस्कृतिक उद्दिष्टं, पुनर्बांधणी, पूरग्रस्त आणि मुलांसाठी हॉस्पिटल्स यासाठी वापरला जातो.

**आयर्लंड**

१९०० व्या वर्षाच्या सुरुवातीला आयरिश सरकारला जेव्हा हॉस्पिटल्स बांधण्यासाठी निधी अपुरा पडू लागला तेव्हा त्यांनी आयरिश स्वीपस्टेक्स या लॉटरीचं आयोजन करण्याचं ठरवलं. जुगार हा त्या काळात अमेरिका-कॅनडासह अनेक देशांमध्ये बेकायदेशीर मानला जात होता. घोड्यांच्या शर्यती मात्र तेव्हा सामायिक असायच्या. आणि आयरिश लोकाना घोड्यांच्या शर्यतीत विशेष रस असायचा. तेव्हा वर्षातून चार वेळा घोड्यांच्या शर्यती व्हायच्या. आयरिश सरकारने या घोड्यांच्या शर्यतीच्या निकालाशी संदर्भ जोडून लॉटरीचे संयोजन केले. ज्यांनी ज्या घोड्याच्या नावाची तिकिटं घेतली तो घोडा जिंकला की ते सारे विजेते ठरतात. या लॉटरीची तिकिटं काळ्या बाजारात अगदी देशाबाहेरही विकली जात होती. सुरुवातीला ही लॉटरी खूपच लोकप्रिय होती. पण जसजसा जुगार अनेक देशांमध्ये कायदेशीर होऊ लागला तसतसा हा स्वीपस्टेक्स नावाचा आयरिश खेळ आपली लोकप्रियता गमावू लागला. १९८७ मध्ये शेवटी स्वीपस्टेक्स ही लॉटरी बंद केली गेली. तोपर्यंत या लॉटरीने अर्थातच १३५ दशलक्ष पौंड इतकी रक्कम विविध हॉस्पिटल्सना आणि २६५ दशलक्ष पौंड बक्षीस म्हणून दिले होते. १९८७ मध्ये मग सरकारने ६/४२ लोटो ही लॉटरी सादर केली. आयरिश लोटो जॅकपॉट हा पुढे वाढत जातो आणि बक्षिसांची रक्कम ही करमुक्त आहे.

**इस्रायल**

मायफल हपाइस, अर्थात इस्रायलची राष्ट्रीय लॉटरी १९५१ मध्ये ना-नफा तत्त्वावरची कंपनी स्थापून सुरू झाली. १९४० च्या सुमारास हजारो स्थलांतरित लोक इस्रायलमध्ये येऊन थडकले तेव्हा इस्रायलची आर्थिक परिस्थिती फारच वाईट होती. या आर्थिक विपन्नावस्थेतून देशाला बाहेर काढण्यासाठी तेल अविवचे महापौर एस्रायल रोका यांनी म्युनिसिपल लॉटरीची कल्पना मांडली. स्थलांतरितांपैकी बहुतेकजण वृद्धत्वाकडे झुकलेले

असल्याने आरोग्य सुधार प्रकल्पासाठी तातडीचा निधी आवश्यक होता. रोका यांची कल्पना सरकारसंमत झाली आणि अंमलातही आली. मायफल हपाइस या लॉटरीची १९५१ साली स्थापना झाल्यापासून सुमारे ५ अब्ज डॉलर्स इतका निधी शि७ण, आरोग्य आणि सामाजिक उपक्रमांना मिळाला. वित्त विभागाच्या अखत्यारितील ही लॉटरी सुमारे ११ पालिकांच्या सहयोगाने चालवली जाते. या लॉटरीचा वार्षिक महूल २.८ अब्ज निस इतका आहे.

बनावटगिरी टाळण्यासाठी तसेच सुरक्षिततेचा उपाय म्हणून मायफल हपाइस त्यांची लॉटरीची तिकिटं परदेशात छापून घेते. दहा मुख्य वितरक, २५०० विक्रेते, ८०० विशिष्ट रचनेचे लॉटरी बुथ या मार्फत इस्रायली राष्ट्रीय लॉटरीची विक्री केली जाते. या लॉटरीची आकर्षकता वाढावी म्हणून लॉटरीमध्येच सर्वात आकर्षक बुथ असे पारितोषिकही विक्रेता-वितरकाला दिलं जातं. विक्रेते, वितरक आणि मार्केटिंग कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढावी म्हणून राष्ट्रीय लॉटरी व्यवस्थापन त्यांच्यासाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजनही करते. लॉटरी व्यावसायिकांसाठी मोझाल तोव अर्थात 'गुड लक' हे नियतकालिकही प्रसिद्ध केले जाते.

लॉटरीतून मिळणारे उत्पन्न आरोग्य, युद्धजन्य परिस्थिती, औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण, संस्कृती आणि कला या क्षेत्रांसाठी वापरली जाते. मायफल हपाइसने शेकडो बालवाड्या, शाळा, सामाजिक केंद्र, इस्पितळ, दंतचिकित्सा केंद्र, वृद्धाश्रम, सार्वजनिक वाचनालय, कामगार कल्याण संस्था, पुनर्वसन केंद्र आणि कला-संस्कृती उद्धारासाठी केंद्र स्थापली आहेत. १९८८ पासून प्रत्येक मुलासाठी संगण ही योजना राष्ट्रीय लॉटरीमार्फत चालवली जात आहे. अंधांसाठी स्वतंत्र दालन असलेली सेंट्रल लायब्ररी, बेहत हसोफर हे लेखकांसाठीचं घर आणि बहुपेडी क्रीडासंकुल ही या राष्ट्रीय लॉटरीची देणगी आहे.

### जमेका

१९९१ मध्ये जमेका सरकारच्या बेटिंग, गेमिंग आणि लॉटरीज कमिशनने स्पोर्टस् डेव्हलपमेण्ट एजन्सीला लॉटरी चालक म्हणून नेमले. स्क्रॅच ॲण्ड विन तिकिटांच्या विक्रीने एजन्सीने त्यांच्या लॉटरीचे आयोजन सुरू केले. त्यानंतर १९९४ साली जमेका लॉटरी कंपनी स्थआपन केली गेली आणि लॉटरी खेळाच्या आयोजनाची जबाबदारी त्यांच्यावर टाकली गेली. लोटो खेळाच्या विक्रीतली ७.५ टक्के रक्कम स्पोर्टस् डेव्हलपमेण्ट फाऊंडेशनला क्रीडा विकासासाठी देण्यात येते.

गेल्या काही वर्षात अनेक खेळ सादर केले गेले. सध्या लोटो, पिक ३, स्क्रॅचर्स, टिक टॉट टो, ३ वे ड्रॉप पॅन आणि वर्ल्ड फुटबॉल हे खेळ सादर केले जातात.

२००३ साली जमेकाने लॉटरी बक्षिसावर कर लादायला सुरुवात केली. मधुमेहींची संघटना, माय फादर्स हाऊस, अपंग तसेच मतिमंदांच्या संस्था, आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा, रेड क्रॉस आणि इतर अनेक शैक्षणिक संस्थांना त्यांनी मदत केली आहे. आतापर्यंत २० दशलक्ष डॉलर्स इतका निधी जमेकाने चांगल्या कारणासाठी खर्च केला आहे.

**जपान**

जपानच्या लॉटरीचा उगम १६३० सालापर्यंत जातो. १८४२ साली पूर्णत: बंदी येईपर्यंत जपानमध्ये लॉटरीचे माग मिळतात. दुसऱ्या महायुद्धाच्या आधी १९४५ साली जपानी लॉटरीचं पुनरुत्थान झालं. युद्धासाठी निधी जमवणे आणि त्यानंतर युद्धपश्चात राष्ट्रबांधणीसाठी या लॉटरींचा खूपच उपयोग झाला. ऑक्टोबर १९४५ साली नव्या लॉटरीची पहिली सोडत झाली. या लॉटरीचं नाव होतं ताकारा कुजी. अर्थात नशिबाचा खजिना. त्यानंतर स्थानिक सरकारांना लॉटरी आयोजनाची परवानगी देण्यात आली आणि आजही स्थानिक सरकारच्या बजेटमध्ये लॉटरीतून मिळालेला महसूल महत्त्वाची जागा पटकावून आहे.

जपानच्या लॉटरीचे पारंपरिक लॉटरी आणि आधुनिक लॉटरी असे दोन वर्ग होतात. पारंपरिक लॉटरीत आधीच छापलेल्या क्रमांकाची तिकिटं असतात तर आधुनिक लॉटरीत खेळाडू आकडे निवडू शकतो. नव्याने सादर झालेल्या काही लॉटरींमध्ये पारंपरिक आणि आधुनिक लॉटरींचा संगम झालेला दिसून येतो. झपटप लॉटरी आणि डबल-चान्स लॉटरी आता जपानमध्ये लोकप्रिय आहे.

लॉटरीचे सहा मुख्य प्रकार जपानमध्ये आहेत. ऑल जपान लॉटरीची तिकिटं संपूर्ण जपानमध्ये विकली जातात. आणि त्याची दरमहा एक सोडत होते. 'ब्लॉक' ही लॉटरी साप्ताहिक असते. ती जपानच्या चार ब्लॉक्समध्ये विकली जाते. कान्टो-चुबू-तोहोकू, टोक्यो मेट्रोपोलिटन जिल्हा, किन्की प्रांत आणि पश्चिम जपान हे ते चार प्रांत. सहावा प्रकार आहे स्थानिक वैद्यकीय विकासाची लॉटरी आहे. हिला रेनबो लॉटरी असं म्हटलं जातं. या लॉटरीतून येणारा निधी जिची मेडिकल स्कूल आणि ग्रामीण भागातील इतर वैद्यकीय आवश्यकतांसाठी खर्च केला जातो. वृद्धांच्या कल्याणासाठीही निधी उपलब्ध केला जातो. रेनबो लॉटरी वर्षातून नऊवेळा आयोजित केल्या जातात. त्याशिवाय १९८९ सालापासून इव्हेण्ट लॉटरी नावाची नवी लॉटरी सुरू करून दिली. ही झटपट लॉटरी असून तिकीटं केवळ प्रदर्शनाच्या ठिकाणी मिळतात. स्थानिक सरकारांकडून ही लॉटरी चालवली जाते.

एका अभ्यासानुसार जपानच्या कार उद्योगाइतकाच बेकायदेशीर बेटिंगचा व्यवसायही जोरात आहे. त्यामुळे जपान सरकारने, घोड्यांच्या शर्यती, बोटी आणि सायकलींच्या शर्यती यावरचं बेटिंग कायदेशीर केलं आहे. २००१ सालापासून टोटो नावाचा व्यावसायिक

सॉकर खेळावरचा बेटिंग गेमही सादर झाला आहे. टोटो हा खेळ इंटरनेटवरही उपलब्ध आहे. टोटोमधून ६४.२ अब्ज येन इतकी विक्री पहिल्याच वर्षी झाली.

### कझाकस्तान

कझाख़स्तानची राष्ट्रीय लॉटरी १९९८ मध्ये स्थापन झाली. या देशात खाजगी लॉटरी चालकही आहेत. मात्र सरकारच्या लॉटरीतून येणारा निधी सामाजिक कार्यासाठी वापरला जातो. ५/३६ लोटो, ६/४० लोटो, आणि पिक–५ हे खेळ कझाख़स्तानमध्ये लोकप्रिय आहेत.

### लेबनॉन

लेबनॉनचा मूळ लॉटरी खेळ नसीब १९५० मध्येच सुरू झाला होता. राष्ट्रीय लॉटरी संचालनालयाने चार आकडी खेळांचं आयोजन सुरू ठेवलं आहे. दर आठवड्याला नसीबची दोन लाख तिकिटं विकली जातात.

त्याशिवाय लेबनीज लोटो आणि मलायीन नावाचा स्क्रॅच गेमही सादर केला जातो. मलायीन २००३ मध्ये सुरू झाला. यात सहा चौरस असतात. जर या चौरसात स्क्रॅचिंगनंतर तीन सारख्याच बेरजा आल्या तर तेवढ्या किमतीची रक्कम स्पर्धक जिंकतो. जर चौरसात टीव्हीचं चित्रं आलं तर त्याला टीव्ही शोसाठी प्रवेश मिळतो. त्यानंतर प्रत्यक्ष टीव्ही शोच्या वेळी चक्र फिरवून खेळाडू ५ दशलक्ष एलएल किंवा १५० दशलक्ष एलएल जिंकू शकतो.

तोराह नाशेह या खेळामध्ये खेळाडू तोराह किंवा नाशेह या पत्त्यांवर बेट लावतात. त्याच्या स्क्रॅच कार्डवर त्याने ज्या पत्त्यावर बेट लावलीय त्या पत्त्याचा संदर्भ आल्यास खेळाडू बेट जिंकतो. आणि पत्त्यावर जितकी रक्कम निर्देशित केली असते तितकी रक्कम  तो जिंकतो.

नाऊनमध्ये स्क्रॅचकार्डवर डाव्या बाजूला सहा चौरस असतात आणि उजव्या बाजूला एक चौरस असतो. उजव्या बाजूचा चौरस हा स्क्रॅच करायचा असतो. स्क्रॅच केल्यानंतर जो क्रमांक येतो तो डाव्या बाजूच्या सहा चौरसांपैकी कोणत्याही एका चौरसातल्या आकड्याशी मिळताजुळता असल्यास खेळाडूला बक्षीस मिळतं.

या नसीब नावाच्या पेपर लॉटरीत ५ क्रमांक असतात आणि मालिका आद्याक्षरांनी वर्गीकृत केलेल्या असतात. हा साप्ताहिक सोडतीचा खेळ असून त्याचं तिकीट ६००० एलएल इतकं असतं. खेळाडूला अर्ध तिकीट घेण्याचीही मुभा असते. अशातच अशावेळी खेळाडू जिंकल्यास बक्षिसाची किंमतही अर्धी असते.

४ लाख एलएलपेक्षा बक्षिसाची रक्कम कमी असेल तर ती किरकोळ विक्रेत्याकडून प्राप्त करता येतात. अधिक किमतीची बक्षिसं लेबनीज नॅशनल लॉटरीकडून प्राप्त करून घेता येतात.

नवीन खेळ सादर करायचा असल्यास लेबनीज अर्थखात्याकडून परवानगी घ्यावी लागते.

### मलेशिया

मलेशिया सरकारने १९६९ मध्ये स्पोर्टस् टोटो ही लॉटरी सुरू केली. १९८५ मध्ये ती खाजगी कंपनीत परिवर्तित करण्यात आली. स्पोर्टस् टोटो ही आकड्यांचे खेळ आयोजित करते. उदा. ४डी, ५ डी आणि ६ डी. तसेच लोटो प्रकारातले खेळही आयोजित करण्यात येतात. उदा. टोटो ४/४९, टोटो ६/४२, जॅकपॉट आणि सुपरटोटो ६/४९.

स्थापनेपासूनच या लॉटरीने क्रीडा, युवक कल्याण आणि सांस्कृतिक चळवळींच्या विकासासाठी निधी पुरवला. आजारी, वृद्ध आणि गरजूंसाठी काम करणाऱ्या संस्थांसाठीही या लॉटरीने आपले धर्मादाय योगदान केले आहे.

१०००० रिंगिटपर्यंतची बक्षिसं ही विक्रेत्यांकडूनच दिली जातात. मलेशियातले लॉटरी बक्षीस करपात्र असत नाही.

### नेदरलॅण्ड

स्तातलॉतरीज ही नेदरलॅण्डची सरकारी लॉटरी जगातली सर्वात जुनी लॉटरी मानली जाते. १७२६ साली सुरू झालेली ही लॉटरी आजही सुरू आहे. अनेक खाजगी लॉटऱ्याही नेदरलॅण्डमध्ये चालू होत्या. १८४८ मध्ये सरकारने खाजगी लॉटरी चालकांवर बंदी आणली. १९०५ साली लॉटरी कायदा अस्तित्त्वात आला आणि त्यानुसार धर्मादाय उद्दिष्टांसाठी लॉटरी आयोजनाला मुभा मिळाली. १९६१ मध्ये या लॉटरी आयोजकांना बक्षिस रोखीत न देता विविध वस्तुरूपात द्यावी लागत होती.

१९४८ साली टोटलायझेटर कायद्याने घोड्यांच्या शर्यंवरचं बेटिंग अधिकृत झालं. १९६१ मध्ये लॉटरी कायद्यात सुधारणा झाली आणि स्पोर्टस् बेटिंग अधिकृत झालं. त्याचवेळी धर्मादाय लॉटरींनाही बक्षिसं रोखीत देण्याची मुभा देण्यात आली. १९९४ साली झटपट लॉटरी सादर झाली.

डच सरकार प्रत्येक खेळासाठी विविध चालकांना परवाना देतं. उदा. झटपट लॉटरीचे आयोजन नॅशनल इन्स्टंट लॉटरी फाऊंडेशन आणि लोटोचे आयोजन नॅशनल

स्पोर्ट टोटलायझेटर फाऊंडेशन या संस्थांमार्फत केलं जातं. झटपट लॉटरीत तिकीटविक्रीच्या किमान ४७.५ टक्के इतकी रक्कम बक्षीस म्हणून दिली जाते. लोटोची बक्षिसं ही ४७.५ टक्के ते ५० टक्के यादरम्यान असते. लोटोच्या माध्यमातून मिळणारा महसूल हा डच ऑलिम्पिक समितीला तसेच डच क्रीडा संघटनेला बहाल केला जातो.

डच आणि इतर लॉटरींवर स्तात्सलॉतरिज ही २५ टक्के इतका कर आकारते.

मार्च २००३ मध्ये नवा गेमिंग कायदा संमत झाला. त्यानुसार धर्मादाय लॉटरींच्या संयोजनासाठी अधिक परवान्यांची मुभा देण्यात आली. प्रमाणपत्रांची पद्धत सुरू झाली. जेणेकरून फक्त प्रमाणित संस्थांनाच लॉटरी महसूल स्वीकारण्याची आणि वितरित करण्याची वैधता बहाल केली गेली.

न्यूझीलॅण्ड

१९८७ साली स्थापना झालेलं न्यूझीलॅण्ड लॉटरीज कमिशन ही सार्वभौम संस्था, राजसत्तेच्या अखत्यारित येते. लॉटरी खेळाच्या वितरणाचा एकमेव मक्ता असलेल्या या संस्था गेमिंग अॅण्ड लॉटरीज अॅक्टच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अंमल करते.

कमिशनतर्फे आयोजित लॉटरीचे उद्दिष्ट केवळ सामाजिक उपक्रमांपुरतेच असते. न्यूझीलॅण्ड लॉटरीज ग्रॅण्ट बोर्डामार्फत महसुलाचे वितरण होते. खेळाचे कायदे हे अंतर्गत घडामोडी विभागातर्फे नियंत्रित केले जातात.

१९८५ साली क्रीडा विकास चौकशी अहवालात लोटो हा प्रस्तावित महसूलप्राप्ती करून देणारा खेळ म्हणून परिचित करून देण्यात आला. त्याशिवाय आता गोल्डन किवी, इन्स्टंट किवी, लोटो स्ट्राइक, केनो आणि पॉवरबॉल हे खेळही सादर केले जातात.

अनेक विधायक कामाला निधी जात असल्याने न्यूझीलॅण्डची लॉटरी ही जुगारापेक्षाही मनोविजनासाठी अधिक उपयुक्त ठरली आहे. लॉटरी कमिशनतर्फे अग्निशमन दल, पोलीस तसेच सुरक्षा दलांनाही निधी उपलब्ध करून दिला जातो. १९८७ पासून आजतागायत या लॉटरीने १.७ अब्जांपेक्षाही अधिक मदत सरकारी तिजोरीला दिली आहे.

**नॉर्वे**

नॉर्स्क टिपिंग या सरकारी संस्थेद्वारे नॉर्वेची लॉटरी आयोजित केली जाते. इथे तीन डिजिटची लॉटरी लोकप्रिय आहे. ७/३४ लोटो, ६/४८ व्हायकिंग लोटो आणि जोकर हे लोकप्रिय खेळ आहेत. मात्र टिपिंगची मोठी उलाढाल ही सॉकर पूल गेमवर होते. फूटबॉलच्या खेळाच्या निकालाच्या अंदाजावर ही लॉटरी खेळली जाते. याशिवाय ऑडसेन, लॅन्गॉडसेन, ऑड्सबॉम्बेन आणि विनरऑडसेन हे खेळ लोकप्रिय आहेत.

फ्लॅक्स या नावाने स्क्रॅच तिकिट लोकप्रिय आहे.

**सिंगापूर**

१९६० साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सिंगापूर सरकारने स्थानिक जुगारी संघटनांचा बंदोबस्त करताना त्यांची अधिकृत लॉटरी सादर केली. टोटो हा खेळ तेव्हा सादर केला गेला. सिंगापूरमध्ये स्कोअर आणि स्ट्राइक या सॉकर लॉटरी लोकप्रिय आहेत. स्कोअर ही लॉटरी स्थानिक क्लब्जमधल्या फूटबॉल सामन्यांवर आधारित असते, तर स्ट्राइक ही लॉटरी आंतरराष्ट्रीय फूटबॉल सामन्यांवर आधारित असते.

सिंगापूरच्या नॅशनल काऊन्सिल ऑफ सोशल सर्व्हिसेस या संस्थेला या लॉटरीपासून मिळणाऱ्या निधीतून प्रचंड फायदा झाला आहे. या संस्थेच्या अधिपत्याखाली २०० विविध सामाजिक संस्था येतात. सिंगापूरच्या लॉटरी निधीतून ज्युरॉन्ग बर्ड पार्क, गुन्हे नियंत्रण, नाट्यगृह उभारणी, अशा कारणांसाठीही मदत दिली गेली. ऑलिम्पिक समितीला क्रीडा विकासासाठीही या लॉटरीकडून निधी उपलब्ध झाला. आतापर्यंत दहा कोटी सिंगापूर डॉलर्सहून अधिक मदतनिधी या लॉटरीकडून उपलब्ध झाला आहे.

**दक्षिण आफ्रिका**

दक्षिण आफ्रिकेची राष्ट्रीय लॉटरी ही त्यांच्या नॅशनल लॉटरी बोर्डाकडून चालवली जाते. युके, युएसए आणि ऑस्ट्रेलिया इथल्या मोठ्या लॉटरी चालकांसह अनेकांचे समभाग आणि सहभाग असलेल्या उथिंगो या कंपनीतर्फे ही लॉटरी चालवली जाते.

दक्षिण आफ्रिकेच्या संसदेने १९९७ साली राष्ट्रीय लॉटरी कायदा संमत केला आणि तेव्हाचे राष्ट्रपती नेल्सन मंडेला यांनी तो स्वीकारला.

इथल्या लॉटरी विक्रेत्यांना एका करारावर स्वाक्षरी करून योग्य ते प्रशिक्षण घ्यावं लागतं. त्यानंतरच विक्रेत्यांना लॉटरीच्या तिकीट विक्रीचा आणि बक्षिसं देण्याचा अधिकार बहाल केला जातो. रिटेल विक्रेत्यांना २००० चलनी किंमतीपर्यंतची बक्षिसं वितरित करता येतात. ५० हजारापर्यंतची बक्षिसं अधिकृत वितरण केंद्रांतून वितरित केली जातात.

नॅशनल लॉटरी डिस्ट्रिब्यूशन ट्रस्ट फण्डकडूनच लॉटरीचा निधी वितरित केला जातो. १५ टक्के रक्कम पुनर्निमाणाचे आणि विकासाचे कार्य, ३६ टक्के धर्मादाय, २२ टक्के कला, संस्कृती आणि पुरातत्त्व वारशांसाठी तर २२ टक्के निधी क्रीडा आणि मनोरंजन तसेच इतर कार्यक्रमांसाठी असा विनिमय केला जातो. वृद्धाश्रम, देखभाल केंद्रे, बालकल्याण संस्था अशा शेकडो संस्थांना या निधीचा लाभ झाला आहे. प्लेअर थुसॉन्ग ही हेल्पलाइन निकाल आणि इतर चौकशीसाठी उपलब्ध असते. दक्षिण आफ्रिकेत लोटो, लोटो प्लस, विना मान्जे हा स्क्रॅच गेम तसेच टिकटॅकटो, झान्सी गोल्ड, स्कोअर अ

गोल, बोनान्झा बक आणि कॅश एक्स्प्लोजन हे खेळ लोकप्रिय आहेत. त्याशिवाय अविजेत्या तिकिटांसाठी विन अ लॉट नावाची एक वेगळी स्पर्धाही घेतली जाते. यात बक्षीस म्हणून कपडे, किराणा मालाची व्हाऊचर्स ते कारपर्यंत बक्षिसं असतात.

**स्पेन**

स्पेनची राष्ट्रीय लॉटरी ३० सप्टेंबर, १७६३ रोजी प्रत्यक्षात आली. मार्क्युईस ऑफ एस्क्युलेसद्वारे कार्लोस तृतीय याने एका विशेष कायद्याद्वारे ही लॉटरी सुरू केली. या कायद्यात असं नमूद केलं होतं की रोम आणि इतर ठिकाणी प्रचलित असलेल्या लॉटरीप्रमाणे एक लॉटरी माद्रिदमध्येही सुरू करावी, असं मंत्रीमंडळाला पटलं. मार्क्यूईसने लॉटरीसाठी निधी कमी पडल्यास आपली शाही संपत्ती गहाण ठेवण्याची तयारी दाखवली. कायद्याद्वारे लॉटरीचा निधी इस्पितळं, अनाथालयं तसेच इतर सामाजिक विधायक कामांसाठीच खर्च केला जावा हे बंधनकारक केलं गेलं.

९ मार्च १७७१ रोजी जी पहिली सोडत काढली गेली ती दिएगो लोपेझ या सॅन इल्डेफेन्सो शाळेच्या सात वर्षांच्या मुलाच्या हस्ते. आणि या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांकडूनच ही सोडत काढली जाण्याची परंपरा पुढे चालू राहिली.

आज अस्तित्त्वात असलेल्या लॉटरीची सुरुवात १८११ मध्ये कॅडिझ कोर्ट्झ येथे झाली. कॅडिझ येथे मार्च १८१२ मध्ये पहिली सोडत झाली आणि त्यासाठी २० हजार तिकीटे काढली गेली होती. आज आधुनिक सर्व खेळ स्पेनमध्ये अस्तित्त्वात असले तरीही 'फॅट वन ऑफ ख्रिसमस' हा खेळ सर्वात पारंपरिक खेळ असल्याने लोकप्रिय आहे. २२ डिसेंबरला जवळ जवळ प्रत्येक व्यक्ती या खेळाची तिकिटे परंपरा म्हणून विकत घेते.

स्पेनमधली लॉटरीची बक्षिसे करमुक्त असून देशाबाहेरील व्यक्तीलाही या लॉटरीत सहभाग घेता येतो.

**श्रीलंका**

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला श्रीलंकेतही खाजगी लॉटऱ्यांचा सुकाळ झाला होता. १९३३ साली

श्रीयुत के. एम. चेल्लपा यांनी आपल्या घरात मोफत वाचनालय सुरू केले. दुसऱ्या वर्षी त्याचं रूपांतर सार्वजनिक वाचनालयात झालं. वाचनालय वाढू लागलं तशी मोठ्या इमारतीची आवश्यकता भासू लागली. मग जाफनाचे महापौर श्री. सॅम सभापती यांनी लॉटरीची तिकिटे विकून निधी जमवण्याचे ठरवले. या लॉटरीतून संकलित झालेल्या निधीतूनच जाफनाचे सार्वजनिक वाचनालय उभे राहिले.

गेल्या चाळीस वर्षांपासून श्रीलंकेतील लॉटरी व्यवसाय हा सरकारी अधिपत्याखाली असून नॅशनल लॉटरी बोर्ड आणि डेव्हलपमेण्ट लॉटरीज बोर्ड अशा दोन संस्था लॉटरीचे संचालन करतात. सहा सोडतीच्या लॉटरी आठवडाभरात आयोजित केल्या जातात.

२००२ सालापासून सरकारने खाजगी लॉटरी चालकांना कायदेशीर मुभा दिली. महसूलातल्या भागीदारीतून खाजगी लॉटरी चालक इथे लॉटरी चालवू शकतो. प्राथमिक स्तरावर ३ अब्ज रुपये भरून प्रतिवर्षी १५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स इतक्या महसुलाची हमी द्यावी लागते. हे कंत्राट सात वर्षांसाठी असते.

जानेवारी २००४ मध्ये डीएलबीने शानिदा वसना आणि संवर्देना वसना नावाच्या नव्या लॉटरी योजना जाहीर केल्या. जयोदा नावाची नवी लॉटरी जाहीर केली. राष्ट्राध्यक्षांच्या निधीला डीएलबीने २००३ सालात ७५ कोटी रुपयांचं योगदान दिलं आहे. जयोदाच्या बक्षिसात दहा लाख रुपयांचा जॅकपॉट आणि इतर अनेक आकर्षक बक्षिसं आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या सोडती वेगळ्या प्रकारे होतात.

हुशार परंतु गरीब मुलांच्या शिक्षणासाठी सरकारने १९८० सालापासून महापोला ही लॉटरी आयोजित केली होती. थोड्या काळासाठी ही लॉटरी बंद होती, पण २००४ सालापासून ती पुन्हा सुरू झाली असून व्यापार आणि जहाज मंत्री श्री. ललित अतुलतमुदली यांचे नियोजन त्यामागे आहे. या लॉटरीतून सात ते आठ हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती बहाल केली जाते.

## स्वित्झर्लँड

स्वित्झर्लँड सोसायटी हा स्वित्झर्लँडमधील फ्रेंच बहुभाषिकांचा प्रांत आहे. १९७३ साली या सोसायटीची लॉटरी सुरू झाली आणि वॉद, व्हलाइस, फ्रिबोर्ग, निश्टेल आणि जिनिव्हा या जिल्ह्यांमध्ये ती कार्यरत होती. १९७९ मध्ये कॅण्टन आणि ज्युरा हे जिल्हेही या लॉटरीत सहभागी झाले. ही लॉटरी लॉतरी रोमाँए किंवा लोरो म्हणून ओळखली जाते.

१९७८ मध्ये लॉतरी रोमाँएतर्फे प्रथम स्क्रॅच तिकीट सादर केले गेले. १९७८ ते २००४ या काळात विविध स्क्रॅच गेम्स तसे विविध बक्षीस योजना सादर झाल्या. सध्या १४ स्क्रॅच गेम्स सादर होत असून कॅडो, ड्रापो, लमॅगो, पायरामियो, रेण्टो आणि ट्रिबोलो हे विशेष लोकप्रिय आहेत. पाच फ्रँक्सपासून ते साडेसहा लाख फ्रँक्सपर्यंत बक्षिसे या लॉटरीतून वितरित केली जातात. २००२ मध्ये मोझाएक ही सीडी रोमवरील लॉटरीही सादर केली गेली. सीडीसोबतच्या स्क्रॅच तिकिटात एक कोड मिळतो. मग सीडी कॉम्प्युटरमध्ये टाकून तो कोड दाबला की सीडीवरील खेळ खेळता येतो आणि जिंकण्यासाठी बुद्धिबळही आजमावे लागते.

१९८९मध्ये स्वित्झर्लंडमध्ये ऑनलाइन लॉटरी खेळ सुरू झाले. १९९१मध्ये पीएमयू रोमान हा स्वीस आणि फ्रेंच घोड्यांच्या शर्यतीवर आधारित बेटिंग गेम सुरू झाला. १९९८ पर्यंत ब्रिटिश आणि अमेरिकन शर्यतींवरचं बेटिंगही इथे सुरू झालं.

केनोचेच बान्को आणि लोटो एक्सप्रेस हे खेळ इथे लोकप्रिय आहेत. इथल्या लोटो एक्सप्रेसची सोडत तर दर पाच मिनिटाला होत असते.

या लॉटरीतून मिळणारा निधी सामाजिक कार्य, कला-संस्कृती, पर्यावरण, पर्यटन, पुरातत्त्व वारसा आणि संशोधन या कारणांसाठी वापरला जातो. सुमारे दीड अब्ज फ्रँक्स वरील कामासाठी आजपर्यंत वापरले गेले आहेत. या खेळातली कमीत कमी ५० टक्के रक्कम ही बक्षिसासाठी ठेवलेली असते.

## थायलंड

थायलंडची प्रथम लॉटरी १९१७ साली राजा रामा पंचम याच्या वाढदिवसाच्या सोहळ्याचा भाग म्हणून आयोजित केली गेली. पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांच्या बरोबरीने लढणाऱ्या थाई लष्करासाठी निधी संकलनाचा भाग म्हणून ती आयोजित केली गेली होती. १९३२ ची लॉटरी थायलंडच्या रेड क्रॉस संघटनेसाठी धर्मादाय निधी म्हणून वापरली गेली. थायलंडच्या सक्तीची लष्करी भरती टाळू पाहणाऱ्या पुरुषांना थाई सरकार जबर कर लावत असे. हा कर १९३४ साली रद्दबातल करण्यात आला. मात्र त्यानंतर सरकारी तिजोरीत प्रचंड तूट जाणवायला लागल्यावर सरकारने महसूल उभा करण्यासाठी लॉटरीचे आयोजन करण्यास सुरुवात केली. त्याच साली विविध प्रांतातील पालिकांच्या योजनांना निधी पुरवण्यासाठी विविध प्रांतिक लॉटरी सुरू करण्यात आल्या. १९३९ साली महसूल विभागाकडून लॉटरी संयोजन वित्तविभागाकडे हलवण्यात आले.

आपल्या द्वैमासिक लॉटरीसाठी लॉटरी कार्यालय एक कोटी चाळीस लक्ष तिकीटे मुद्रित करत असे. त्याच सोडतीसाठी २० लाख तिकिटं क्रीडा संवर्धनासाठी तर ७० लाख तिकिटे धर्मादाय संस्थांसाठी छापली जातात.

या लॉटरी कार्यालयामार्फत ४०० कोटी बाहतची भर सरकारी तिजोरीत टाकली जाते. दरवर्षाला ४४० शिष्यवृत्ती बहाल केल्या जातात. प्रत्येक शिष्यवृत्ती २०,००० बाहतची असते.

## त्रिनिदाद ॲण्ड टोबॅगो

१९६८ साली इथलं नॅशनल लॉटरी कंट्रोल बोर्ड स्थापन झालं. या एनएलसीबी मार्फत प्ले व्हे, कॅश पॉट, दोन्साय आणि पिक टू यासारखे अभिनव खेळ सादर केले गेले. प्ले व्हे हा खेळ मुळात व्हे व्हे किंवा चिनापू या नावे खेळला जायचा आणि चिनी मुसाफिरांनी

तो प्रथम आणला. हा १/३६ प्रकारातला खेळ आहे. या लॉटरीतून येणारी रक्कम एका संयुक्त निधीत जमा होते.

१९८८ मध्ये सर्वप्रथम झटपट लॉटरी स्थापन झाली. या लॉटरीचा नफा क्रीडा आणि सांस्कृतिक कारणांसाठी बहाल केला जातो. परकीय चलनाच्या समस्येमुळे ही लॉटरी बंद पडली होती. कारण तिकिटे एका ब्रिटिश कंपनीकडून पुरवली जायची. १९९५ मध्ये ही लॉटरी पुन्हा सुरू झाली.

**युनायटेड किंगडम**

उशिरा सुरू होऊनही युनायडेड किंगडमची लॉटरी ही सर्वात यशस्वी मानली जाते. नॅशनल लॉटरी कमिशन या लॉटरीचे नियमन करते. लॉटरी खेळणाऱ्याला जास्तीत जास्त फायदा कसा होईल याकडे कमिशन लक्ष पुरवते. कमिशनने केमलॉट या लॉटरी चालक कंपनीला २००९ सालापर्यंतचे परवानापत्र दिले आहे. हा चालक म्हणजे पाच समभागधारकांची खाजगी कंपनी आहे. हे समभाग एकूण विक्रीच्या ०.५ टक्क्यांपेक्षाही कमी असतात. या माध्यमातून जुगाराच्या व्यसनातून मुक्त होण्यासाठी मार्गदर्शन आणि समुपदेशनही केलं जातं.

या लॉटरीच्या माध्यमातून आलेल्या १५.६ अब्ज पौंडाच्या निधीतून ब्रिटनमधील १६५,००० योजना फळास आल्या आहेत.

१९९९ च्या नोव्हेंबरमध्ये शतकपूर्तिच्या निमित्ताने एक खास ख्रिसमस सोडत आयोजित करण्यात आली होती. ती इतकी लोकप्रिय झाली की २००१ साली ती पुन्हा आयोजित करावी लागली. त्यातून ४० दशलक्ष पौंडाचा निधी विधायक कार्यासाठी उपलब्ध झाला.

नॅशनल लॉटरी वर्षाला २८ स्क्रॅच गेम्स सादर करते. कोणत्याही वेळी साधारण १२ खेळ सुरू असतात. कार्स ॲण्ड कॅश, मिलेनिअर, मोनोपली, कॅश फॉर लाइफ, ग्रॅण्ड नॅशनल हे सध्याचे लोकप्रिय झटपट खेळ आहेत.

**युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका**

अमेरिकेतील ३८ राज्यांमधून सध्या लॉटरी खेळली जाते. राज्यांच्या नागरिकांकडून कौल मागवून मगच इथल्या लॉटरी सुरू केल्या गेल्या आहेत.

**ॲरिझोना लॉटरी**

ॲरिझोनाच्या नागरिकांनी १९८० मध्ये लॉटरीसाठी मतदान केले. २००२ मध्ये ७३ टक्के लोकांनी लॉटरी सुरू ठेवावी म्हणून मतदान केले. जून २००३ मध्ये लॉटरी

खेळण्याचं किमान वय १८ वरून २१ वर नेण्यात आलं. प्रत्येक खेळातून येणारा नफा वेगवेगळ्या कामासाठी बहाल केला जातो. हेरिटेज फंड, क्लीन एअर फंड, इकॉनॉमिक डेव्हलपमेंट फंड या निधींना आतापर्यंत पैसा दिला गेला.

## कॅलिफोर्निया लॉटरी

१९८४ साली ५४ टक्के नागरिकांनी कॅलिफोर्नियाच्या लॉटरीसाठी कौल व्यक्त केला. त्यानुसार कॅलिफोर्निया स्टेट लॉटरी ॲक्ट संमत झाला. या कायद्यानुसार लॉटरीच्या उत्पन्नाच्या किमान ३४ टक्के इतका निधी शैक्षणिक उपक्रमांसाठी देणे बंधनकारक आहे.

## कोलोरॅडो लॉटरी

या राज्याची लॉटरी १९८३ साली अस्तित्त्वात आली. या लॉटरीच्या निधीच्या ५० टक्के निधी गोको अर्थात ग्रेट आऊटडोअर्स कोलोरॅडो ट्रस्टमध्ये जमा केला जातो. ४० टक्के कन्झर्व्हेशन ट्रस्ट तर १० टक्के राज्यांच्या बगिच्यांसाठी दिला जातो. गोको निधीला ३५ दशलक्ष डॉलर्सची मर्यादा आखून ठेवली आहे. त्यापेक्षा अधिक निधी झाला तर मग तो निधी सार्वजनिक शाळा किंवा सुरक्षा आणि आरोग्य उपक्रमांवर खर्च केला जातो. कन्झर्व्हेशन फंड हा शहरांतील मोकळ्या जागा, बगिचे, वन्यजीवन आणि अभयारण्य इत्यादींसाठी खर्च केला जातो.

## कनेक्टिकट स्टेट लॉटरी

ही लॉटरी १९७१ साली महसुलाच्या गरजेतून सुरू झाली. सुरुवातीला केवळ 'द लॉटरी' नावाचा एकच खेळ खेळला जायचा. नफा सर्वसाधारण निधीला बहाल केला जायचा. १९७५ मध्ये झटपट स्क्रॅच गेम्स सादर झाले. १९९६ मध्ये कनेक्टिकट हे राज्य लॉटरीचं महामंडळ करणारं पहिलं राज्य ठरलं. सर्वसाधारण निधीतून सार्वजनिक आरोग्य, सुरक्षा, वाचनालय, शिक्षण इत्यादी गोष्टींच्या सुविधांसाठी खर्च केला जातो.

## डीसी लॉटरी आणि चॅरिटेबल गेम्स कण्ट्रोल बोर्ड :

कोलंबिया जिल्ह्याची लॉटरी १९८२ मध्ये सुरू झाली. आतापर्यंत या लॉटरी १ अब्जांहून अधिक निधी राज्याच्या सर्वसाधारण निधीला बहाल केला आहे. त्यातून शिक्षण, सुशोभिकरण, सार्वजनिक सुरक्षा, गृहप्रकल्प, वरिष्ठ नागरिक तसेच बालकल्याणासाठी अनेक सुविधा निर्माण करता आल्या.

## डेलावर लॉटरी

डेलावर लॉटरी १९७५ मध्ये स्थापन झाली. आतापर्यंत या लॉटरीच्या माध्यमातून १ अब्जांहून अधिक निधी संकलित झाला आहे. २००४ च्या आर्थिक वर्षात या लॉटरीच्या

माध्यमातून २२२ दशलक्ष डॉलर्स इतका निधी उभा राहिला. त्यातून उच्चशिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सेवा, सार्वजनिक सुरक्षा, नैसर्गिक स्त्रोत, पर्यावरण, बाल, तरुण तसेच कुटुंब सेवा यांना मोठीच मदत मिळाली. या राज्याची व्हिडियो लॉटरीसुद्धा आहे.

**फ्लोरिडा**

फ्लोरिडाच्या लॉटरीतून येणारा महसूल शिक्षणावर खर्च केला जातो. फ्लोरिडाच्या विधिमंडळाने १९९७ साली फ्लोरिडा ब्राइट फ्युचर स्कॉलरशिप प्रोग्राम संमत केला. माध्यमिक शाळांतील हुशार विद्यार्थ्यांना त्याद्वारे पुरस्कार द्यायला सुरुवात केली. २००३ साली १ लाख १० हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. ज्या बक्षिसांसाठी दावे केले नाहीत ती बक्षिसं स्क्रॅच गेम्सच्या वाढीव बक्षिसासाठी किंवा ऑनलाइन गेमच्या उद्धारासाठी वापरण्यात येतात.

**जॉर्जिया लॉटरी कॉर्पोरेशन**

जॉर्जियाच्या लॉटरीचा इतिहास १७८४ पासून सुरू होतो. मात्र जॉर्जियाची आधुनिक लॉटरी १९९२ साली सुरू झाली. या लॉटरीचा महसूल शिक्षणावर खर्च केला जातो. या लॉटरीतून निधी प्राप्त होणाऱ्या 'होप' या शिष्यवृत्तीद्वारे सुमारे ८ लाख विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त झाली आहे. सुमारे ६ लाख बालविद्यार्थ्यांना पूर्वप्राथमिक शाळेतील प्रवेश सुकर करण्यासाठी या लॉटरीचा मोठाच हातभार लागला आहे. दावा न केलेली बक्षिसं पुन्हा बक्षिसांच्या रकमेत भर टाकतात. त्याचवेळी २ लक्ष डॉलर्स इतकी रक्कम जॉर्जियाच्या मनुष्यबळ विकास विभागाला जाते. त्यातून ते जुगाराच्या व्यसनासंबंधी लोकशिक्षण आणि उपचार या गोष्टी अंमलात आणतात. जीएलसी ६ टक्के राज्याचा आयकर तर २५ टक्के संघराज्याचा आयकर बक्षिसाच्या रकमेतून कापून घेते.

१९९६ च्या अॅटलाण्टा ऑलिंपिकमध्ये जीएलसीने तीन लॉटरी किओस्क लावले होते.

हूजिअर इंडियाना लॉटरी (एचआयएल)

एचआयएलची स्थापना १९८९ मध्ये झाली. आतापर्यंत ३८३ लक्षाधीश या लॉटरीतून निर्माण झाले आहेत. या लॉटरीतून येणारा निधी पोलीस अधिकाऱ्यांच्या तसेच अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांच्या पेन्शन निधीसाठी तसेच शिक्षकांच्या निवृत्ती निधी, रस्ते दुरुस्ती, शाळा, संपत्ती कर संक्रमण निधी आणि इतर सर्वसाधारण निधींना जातो.

राज्य ३.४ टक्क्यांचा स्थानिक कर तर २५ टक्क्यांचा संधारण कर ५००० डॉलर्सवरच्या बक्षिसांसाठी आकारतं.

**इदाहो लॉटरी**

१९८९ मध्ये स्थापन झालेल्या इदाहो लॉटरीतून सार्वजनिक शाळा, कॉलेज आणि विद्यापीठांना २५० दशलक्ष डॉलर्सहून अधिक मदत देऊ केली आहे. विविध शिक्षण संस्थांसाठी एक स्थायी निधी असून त्याला ही लॉटरी आपले योगदान देते.

### इलिनॉइस लॉटरी

१९७५ मध्ये इलिनॉइस राज्याने आपली लॉटरी सुरू केली. १९८५ मध्ये या लॉटरीच्या माध्यमातून येणारा नफा कॉमन स्कूल फंड या निधीत जमा करण्याचा कायदाच केला गेला. त्यायोगे अनेक शाळांना फायदाझाला.

### लोवा लॉटरी

लोवा राज्य लॉटरी १९८५ मध्ये सुरू झाली. 'स्क्रॅच, मॅच अॅण्ड विन' हा पहिला खेळ होता. १९९२ पर्यंत ते फक्त १ डॉलरचे तिकीट विकत होते. बिन्गो हा पहिला २ डॉलरचा खेळ. २००३ मध्ये या लॉटरीतून ४८ दशलक्ष डॉलर्सची गंगाजळी राज्या निधीत पडली.

### कन्सास लॉटरी

कन्सास लॉटरी कायदा १९८४ साली पासून अंमलात आला. महसुलापैकी ५० टक्क्यांहून अधिक सर्वसाधारण निधीत जमा होतो. सर्वसाधारण निधीतून आर्थिक विकासाची कामे केली जातात.

### केनटुकी लॉटरी कॉर्पोरेशन

१९८४ मध्ये स्थापना झालेल्या या कॉर्पोरेशनने राज्याच्या तिजोरीत दोन अब्ज डॉलरहून अधिक रकमेची भर घातली आहे. हा महसूल महाविद्यालयांची अनुदाने तसेच शिष्यवृत्तींवर खर्च केली जातात. १९९९ पासून कॉर्पोरेशन खर्च केला. व्हिएतनाम युद्धातील सैनिकांसाठी ३२ दशलक्ष सर्वसाधारण निधी १.४ अब्ज, तर केनुटकीतल्या सामान्यांना परवडणाऱ्या गृहप्रकल्पासाठी २१ दशलक्ष डॉलर्सची मदत उभी केली गेली.

### लुइझियाना लॉटरी कॉर्पोरेशन

लुइझियाना लॉटरी १९९० मध्ये सुरू झाली. झटपट तिकिटांचा खेळ सर्वप्रथम दाखल केला गेला. २००४ मध्ये कॉर्पोरेशनने ८४ दशलक्ष डॉलर्स इतक्या तिकिटांची विक्री केली.

### मेन् स्टेट लॉटरी

मेन्च्या लॉटरीने राज्य सरकारच्या ६०० दशलक्ष डॉलर्सपेक्षाही अधिक निधईची मदत केली आहे. या निधीतून राज्याच्या २५० हून अधिक प्रकल्पांना मदत मिळते.

**मेरिलॅण्ड स्टेट लॉटरी :**

२००४ मध्ये या राज्याने १.३९५ अब्ज डॉलर्सची तुफानी विक्री नोंदवली.

**मेसॅच्युसेट्स स्टेट लॉटरी कमिशन**

अतिरिक्त महसुलासाठी १९७१ मध्ये कमिशनची सुरुवात झाली. इथल्या विधिमंडळाने एक स्थानिक अनुदान फॉर्म्युला तयार केला होता. त्यानुसार ३५१ शहरांना हा निधी उपलब्ध होतो. ही शहरं त्यांच्या गरजांनुसार हा निधी खर्च करू शकतात. चेस्टर शहराने हा निधी शाळा उभारण्यासाठी, हेलिफॅक्सने त्यांच्या अग्निशमन दलात सुधारणा केल्या, तर ऑरेन्ज शहराने त्यांच्या ग्रामीण शाळांच्या विकासासाठी हा निधी उपयोगात आणला. २००३ मध्ये या कॉमनवेल्थ कमिशनने ७०५ दशलक्ष डॉलर्स वितरित केले.

१९९९ मध्ये कमिशनने मिलिनिअम स्पेक्टॅक्युलर गेम्स आयोजित केला होता. नव्या सहस्त्रकातील पहाटेला झालेल्या सोडतीत उलाढालीच्या ८० टक्के इतकी बक्षिसं ठेवली गेली होती. २००१ मध्ये कमिशनची कचराविरोधी लॉटरी लोकप्रिय झाली होती. बक्षिसं न लागलेल्या तिकिटांच्या एक लाख डॉलर्सची सोडत पुन्हा आयोजित केली गेली. त्यामुळे ४० ते ५० दशलक्ष तिकिटे पुन्हा वापरली गेली. त्यातून ८५ टनांचा कागद वाचवला गेला. २००२ मध्ये अशीच सोडत काढून ७६ टनांचा कागद वाचवण्यात आला.

**मिशिगन ब्युरो ऑफ स्टेट लॉटरी**

१९७२ मध्ये सुरू झालेलया या लॉटरीचे पहिले तिकीट ५० सेंटचे होते. पहिला झटपट खेळ १९७५ मध्येच सादर केला गेला. १९८७ साली तिकिटांची विक्री एक दशलक्ष डॉलर्स इतकी झाली.

१९९५ मध्ये अधिकाऱ्यांनी झटपट तिकिटाच्या बक्षिस वितरणाच्या पद्धतीत बदल करून क्रेडीटऐवजी कन्साइन्मेंट पद्धत सुरू केली. त्यामुळे खेळियांना अनेक पर्यायांची उपलब्धता झाली.

१९७७ मध्ये या लॉटरीने आपली सिल्व्हर ज्युबिली साजरी केली. त्यांचे पाच डॉलर्सचे झटपट खेळ सादर केले गेले.

हा लॉटरी महसूल शाळा आणि शैक्षणिक प्रकल्पांसाठी खर्च होतो. १९७२ पासून या लॉटरीचे योगदान आहे ११.३ अब्ज डॉलर्स. ही रक्कम मिशिगनच्या सार्वजनिक शाळांना उपलब्ध झाली.

**मिनेसोटा स्टेट लॉटरी ( एमएसएल )**

५७ टक्के इतक्या मताधिक्याने १९८८ मध्ये मिनेसोटा लॉटरी सुरू झाली. पर्यावरण

आणि नैसर्गिक स्रोत विश्वस्त निधीला या लॉटरीचं उत्पन्न जातं. त्याशिवाय ग्रेटर मिनेसोटा कॉर्पोरेशनलाही हा निधी वळता केला जातो. विधीमंडळाने १९९१ मध्ये हा नफ्याचा वाटा बदलून ४० टक्के विश्वस्त निधीला तर ६० टक्के सर्वसाधारण निधीला असे प्रमाण केले.

पर्यावरण आणि नैसर्गिक स्रोत संवर्धन निधी हा राज्यातील नैसर्गिक स्रोताच्या जतनासाठी झटणाऱ्या अनेक प्रकल्पांना अर्थसहाय्य करतो. ही लॉटरी सुरू झाल्यापासून १४१ अब्ज डॉलर्सचे २३९ प्रकल्प आकारास आले आहेत. सर्वसाधारण निधीतून सार्वजनिक शिक्षण, आरोग्य सेवा आणि सार्वजनिक सुरक्षा या कारणांसाठी अर्थसहाय्य केले जाते.

पर्यावरणीय प्रकल्पांपैकी *फिश अ‍ॅण्ड वाइल्ड लाइफ कॉरिडॉर्स, मेट्रो ग्रीनवेज, गिची गामी स्टेट ट्रेल, बायोलॉजिकल सव्हे, सॉइल सर्व्हे* या प्रकल्पांना भरगोस आर्थिक सहाय्य मिळाले.

मिनेसोटा स्टेट लॉटरीचा *एन्व्हायरन्मेंटल जर्नल* नावाचा साप्ताहिक ३० मिनिटांचा टीव्ही शो असून तो या राज्यातील नैसर्गिक स्रोतांच्या संरक्षण आणि संवर्धनाबद्दल जनजागृती करत असतो.

**मिसौरी लॉटरी**

१९८५ मध्ये ७० टक्के मतदारांच्या संमतीने मिसौरी लॉटरी सुरू झाली. १९९२ मध्ये मतदानातून लॉटरी विधेयकात पुन्हा सुधारणा करण्यात आली आणि लॉटरीचा पैसा शैक्षणिक कार्यासाठी देण्याचे ठरले. १९९६ मध्ये दहाव्या वर्धापन दिनाला *फन अ‍ॅण्ड फॉर्च्युन* हा टेलिव्हिजन शोही सुरू झाला.

**मॉण्टाना लॉटरी :**

१९८६ साली मॉण्टानाच्या नागरिकांनी लॉटरीच्या बाजूने कौल दिला. त्यानंतर अमेरिकेतलं लॉटरी सुरू करणारं हे तेविसावं राज्य झालं. ‘पॉट ऑफ गोल्ट’ हा झटपट खेळ सर्वप्रथम सुरू झाला.

या लॉटरीचा निधी शिक्षकांच्या निवृत्ती निधीला दिला जातो. १९९१ मध्ये विधिमंडळात विधेयकाद्वारे या लॉटरीचा १.६ टक्के निधी बोर्ड ऑफ क्राइम कंट्रोल या पोलिसांच्या संलग्न विभागाला देण्यात आला. त्याद्वारे बालगुन्हेगारांच्या सुधारगृहांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला. पुढच्या वर्षी हा निधी लॉटरी नफ्याच्या ९.१ टक्के इतका वाढवण्यात आळा. तर १९९५ मध्ये संपूर्ण नफा सर्वसाधारण निधीत समाविष्ट करण्यात येऊ लागला.

### नेब्रास्का लॉटरी

१९९२ मध्ये नेब्रास्का हे अमेरिकेतलं लॉटरी सुरू करणारं ३७ वं राज्य ठरलं. या राज्याची *पॉवरबॉल* आणि *नेब्रास्का पिक* ५ ही लॉटरी सोडत खूपच लोकप्रिय आहे.

या राज्याने मोस्ट *व्हॅल्यूएबल प्लेअर क्लब*ही सुरू केला. या क्लबच्या सदस्यांना नव्या खेळांबद्दल तसेच स्पर्धा, सर्व्हेक्षण आणि संशोधनात सहभागी करून घेतलं जातं. याशिवाय मोफत लॉटरीची तिकिटे, सहली आदी फायदेही यांना मिळतात.

इथल्या विधिमंडळाच्या निदेशांप्रमाणे एज्युकेशल इनोव्हेशन फंड आणि नेब्रास्का स्कॉलरशिप या फंडाला २४.७५ टक्के इतका निधी उपलब्ध होतो. याशिवाय जुगाराच्या व्यसनात अडकलेल्यांसाठी निधी तयार करून त्याला ११ टक्के नफा बहाल केला जातो. आतापर्यंत २०० दशलक्ष डॉलर्स या लॉटरीतून उभे राहिले आहेत.

नेब्रास्का गेम ॲण्ड पार्क्स कमिशनच्या ॲक्वेटिक रिहॅबिलिटेशन प्रोग्राम तसेच लुईस ॲण्ड क्लार्क रिझर्व्हायर आणि रेड क्रीक लेक प्रोजेक्ट या प्रकल्पांना पर्यावरण विश्वस्त निधीतून अर्थसहाय्य झाले आहे.

### न्यू हॅम्पशायर लॉटरी ( एनएचएल )

ही अमेरिकेतली पहिली अत्याधुनिक लॉटरी. १८०० सालात लॉटरीवर बंदी आणल्यानंतर १९६३ मध्ये न्यू हॅम्पशायरनेच सर्वप्रथम लॉटरीची पुनर्स्थापना केली होती.

लोकप्रतिनिधी लॅरी पिकेट यांनी शैक्षणिक कार्यासाठी निधी उभारण्याचे प्रयत्न चालवले होते आणि याकामी त्यांच्या मते झटपट लॉटरी हा सर्वोत्तम पर्याय होता. १९५३ ते १९६३ या दहा वर्षांत त्यांनी पाचवेळा आपले लॉटरी विधेयक पुढे दामटले होते. हे विधेयक गव्हर्नर जॉन किंग यांनी १९६३ मध्ये संमत करून घेतले.

आतापर्यंत या लॉटरीच्या योगे ८५६ दशलक्ष डॉलर्स इतका निधी उपलब्ध झाला.

*एनएचएल प्लेअर्स क्लब*च्या सदस्यांना ई-मेलद्वारे लॉटरीविषयी साद्यंत माहिती पुरवली जाते. दरवर्षाला राज्य सरकार ४० ते ५५ नव्या झटपट लॉटरी सादर करते.

### न्यू मेक्सिको लॉटरी

१९९५ मध्ये सेनेटच्या ८५३ विधेयकाद्वारे *मेक्सिको लॉटरी ऑथॉरिटी* अस्तित्त्वात आली. स्क्रॅच गेम्सची लॉटरी सर्वप्रथम सादर केली गेली.

१९९७ मध्ये २०० व्हेण्डिंग मशीन्स राज्यभर बसवण्यात आले.

१९९६ मध्ये इथल्या विधीमंडळाने ६० टक्के लॉटरी नफा राजधानी *आऊटले*साठी

तर ४० टक्के निधी *लॉटरी ट्यूशन फंडा*साठी राखून ठेवले. २००१ साली विधिमंडळाने संपूर्ण नफा *लॉटरी ट्यूशन फंड* आणि त्याला *लॉटरी सक्सेस स्कॉलरशिप* असं संबोधन प्राप्त झालं. एका वर्षात लॉटरी सक्सेस स्कॉलरशिपमधून २२ हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती बहाल केली गेली. उच्चशिक्षण घेऊ पाहणाऱ्या न्यू मेक्सिकोतील हुशार विद्यार्थ्यांना या लॉटरीचा लाभ मिळतो.

## न्यूयॉर्क लॉटरी

न्यूयॉर्कच्या घटनेत संपूर्ण महसूल शैक्षणिक उपक्रमाला जावा याची तरतूद करून ठेवली आहे. राज्याच्याच सर्वसाधारण निधीला बहाल केला हा निधी राज्याच्या शिक्षण विभागामार्फत शाळांना दिला जातो.

न्यूयॉर्क लॉटरी राज्याच्या एम्पायर स्टेट क्रीडा स्पर्धा, तसेच हौशी राष्ट्रीय ॲथेलेटिक स्पर्धांचे आयोजन करते. लोटो हा खेळ वर्गणीने खेळता येण्याची सुविधा इथे मिळते. क्वीक हा खेळ २१ वर्षावरील व्यक्तीस खेळता येतो. बाकी सगळ्या खेळांसाठी वयोमर्यादा १८ इतकी आहे.

## नॉर्थ डॅकोटा लॉटरी ( एनडीएल )

२००२ मध्ये बहुराज्यीय लॉटरीत समाविष्ट होण्यासाठी राज्य सरकारने घटनात्मक सुधारण केल्या. एनडीएलच्या लोगोची रचना करण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची एक स्पर्धा घेण्यात आली होती. अंतिम लोगो हा अनेक विद्यार्थ्यांच्या एकत्रित संकल्पनांमधून साकारला आहे.

*एनडीएल पॉवरबॉल* हा पहिला खेळ मार्च २००४ मध्ये सुरू झाला. अर्ध्या तासातच दर सेकंदाला २ तिकिटे इतका विक्रीचा वेग होता. *हॉट लोटो* हा खेळ २ महिन्यांनतर सादर करण्यात आला.

एनडीएलने आतापर्यंत ५.३ दशलक्ष डॉलर्सचा निधी उभा केला आहे.

## ओरेगॉन लॉटरी

ओरेगॉन राज्याची लॉटरी १९८४ साली ६६ टक्के मतदारांनी संमत केल्यावर सुरू झाली. राज्याने ब्रेक ओपन खेळ सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर सुरू केले, मात्र त्यांना लोकप्रियता एवढी मिळाली की ३० नवे खेळ सुरू करावे लागले. यथावकाश किनो, मेगाबक्स, स्क्रॅचर्स, पॉवरबॉल हे खेळ सादर केले गेले. १९८९ मध्ये *फूटबॉल स्पोर्ट्स ॲक्शन* ही लॉटरी सादर झाली. ही अमेरिकेतली पहिली स्पोर्ट्स लॉटरी. यातला नफा शैक्षणिक तसेच ॲथेलेटिक शिष्यवृत्त्यांवर अनुक्रमे १२ व ८८ टक्के इतक्या प्रमाणात

खर्च केला जातो.

सुरुवातीला ओरेगॉनच्या शाळांना हा नफा वितरित केला जात असे. नंतर आर्थिक विकास तसेच सार्वजनिक शिक्षणावर निधी विकसित केला जाऊ लागल्या बगिचे आणि सालमोन या माशांच्या जतन संवर्धन प्रकल्प यांनाही निधी मिळू लागला. लॉटरीचा नफा कुणाला मिळावा हे ओरेगॉन मधील मतदार ठरवतात.

१९९० मध्ये ओरेगॉन लॉटरीला लॉटरी एक्स्पो इंटरनॅशनलचं *पायोनिअर अॅवॉर्ड फॉर लॉटरी लीडरशिप* हा पुरस्कार घोषित झाला.

**पेनसिल्व्हानिया लॉटरी**

पेनसिल्व्हानिया लॉटरीही १९७१ साली विधिमंडळ कायदा ९१ द्वारे अस्तित्त्वात आली. १९७२ मध्ये सादर झालेली पहिली लॉटरी अवघी पाच सेंटची होती. १९७५ साली 'रब ऑफ' हा पहिला इन्स्टंट गेम सादर झाला. सध्या ३० स्क्रॅच गेम्स सुरू आहेत. पहिला तीन डिजिटचा खेळ १९७७ मध्ये सादर झाला. पंधराव्या वर्धापन दिनी 'सॅटर्डे स्पिन' हा टीव्हीवरच्या लॉटरीचा खेळही सुरू करण्यात आला.

१९८५ मध्ये राज्याने विक्रेत्यांचे आठवड्याचे हिशेब चुकते करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर सिस्टिम सुरू केली. १९९३ साली व्हेण्डिंग मशीन्स बसवली गेली. यानंतर या लॉटरीची विक्री वाढत गेली.

आतापर्यंत पेनसिल्व्हानिया लॉटरीने १३.८ अब्ज डॉलर्सचं योगदान दिलं आहे. २००३ साली १२१.८८ दशलक्ष डॉलर्स इतका निधी प्रॉपर्टी टॅक्स / रेण्ट रिबेटसाठी देण्यात आला. त्यातून ३२२,००० इतक्या घरांना फायदा झाला. वरिष्ठ नागरिकांसाठी १२०.८२ दशलक्ष डॉलर्सची मदत या लॉटरीतून दिली गेली. वरिष्ठ नागरिकांच्या मास ट्रान्झिट प्रोग्रामसाठी ३९ दशलक्ष मोफत फेऱ्या वाहतूक विभागाने आयोजित केल्या होत्या.

स्वस्त दरातल्या औषध योजनेसाठी पेस अॅण्ड पेसमेल या संस्थेला ३९५ दशलक्ष डॉलर्सची मदत दिली गेली. डिपार्टमेंट ऑफ एजिंगने ६५० वृद्धाश्रमांना २०४.९८ दशलक्ष डॉलर्सची मदत दिली गेली. त्यातून दोन लाख वृद्धांना रोजचं जेवण मिळतं.

**साऊथ कॅरोलिना एज्युकेशन लॉटरी**

साऊथ कॅरोलिनाच्या लॉटरीचा संपूर्ण नफा हा शैक्षणिक उपक्रमासाठी बहाल केला जातो. म्हणूनच या लॉटरीला एज्युकेशन लॉटरी असं म्हटलं जातं. *साऊथ कॅरोलिना कमिशन ऑन हायर एज्युकेशन* ही संस्था *पालमेटो फेलोज, लाइफ स्कॉलरशिप* आणि *साऊथ कॅरोलिना होप स्कॉलरशिप*चं वितरण करते. हा निधी केवळ प्रकल्प आणि

संधीसाठी असून शिक्षकांच्या पगारासाठी त्याचा वापर होणार नाही याची काळजी घेतली जाते.

### साऊथ डॅकोटा लॉटरी

१९८६ मध्ये ६० टक्के मतदारांनी साऊथ डॅकोटा लॉटरीच्या बाजूने कौल दिला. पुढच्याच वर्षी ही लॉटरी सुरू झाली. १९८९ मध्ये राज्याने व्हिडियो लॉटरीचे आयोजन केले. अमेरिकेतली ही पहिलीच व्हिडियो लॉटरी आतापर्यंत या लॉटरीच्या स्क्रॅच गेम्सनी ५५ दशलक्ष डॉलर्सचा निधी उभारला आहे. हा पैसा राज्याच्या सर्वसाधारण निधीला जातो. तिथून तो शिक्षण, आरोग्य आणि सेवा प्रकल्पांना जातो. व्हिडियो लॉटरीने आतापर्यंत ९९० दशलक्ष डॉलर्स इतका निधी उभा केला आहे. सुरुवातीला हा नफा सर्वसाधारण निधीत जमा होतो.

लोटो हा खेळ १९९० मध्ये सुरू झाला आणि त्यातून ४३ दशलक्ष डॉलर्सचा निधी कॅपिटल कन्स्ट्रक्शन फंडकडे गेला. त्यातून जलसंधारण योजना तसेच इथेनॉल उत्पादन आणि महामार्ग निर्मिती प्रकल्प उभे राहिले.

या देशांव्यतिरिक्त जगभर इतर अनेक देश लॉटरीचे आयोजन करत असतात. काही देशांच्या लॉटरी उपक्रमांविषयी थोडक्यात.

### टेनेसी लॉटरी

२००२ मध्ये ५८ टक्के मतदानाने या राज्यात लॉटरी सुरू झाली. टेनेसी एज्युकेशन लॉटरी कॉर्पोरेशन ही निमसरकारी संस्था लॉटरी चालक म्हणून नेमली गेली. या लॉटरीचा निधी शिक्षण, शिष्यवृत्ती आणि उच्च शिक्षण या कामी वापरला जातो. जुलै २००४ पर्यंत या लॉटरीतून १२३ दशलक्ष डॉलर्स इतका निधी शिष्यवृत्तींसाठी उपलब्ध झाला.

### टेक्सास लॉटरी

ही लॉटरी १९९१ मध्ये स्थापन झाली. या लॉटरीत नवे खेळ असले तरीही बिन्गो हा खेळ खास धर्मादाय उपक्रमांसाठी खेळला जातो. आणि त्यावर स्वायत्त धर्मादाय बिन्गो विभागाचा अंमल आहे. आतापर्यंत या लॉटरीतून फाऊंडेशन स्कूल फंडला ६ अब्ज डॉलर्सची मदत मिळाली आहे.

### आफ्रिकन देश

मॉरिशसमध्ये सरकारी लॉटरी समिती पारंपरिक लॉटरीचं आयोजन करते आणि महसूल थेट सरकारी तिजोरीत जमा होतो. जुलै २००४ मध्ये सरकारने ऑनलाइन लॉटरी सुरू केली.

मोझांबिकमध्ये स्पोर्ट्स टोटो ही लॉटरी खूप लोकप्रिय आहे.

युगांडामध्ये २००३ साली बिजींगच्या डेफारी टेक्नॉलॉजीशी हातमिळवणी करून लॉटरी सुरू झाली. मात्र सहयोगी कंपनीने तोट्याचं कारण पुढे करून ही लॉटरी बंद केली. २००४ मध्ये सरकारने व्हिडियो लॉटरी पुन्हा सुरू केली.

झाम्बियाने २००१ मध्ये लॉटरी मॅनेजमेंट कंपनी सुरू करून लोटो गेमचीच सुधारित आवृत्ती क्वाचमॅनिया बिग बॅन्ग म्हणून लॉटरी सुरू केली. झाम्बियातील लोकांच्या मानसिकतेला अनुसरून या खेळाचे आयोजन केले गेले.

अल्जेरिया पॅरी स्पोर्टिफ अल्जेरिअन या लॉटरी कंपनीने लोकप्रिय लोटो आणि स्पाएल तसेच स्पोर्ट्स टोटो लॉटरी सुरू केली.

मोरोक्कोची नॅशनल लॉटरी लोटो / स्पाएल गेम्स, नंबर गेम्स आणि किनो या खेळांचे आयोजन करते. १९६२ मध्ये टोटो पॅरी स्पोर्टिफ हा खेळ सुरू झाला. २००१ मध्ये या लॉटरीची विक्री २३१.३ दशलक्ष दिर्‌हॅम होती.

बेनिनची नॅशनल लॉटरी १९६७ साली स्थापन झाली. २००१ मध्ये ८ अब्ज फ्रँक इतकी विक्री या लॉटरीतून झाली.

नायजेरियाची नॅशनल स्पोर्ट्स लॉटरी २००१ मध्ये अस्तित्त्वात आली. किंग ॲण्ड जॉर्ज लि. ही फूटबॉल पूल कंपनी या लॉटरीची एजंट म्हणून काम पाहते.

सेनेगलची लॉटरी १९८२ साली सुरू झाली. २००३ मध्ये या लॉटरीची उलाढाल ५२ दशलक्ष डॉलर्स होती. लॉटरिए नॅशनल सेनेगलचे खाजगीकरण करण्याचा सरकारचा प्रस्ताव आहे.

सिरिया लेओनेमध्ये २००१ मध्ये बिन्गो ही लॉटरी सुरू झाली. या लॉटरीचा नफा कॅनॉट ॲण्ड प्रिन्स ख्रिस्तियन हॉस्पिटलला आणि नॅशनल स्कूल ऑफ नर्सिंगला तसेच मेडिकल कॉलेज आणि आरोग्यसेवांना जाते.

**आशियाई देश**

कोरियामध्ये कोलोट्टो ही ऑनलाइन चालक संस्था स्ट्राइक इट रिच, ब्लॅकजॅक, स्लॉट ॲण्ड पोकर आदी खेळ सादर करते. या लॉटरीचा नफा बांधका, वाहतूकस सांस्कृतिक आणि समाजकल्याण मंत्रलयांना जातो.

सोल ऑलिम्पिक प्रमोशन फाऊंडेशन ही संस्था १९८९ मध्ये स्थापन झाली. स्पोर्ट्स टोटो आणि इतर लॉटरी खेळांच्या माध्यमातून या संस्थेला निधी उपलब्ध झाला.

तैवानची 'पब्लिक इंटरेस्ट' लॉटरी २००२मध्ये स्थापन झाली. तिथे स्पोर्ट्स लॉटरीही सादर होत आहे.

फिलिपिन्स चॅरिटी स्वीपस्टेक्स ऑफिस ही संस्था १९३५ मध्ये स्थापन झाली. ३० टक्के इतकी रक्कम धर्मादाय कारणांसाठी खर्च होते. फिलिपिन्स अम्युजमेण्ट ॲण्ड गेमिंग कॉर्पोरेशन (पागो) १९८४ साली स्थापन झाली. या लॉटरीची ४० अब्जाहून अधिक विक्री होते.

व्हिएतनामच्या लॉटरीचे आयोजन कन्स्ट्रक्शन लॉटरी ऑफ दी कॅपिटल–हनोई व्हिएतनाम आणि सॉन्ग बे लॉटरी कंपनीमार्फत होते. या लॉटरीची पिक टू आणि पिक थ्री तसेच इन्स्टंट गेम्सच्या आधारे २०० ट्रिलियन डॉन्गपेक्षाही अधिक विक्री होते.

**युरोपियन लॉटरी**

बल्गेरियामधअये स्पोर्ट्स टोटलायझर ही चालकसंस्था वित्तविभागाच्या अधिपत्याखाली लोटो, स्पोर्ट्स बेटिंग आणि इतर खेळांचं आयोजन करते.

लिथुआनिया इथले लॉटरी चालक टेलेलोटो, तुझिनास, किनोलोटो आदी लॉटरी खेळांचे आयोजन करतात.

पोलंडमध्ये टोटलायझेटर स्पोर्टोवी स्पॉल्का ही चालक संस्था डुझी लोटेक, एक्स्प्रेस लॉटरी, मल्टि लोटेक आदी लॉटरी खेळांचे आयोजन करते.

रशियन फेडरेशन आणि प्रेस लोटो या संस्थांकडे राष्ट्रीय लॉटरी परवाना असून. युनियन ऑफ जर्नलिस्ट आणि रग्बी नॅशनल कॉर्पोरेशन अब्जावधी रुबलचा फायदा वाटून घेतात.

युक्रेनमध्येही युक्रेनिअन नॅशनल लॉटरी आणि मोलोद्स्पोर्टलोटो असे दोन लॉटरी चालक आहेत.

इस्टोनियातली लॉटरी सोविएत युनियन अस्तित्त्वात असल्यापासून १९७१ सालापासून सुरू आहे.

फिनलंडची लॉटरी १९४० मध्ये स्थापन झाली.

जिब्राल्टरची लॉटरी १९४७ साली स्थापन झाली. दुसऱ्या महायुद्धांनंतर कर्ज वितरित करण्यासाठी ही लॉटरी अस्तित्त्वात आली.

ग्रीक राज्य लॉटरी १८६२ पासून सुरू आहे. या देशातलं फुटबॉलप्रेम पाहता लॉटरीचा निधी फुटबॉलच्या उत्कर्षासाठी जातो.

इटालीत लॉटरीतला निधी मोठ्या प्रमाणात क्रीडा उत्कर्षासाठी खर्च केला जातो.

माल्टाच्या लोटो डिपार्टमेण्टने आता लॉटरी फायदेशीर न ठरल्याने खाजगीकरणाचा प्रस्ताव स्वीकारला आहे.

पोर्तुगालच सॅन्ता कासा दा मिसेरीकॉर्डिया ही युरोपातली सर्वात जुनी लॉटरी मानली जाते. ती १४९३ साली स्थापन झाली होती.

ऑस्ट्रियातील लॉटरी खेळ हे फुटबॉल खेळाच्या निकालावर अवलंबून असतात.

जर्मनीमध्ये डॉइश क्लासेनलॉटरी आधुनिक खेळ सादर करते. या लॉटरीतून क्रीडा, कला, शिक्षण अशा साऱ्याच उद्दिष्टांसाठी निधी पुरवला जातो.

लक्झेंबर्गच्या १९४५ पासून स्थापन झालेल्या लॉटरीतून मोठा निधी रेड क्रॉस संघटना आणि नॅशनल एनर्जी फंडाला बहाल गेला जातो.

**लॅटिन अमेरिकन देश**

अर्जेंटिना, अरुबा, बार्बाडोस, बोलिव्हिया, ब्राझील, चिली, कोलंबिया, कॉस्टा रिका, इक्वेडोर पोर्तु रिको, उरुग्वे आणि व्हर्जिन आयलँड्स या देशांमध्ये आधुनिक लॉटरींचे आयोजन केले जाते. त्यातून मोठाच निधी विधायक कामांना उपलब्ध होतो.

# इतर उद्दिष्टांची लॉटरी

## धर्मादाय लॉटरी

मनोरंजनाच्या उद्दिष्टाव्यतिरिक्त अनेक ठिकाणी धर्मादाय उद्दिष्टांसाठीही लॉटरी या खेळाचे आयोजन केले जाते. मनोरंजनाच्या लॉटरीतून येणारा निधी सार्वजनिक हितासाठी बहाल केला जातो, तर धर्मादाय लॉटरीचा निधी केवळ नियोजित धर्मादाय कारणांसाठी वापरला जातो.

*मेटन्स* लॉटरी ही धर्मादाय लॉटरी १९९६ मध्ये वार्विकशायरच्या मेटन हॅम्लेट हॉस्पिटलच्या उभारणीसाठी स्थापन केली गेली. *ग्लोलॉट* ही धर्मादाय लॉटरी चार धर्मादाय संस्थांच्या मदतीसाठी चालवली जाते. *ग्लोबलॉट* या लॉटरीच्या माध्यमातून ह्यूमन राइट्स वॉच, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रेड क्रॉस आणि रेड क्रेसेण्ट सोसायटी, वर्ल्ड वाइड फंड फॉर नेचर आणि केअर इंटरनॅशनल या संस्थांना निधी उपलब्ध केला जातो. *कानू हार्ट फाऊंडेशन* ही नायजेरियाची संस्था लहान मुलांच्या ओपन हार्ट सर्जरीच्या ऑपरेशनसाठी धर्मादाय लॉटरीचे आयोजन करते.

नेदरलॅण्डमध्ये एकूण तीन धर्मादाय लॉटरींचं आयोजन केलं जातं. *नॅशनल पोस्टकार्ड लॉटरी, स्पॉन्सर लॉरी* आणि *बँक गिरो लॉटरी* अशी त्यांची नावं आहेत. पैकी *नॅशनल पोस्टकार्ड लॉटरी* ही न्याय विभागाकडून परवानाप्राप्त लॉटरी असून ती समाज आणि पर्यावरण या कारणांसाठी निधी संकलित करते. त्यातून *ॲम्नेस्टी इंटरनॅशनल, युनायटेड नेशन्स हाय कमिशनर फॉर रेफ्युजीज, द डच सोसायटी फॉर नेचर ॲण्ड एन्व्हायरन्मेण्ट, द डच रोड क्रॉस, वर्ल्ड वाइड फंड फॉर नेचर* आणि *स्टिचिंग डोएन* या संस्थांना आतापर्यंत १.२ अब्ज डॉलर्सची मदत विविध उपक्रमांसाठी उपलब्ध झाली आहे. *स्पॉन्सर* लॉटरी ही क्रीडा, संस्कृती, समाजकल्याण आदी उपक्रमांसाठी निधी उपलब्ध करते. आतापर्यंत ७० दशलक्ष युरोंची मदत या लॉटरी बहाल केली आहे. *दी बँक गिरो लॉटरी* ही नेदरलॅण्डची पहिली धर्मादाय लॉटरी असून या लॉटरीतून *हार्ट फाऊंडेशन, ॲण्टी कॅन्सर ऑर्गनायझेशन, एड्स फंड* आणि *प्रिन्स बर्नार्ड कल्चर फंड* या विश्वस्त संस्थांना ७९ दशलक्ष युरोंची मदत मिळाली आहे.

आयर्लंडची रिहॅब लॉटरी शुश्रुषा, प्रशिक्षण, अपंगांसाठी रोजगार या क्षेत्रात काम करणाऱ्या रिहॅब समूहासाठी निधी संकलन करते.

जुनी *ओपोज चॅरिटी लॉटरी* ही युनायटेड किंगडमच्या गेमिंग बोर्डकडे नोंदणीकृत झालेली आहे. या लॉटरीतून निवृत्त सैनिकांसाठी तसेच त्यांच्या कुटुंबांसाठी निधी संकलित केला जातो. *आर्मी बेनेव्होलण्ट फंड* ही संस्थाही *रॉयल नेवल बेनेव्होलेण्ट ट्रस्ट* आणि

*एक्स-पॉ असोसिएशन* या संस्थांसह लॉटरीचे आयोजन करून निधी उभा करते.

*सर मायकेल सोबेल* हे ऑक्सफर्डमध्ये १९७४ साली उभं राहिलेलं हॉस्पिटल. सोबेल हाऊसच्या वतीने १९९९ मध्ये सोबेल लॉटरी सुरू करून हॉस्पिटलच्या खर्चासाठी निधी उभा करण्याचा अभिनव प्रयत्न केला.

*डेफचाइल्ड इंडिया* ही संस्था २००० साली तामिळनाडूमध्ये कार्यरत झाली. या संस्थेला युनायटेड किंगडमच्या नॅशनल लॉटरी चॅरिटी बोर्डकडून द्रव्यबळ उपलब्ध होतं.

भारतातही पश्चिम बंगालमध्ये तसेच केरळमध्ये अनेक धर्मादाय लॉटरींचे आयोजन करण्यात येते. १९८० साली *सुगाल ॲण्ड दामाणी* या सर्वात जुन्या लॉटरी चालकांनी हैद्राबाद येथील मेडिसिटी कॉलेज आणि हॉस्पिटल उभारण्यासाठी बीजद्रव्य मदत म्हणून लॉटरीचे आयोजन केले होते. याच चालकांकडून चेन्नई येथील कॅन्सर इन्स्टिट्यूटसाठी तसेच हैद्राबाद येथील भारतीय विद्या भवनसाठी लॉटरीचे आयोजन केले होते. भारतीय विद्या भवनचे सभागृह लॉटरीच्या निधीतूनच उभारण्यात आले.

अनेक देशांमधून अशा अनेक धर्मादाय लॉटरींचे आयोजन करण्यात येत असते.

### ग्रीन कार्ड लॉटरी

अमेरिकेतली ग्रीन कार्ड लॉटरी ही अमेरिकन सरकारतर्फे वर्क परमिट वितरित करणारी लॉटरी आहे. अमेरिकेने १९९० मध्ये व्हिसा लॉटरी प्रोग्राम सादर केला आहे. त्याला *डायव्हर्सिटी व्हिसा* किंवा *ग्रीन कार्ड लॉटरी* असंही म्हणतात. अमेरिकन नागरिकत्व नसलेल्यांना अमेरिकेत कामाचा परवाना मिळवून देण्याचा किंवा कायमस्वरूपी स्थायिक होण्याचा परवाना मिळवून देण्यास ही लॉटरी वापरली जाते. केनटुकी कोन्स्युलर सेंटरमधून संगणकावर रॅण्डम नंबर निवडले जातात. अमेरिकन सरकारचा विभाग ९० हजार विजेत्यांपैकी प्रथम ५० हजार लोकांना व्हिसा बहाल करतो. कॅनडा, भारत, मेक्सिको, फिलिपिन्स इत्यादी देशांच्या नागरिकांना मात्र या लॉटरीत भाग घेता येत नाही.

### हेरिटेज लॉटरी

पुरातत्त्व वारशांच्या जतन आणि संवर्धन योजनांच्या मदतीसाठी अशा अनेक हेरिटेज लॉटरींचे आयोजन केले जाते.

*ट्वीड रिव्हर हेरिटेज प्रोजेक्ट* ही योजना ४ दशलक्ष पौंडांची होती आणि ब्रिटनच्या *हेरिटेज लॉटरी बोर्ड*च्या निधीमुळेच ती पूर्णत्वास जाऊ शकली. या नदीच्या प्राचीन नैसर्गिक प्रवाहांचे तसेच पर्यावरणाचे जतन-संवर्धन त्यामुळे साध्य होऊ शकले.

हेरिटेज लॉटरी फंडामुळे समृद्ध वारसा–परंपरांचे जतन करण्यासाठी समाजाला दिशा मिळाली. हेरिटेज लॉटरी फंडामधून ग्रीनिचच्या प्राचीन शाही वेधशाळेचे जतन शक्य झाले. त्यासाठी ७ दशलक्ष पौंडाची मदत लॉटरीतूनच उपलब्ध होऊ शकली. बेलेफास्टमधील सेंट जॉर्ज मार्केटचा पुनरुद्धार या लॉटरीमुळेच शक्य झाला. १८९० साली बांधल्या गेलेल्या बाजारांपैकी तो एकमेव टिकून राहिलेला बाजार आहे.

# बहुराष्ट्रीय आणि बहुराज्यीय लॉटरी

## बहुराष्ट्रीय लॉटरी

अनेक राष्ट्रांच्या समूहाने एकत्रित आयोजित केलेल्या लॉटरीला बहुराष्ट्रीय लॉटरी म्हणतात.

### १. व्हायकिंग लॉटरी

*व्हायकिंग लोटो* ही पहिली बहुराष्ट्रीय लॉटरी १९९२ साली पाच स्कॅण्डिनेव्हिअन देशांनी सुरू केली. ही लॉटरी एकाच वेळी डेन्मार्क, फिनलँड, आईसलँड, नॉर्वे आणि स्वीडन या देशांमध्ये राष्ट्रीय लॉटरी म्हणून खेळली जाते. २००० साली इस्टोनिया हे राष्ट्रही या पॅन–नॉर्डिक लॉटरीत समाविष्ट झालं. हा खेळ २००३ सालापर्यंत इतका लोकप्रिय झाला की फिन नागरिकांनीच ६७ दशलक्ष युरोंची उलाढाल केली.

### २. युरो मिलिअन्स

हा खेळ युनायटेड किंगडम, फ्रान्स आणि स्पेन हे देश संयुक्तरित्या आयोजित करतात. साप्ताहिक सोडत पॅरिसमध्ये आयोजित केली जाते.

## बहुराज्यीय लॉटरी

अनेक राज्यांच्या समूहाने एकत्रित आयोजित केलेल्या लॉटरीला बहुराज्यीय लॉटरी म्हणतात.

### १. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका

अमेरिकेत बहुराज्यीय लॉटरीच्या आयोजनाकरिता *मल्टि–स्टेट लॉटरी असोसिएशन* (एमयूएसएल) ही संस्था कार्यरत असते. एमयूएसएल ही एक ना–नफा तत्त्वावर चालणारी संस्था असून आपल्या सदस्य राज्यांसाठी लॉटरीचे आयोजन करते. प्रत्येक राज्य आपला खेळ निवडते आणि तो संचालित केला जातो, एमयूएसएलमार्फत. १९८७ मध्ये स्थापना झालेल्या या मल्टिस्टेट लॉटरीची पहिली सोडत *लोटो अमेरिका* ही होती. चार वर्षांनी हा खेळ काढून घेतला गेला. आता प्रत्येक राज्यांमार्फत विविध खेळ सादर केले जातात. पैकी पॉवरबॉल हा सर्वांत लोकप्रिय खेळ आहे.

लॉटरी खेळणारी व्यक्ती ज्या राज्यातून तिकीट खरेदी केले असेल तिथून आपलं बक्षीस मिळवू शकते. तिकीट आणि बक्षिसांचा हिशेब सदस्य राज्य स्वतंत्रपणे करते. जॅकपॉटचं सादरीकरण, बजेट, खर्च, वित्त अहवाल, सोडतींवरचे परिनिरीक्षण, जनसंपर्क, सॉफ्टवेअर विकास आणि कायदेशीर बाबी ही कामं सदस्य राज्यांकडून वाटून घेतली

जातात. दावा न केलेल्या बक्षिसांच्या रकमांमधून विविध प्रकल्प राबवले जातात.

*द बिग गेम* ही बहुराज्यीय लॉटरी १९९६ मध्ये जॉर्जिया, इलिनॉइस, मेरिलॅण्ड, मॅसॅच्युसेट्स, मिशिगन आणि व्हर्जिनिया या सदस्य राज्यांनी सुरू केली. १९९८ मध्ये त्यांच्यात न्यू जर्सी हे राज्य समाविष्ट झालं. २००२ साली हा खेळ *मेगा मिनिलअन्स* या नावाने ओळखला जाऊ लागला. त्याच वर्षी न्यूयॉर्क, ओहिओ आणि वॉशिंग्टन येऊन मिळाले तर पुढच्या वर्षीच टेक्सासही समाविष्ट झालं.

या खेळातला ५० टक्के वाटा हा खेळाच्या बक्षिसांसाठी जातो. ३५ टक्के वाटा हा सरकारच्या विविध सेवांच्या मदतीसाठी जातो. ५ टक्के रिटेलरच्या कमिशनसाठी तर उरलेला भाग प्रशासकीय गरजांसाठी खर्च होतो.

पॉवरबॉल हा मेगा जॅकपॉटसह असलेला बहुराज्यीय खेळ १९९२ मध्ये २७ राज्यांच्या समावेशाने सुरू झाला. त्यात विशेष म्हणजे कोलंबिया आणि व्हर्जिन आयलँड्स हे जिल्हेही सदस्य म्हणून सहभागी झाले.

मेन्, न्यू हॅम्पशायर आणि व्हरमॉण्ट या सदस्य राज्यांनी १९८५ साली मेगा बक्स तसेच २००३ साली ट्राय स्टेट हेड्स ऑर टेल्स ही बहुराज्यीय लॉटरी सुरू केली.

२००२ मध्ये कोलंबिया, लोवा, मिनेसोटा, मॉण्टाना, न्यू हॅम्पशायर, साऊथ डॅकोटा, वेस्ट व्हर्जिनिया या जिल्ह्यांनी एकत्रित *एनडी हॉट लोटो* ही लॉटरी सुरू केली.

कनेक्टिकट, कोलंबिया जिल्हा, डेलावर, लोवा, कन्सास, केनटुकी, लुइझियाना, मिनेसोटा, न्यू हॅम्पशायर, न्यू मेक्सिको, ओरेगॉन, पेनसिल्व्हानिया, साऊथ कॅरोलिना आणि वेस्ट व्हर्जिनिया या सदस्यांनी मिळून पॉवरबॉल मल्टिमिलेनिअर हा झटपट खेळही सुरू केला.

## ऑस्ट्रेलिया

साऊथ ऑस्ट्रेलिया, व्हिक्टोरिया, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया आणि क्वीन्सलँड या राज्यांनी ऑस्ट्रेलियाची लोटो ब्लॉक ही लॉटरी १९८१ साली सुरू केली. एकत्रित बक्षीस रचने व्यतिरिक्त प्रत्येक सदस्य राज्य कायदेशीर, आर्थिक आणि प्रशासकीय बाबीत स्वायत्त आहेत. ऑस्ट्रेलिया वाइड सॉकर पूल्स ब्लॉक हा खेळ १९८९ मध्ये सुरू झाला. या फूटबॉल सामन्यांच्या निकालावर या लॉटरीचे निकाल अवलंबून असतात. *ओझेड लोटो* आणि *गोल्ड लोटो* तसेच *पॉवरबॉल* आणि *द बिग वन* हे या सदस्य राज्यांकडून एकत्रित खेळले जातात.

## लॉटरी सोडतीची पद्धत

विजेता क्रमांक यदृच्छ (रॅण्डम) पद्धतीने निवडण्याच्या प्रक्रियेला सोडत असं म्हणतात.

हा विजेता क्रमांक विडणं सर्वत्र सामायिक असलं तरीही तो निवडण्याची पद्धती मात्र वेगवेगळी असते. भारतात त्यासाठी फिरते ड्रम्स वापरले जातात. अझरबैजनमध्ये ड्रमनाच क्रमांक देऊन ती वापरली जातात. खेळाप्रमाणे त्यांचे क्रमांक बदलले जातात. काही खेळांसाठी लोटोट्रॉन हे यंत्र वापरलं जातं.

भारतात साधारण तीन प्रकारे सोडती काढल्या जातात.

### यांत्रिक सोडत

जिथे सोडत काढली जाणार आहे तिथे एक आयताकृती यंत्र मध्यवर्ती ठिकाणी ठेवले जाते. या यंत्राला सहा फिरत्या तबकड्या असतात. प्रत्येक तबकडीवर ० ते ९ हे क्रमांक असतात. एका चक्राला जोडलेल्या या तबकड्या चेनने पेडलला जोडलेल्या असतात. पेडल फिरवले की त्या फिरतात आणि पेडल थांबवले की त्या थांबतात. काही वेळा हे मशीन मोटरवर फिरतं आणि त्याला फिरवण्यासाठी किंवा थांबवण्यासाठी बटन असतं. तबकडीवरचा नंबर यंत्राच्या झरोक्यातून दिसतो. परीक्षकांच्या संमतीनंतर हे यंत्र सुरू करता येते. जेव्हा तबकडी फिरण्याची थांबते तेव्हा यंत्राच्या झरोक्यातून तबकडीवरचा क्रमांक दृष्टिपथास येतो. तो नोंदवला जातो. डावीकडून उजवीकडे अशा अनुक्रमाने सोडतीचे आकडे नोंदवले जातात. विजेते क्रमांक सोडत समितीच्या अध्यक्षांकडून नोंदवले जातात. दुसऱ्या आणि तिसऱ्या बक्षिसासाठीचे क्रमांकही याच पद्धतीने निश्चित केले जातात. त्यापुढील बक्षिसं ही शेवटच्या पाच किंवा चार क्रमांकानेच निश्चित होत असल्याने यंक्षाच्या तबकडीद्वारे तेवढेच क्रमांक नोंदवून निश्चित केले जातात. त्यावेळी इतर तबकड्यांचे झरोके आच्छादनाने झाकले जातात. सोडतीचे सर्व विजेते क्रमांक काढल्यानंतर त्यांची अचूकपणे नोंदणी केली जाते. सोडत समितीचे सदस्य नोंदणीपुस्तकात सह्या करून त्यावर शिक्कामोर्तब करतात.

### मानवचलित पद्धती

सोडतीच्या ठिकाणी सहा ड्रम्स सहा क्रमांक काढण्यासाठी आवश्यक असतात. या ड्रम्सना ओळखण्यासाठी रोमन आकड्यांचे मथळे दिले जातात. त्यानुसार त्यांचे लाख, दहा हजार, हजार, शंभर, दहा आणि एकक असे वर्गीकरण होते. प्रत्येक ड्रममध्ये दहा पट्ट्या किंवा शून्य ते नऊ क्रमांक असलेली तबकडी असते. मालिका नोंदवण्यासाठी आणखी एक ड्रम ठेवला जातो. त्या ड्रमवर इंग्रजी आद्याक्षरं नमूद केलेली असतात. उदा.

के ए ३६७२८९. प्रत्येक पट्टीवर अथवा तबकडीवर प्लॅस्टिकचे आच्छादन परीक्षकांच्या साक्षीने लावले जाते. परीक्षकांनी संमती दिल्यानंतर घंटानाद होतो आणि ड्रम्स फिरवले जातात. पुन्हा परीक्षकांच्या संमतीनेच हे ड्रम्स फिरण्याचे थांबवले जाते. प्रत्येक ड्रममधून एकदाच तबकडी किंवा पट्टीवरील नोंद घेतली जाते. अनुक्रमाप्रमाणे फलकावर आकडा लिहिला जातो. मालिका निवडण्यासाठी सातवा ड्रम वापरला जातो. मालिका आद्याक्षरांसह अंतिम सहा आकडे मिळून विजेता क्रमांक घोषित होतो. सोडतीची प्रक्रिया संपल्यानंतर नोंदणी पुस्तकात त्याची नोंद होऊन समिती सदस्या त्यावर सह्या करतात.

### चिठ्ठ्या वापरून मानवचलित पद्धती

ही पद्धती साधारणत: धर्मादाय पद्धतीत वापरली जाते. या पद्धतीत एका ड्रममध्ये क्रमांक छापलेल्या चिठ्ठ्या ठेवलेल्या असतात. विक्री झालेल्या लॉटरी तिकिटांवरील क्रमांकाशी मिळते-जुळते क्रमांकच या चिठ्ठ्यांवर असतात. ड्रम फिरवल्यानंतर आवश्यक तेवढ्याच चिठ्ठ्या काढल्या जातात.

सध्या विजेता क्रमांक घोषित करायला चिठ्ठ्यांऐवजी छोटे चेंडूही वापरले जातात. ही पद्धती अमेरिकेतही लोकप्रिय आहे. सोडतींची संख्या वाढत गेल्याने आता स्वयंचलित ड्रॉ मशीन्सवर सोडती काढल्या जातात.

### चेंडूसंच पद्धती

या पद्धतीत तीन ड्रॉ मशीन्सवर आणि चेंडूचे सहा संच वापरले जातात. यदृच्छ (रॅण्डम) क्रमांक पद्धतीसाठी केवळ दोन मशीन्स वापरल्या जातात. लोटो गेमसाठी आवश्यक असणाऱ्या यंत्रांना सुपरलोटो प्लस ड्रॉ मशीन आणि मेगा ड्रॉ मशीन असं संबोधलं जातं. पांढऱ्या रंगाच्या चेंडूंचे तीन संच सुपर लोटो प्लस ड्रॉ मध्ये आणि जांभळ्या रंगाच्या चेंडूंचे तीन संच मेगा ड्रॉसाठी वापरले जातात. निकाल घोषित करणारे चेंडू एका क्रमांकसंरक्षित धातूच्या सीलने एका पेटीत बंद केले जातात. सील उघडताना या धातूच्या सीलवरचा क्रमांकही नोंदवला जातो. जर हे चेंडू किंवा मशीन अपयशी किंवा शंकास्पद ठरल्यास सोडतीसाठी तिसऱ्या राखीव मशीनचा वापर केला जातो. प्रत्यक्ष सोडतीच्या आधी मशीन व चेंडू यांचे बारकाईने परीक्षण केले जाते. सोडतीचा निकाल जाहीर झाल्यानंतर मान्यवर संख्याशास्त्रज्ञांकरवी निकालाचे विश्लेषण करवून निकालाचे आकडे हे संख्याशास्त्राच्या यदृच्छ नियम पद्धतीला धरून असल्याचे प्रमाणपत्र घेतले जाते.

यंत्राचे परीक्षण केल्यानंतरच यंत्र अधिकृत सोडतीसाठी सक्षम मानले जाते. तिकीटविक्री

अधोरेखित वेळेतच बंद झाल्याची खातरजमा केली जाते. स्वयंचलित यंत्रामध्ये मुख्य ड्रम फिरत असताना आत त्याच्या विरुद्ध दिशेला फिरणारे काटे असतात. चेंडूंची घुसळण होऊन आकडे मुद्रित असलेले काही चेंडू बाहेर येऊन काचेच्या भांड्यात पडतात. यांत्रिक आखणीप्रमाणे सोडतीसाठी आवश्यक असणाऱ्या संख्येइतके चेंडू बाहेर पडतात आणि विजेता क्रमांक घोषित होतो.

### स्वयंचलित सोडत

फॅण्टसी ५, डेली डर्बी टीएम आणि डेली ३ या खेळांसाठी ही पद्धती वापरली जाते. स्वयंचलित सोडत १९९८ मध्ये सादर झाली. आकड्यांच्या खेळात वाढ झाल्यानंतर अशा स्वयंचलित सोडतीची आवश्यकता निर्माण झाली. अधिक वेगवान, सक्षम, विश्वासार्ह आणि देखभाल खर्चविरहीत अशी यंत्रणा आवश्यक होतीच.

ऑटोमेटेड ड्रॉ मशीन्स अर्थात एटीएम. हे स्वयंपूर्ण संगणक असतात. यदृच्छ (रॅण्डम) गतीने आकडे काढणारी आज्ञाप्रणाली या संगणकात विकसित केलेली असते. या संगणकाच्या हार्ड डिस्कला क्रमांकसंरक्षित सील असतं आणि यदृच्छ क्रमांक काढणारी आज्ञाप्रणाली कुणीही बदलू शकणार नाही अशी पद्धतीने ती संगणकात कलम केलेली असते. दोन यंत्रांपैकी एखादे यंत्र नादुरुस्त झाल्यास तिसरे यंत्र तयार ठेवलेले असते.

### अमेरिकेतील मानवचलित पद्धती

ही पूर्णतः मानवचलित पद्धती आहे. फॅण्टसी ५ या लॉटरीच्या प्रवेशिकांची कूपन्स अमेरिकेत पोस्ट ऑफिसद्वारे लॉटरी कार्यालयात ट्रे आणि रॅक्समध्ये सादर केल्या जातात. प्रत्येक ट्रेमध्ये १२०० पाकिटं असतात आणि प्रत्येक रॅकमध्ये ३६ ट्रे असतात. प्रत्येक ट्रेला क्रमांक दिलेला असतो.

लॉटरीची सोडत काढणारा हा लॉटरी कंपनीचा कर्मचारी नसतो. ट्रेच्या क्रमांकाप्रमाणे कॅप्सूल्स एका ड्रममध्ये ठेवलेल्या असतात. सोडत काढणारा जितके विजेते घोषित करायचे आहेत तेवढ्याच कॅप्सूल्स बाहेर काढतो. निवडलेल्या क्रमांकाप्रमाणे ट्रे समोर आल्यानंतर न पाहता त्यातील एका पाकिटावर पट्टी ठेवली जाते. सगळे विजेते घोषित होईपर्यंत ही पद्धती पुन:पुन्हा राबवली जाते. उरलेल्या सर्व पाकिटांची तातडीने विल्हेवाट लावली जाते.

सोडतीचा दिनांक आणि वेळ तिकिटावर उद्धृत केलेली असते. काही कारणाने ही तारीख पुढे ढकलण्याचा अधिकार सरकारला असतो. मात्र पुढे ढकललेल्या तारखेचा

तपशील विविध माध्यमांतून लोकांसमोर ठेवावा लागतो.

ही सोडत सर्वांसाठी खुली असते. अनेक अशा सोडती टीव्हीवर प्रक्षेपित केल्या जातात. सोडती दरम्यान सुरक्षिततेसाठी खूप खबरदारी घेतलेली असते. त्या संदर्भात अधिक माहिती स्पर्धकांचे संरक्षण आणि सुरक्षात्मक पावलांच्या प्रकरणात आली आहे.

# भारतीय लॉटरीतील आर्थिक पैलू

तिकीटविक्री आणि बक्षिसांचे वितरण याव्यतिरिक्त लॉटरी व्यवसायाला अनेक आर्थिक पैलूही असतात. पेपर लॉटरीचे तिकीट साधारत: ११ रुपयांना मिळते. त्यातले १० रुपये बक्षिसाच्या निधीसाठी जातात. काही खेळांची प्रत्यक्ष किंमत १.१० रुपये इतकीच असते.

## सरकारची महसूलप्राप्ती

जेव्हा राज्य सरकार लॉटरी चालकांकडून निविदा मागवते तेव्हाच चालकांना निविदेसोबत काही रक्कम अनामत म्हणून ठेवावी लागते. तिचा परतावा मिळतो. यशस्वी निविदाधारकाला विशिष्ट सुरक्षाठेवही सरकारकडे जमा करावी लागते. त्याद्वारे करारबद्ध काळाच्या आधी चालक आपला व्यवसाय गुंडाळून परागंदा होणार नाही याची खातरजमा होते. ही ठेव परताव्याच्या बोलीवर असल्यामुळे सरकारला केवळ त्यावरच्या व्याजाचा लाभ होतो.

सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो तो तिकीटविक्रीतूनच. निविदाधारकाने आपल्या निविदेत किमान रकमेची हमी नमूद केलेली असते. उदा. ऑनलाइन चालकाने पाच वर्षांच्या करारबद्ध काळासाठी अकराशे कोटी रुपयांचा महसूल राज्याच्या तिजोरीत भरला जाण्याची हमी दिलेली असते. ही रक्कम परवानाशुल्काच्या अनुषंगाने घेतली जाते. अशावेळी चालक ११४१ कोटी रुपये सात वर्षांच्या काळात किंवा एकूण उलाढालीच्या १७ टक्के किंवा दोहोंपेक्षा जे जास्त असेल तेवढ्या रकमेची हमी देतो. तिकीटविक्रीतून येणाऱ्या महसुलाव्यतिरिक्त चालकाकडून मिळणारा विक्रीकर वेगवेगळा असू शकतो. पश्चिम बंगालने विक्रीकरासाठी वेगवेगळ्या श्रेणी ठरवल्या आहेत. प्रत्येक राज्य सरकारचा महसूल लॉटरी योजनांप्रमाणे आणि इतर राज्याच्या लॉटरींच्या यशापयशावर ठरते. उदा. केरळमध्ये मेघालय आणि नागालॅण्ड या राज्यांच्या लॉटरी अधिक लोकप्रिय आहेत. याचे मुख्य कारण असे की केरळ राज्य सरकारच्या लॉटरीचे बक्षीस अवघे ५० टक्केच पदरी पडते तर बाकीच्या राज्यांच्या बक्षीस रचनेनुसार ८० टक्के रक्कम मिळू शकते. थोडक्यात साधारण ऑनलाइन लॉटरी ही कागदी लॉटरीपेक्षा अधिक महसूल खेचून आणते.

## चालकांचे अर्थकारण

अनामत रकमांशिवाय लॉटरी चालकाला तो विकत घेत असलेल्या तिकिटांची बँक गॅरंटीही सरकारला द्यावी लागते. सरकारचं मानधन हे तिकीटविक्रीनंतर देण्यात येत असल्याने बँक गॅरंटीमुळे सरकारचे हितसंबध आर्थिकदृष्ट्या सुरक्षित राहतात.

याशिवाय ऑनलाइन चालकाला पायाभूत सुविधांवर भरपूर पैसे खर्च करावे लागतात.

जेव्हा एखादी चालक कंपनी लोटो गेम सादर करते तेव्हा सुमारे १०० कोटींची गुंतणूक ३०० टर्मिनलवर करावी लागते. ४००० अतिरिक्त टर्मिनल थाटण्यासाठी कंपनीला ३५० कोटी अतिरिक्त खर्च असतो. एका ऑनलाइन ऑपरेटरचं बजेट ४०० कोटी रुपयांचं आहे.

### विक्रेत्याचं अर्थकारण

ऑनलाइन लॉटरीचा विक्रेता बनण्यासाठीही व्यक्तीला विशिष्ट अनामत रक्कम चालक कंपनीकडे भरावी लागते. जेव्हा विक्रेत्याच्या स्रोतांची कंपनीला खात्र पडते तेव्हा मग कंपनी सुमारे ५ लाख रुपये किमतीच्या टर्मिनल व सॉफ्टवेअरची विक्रेत्याच्या जागेत उभारणी करून देते. किरकोळ विक्रेता चालकाकडे अनामत ठेवतो. त्या रकमेतून चालकाला व्याज मिळते. डिपॉझिटची रक्कम आणि व्याज चालकाप्रमाणे वेगवेगळी असू शकते.

विकलेल्या तिकिटांवरील कमिशन राज्यांप्रमाणे वेगवेगळं असू शकतं. विक्रेत्याने विकलेल्या तिकिटाला बक्षीस लागल्यास विक्रेत्यालाही त्यातील टक्केवारी मिळते. पेपर आणि ऑनलाइन लॉटरी अशा दोन्ही लॉटरीत हा हिस्सा दिला जातो. अर्थात हे बोनस कमिशनही राज्यांप्रमाणे वेगवेगळं असतं. बहुतेक ऑनलाइन लॉटरी चालकांकडून विजेत्या बक्षिसांच्या १५ टक्के तर जॅकपॉटच्या २ टक्के इतकी रक्कम विक्रेत्याला मिळते. उदा. जेव्हा सिक्किमच्या लॉटरीचा जॅकपॉट विजेत्याला ८.६१ कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर झालं तेव्हा ज्याच्याकडून हे रुपये घेतलं गेलं त्या विक्रेत्याला ८.६१ लाख रुपये इतके रुपये १ टक्क्यांनी मिळाले.

# भारतीय लॉटरीतील करपद्धती

भारतात १९६१ च्या आयकर कायद्याच्या ५६(२) या कलमा अंतर्गत लॉटरीतून मिळालेली रक्कम ही करपात्र ठरवली जाते. हा कर लॉटरीतून मिळणाऱ्या एकूण रकमेवर ठरवला जातो. ही रक्कम आयकराच्या खास दराने करपात्र ठरते. साधारण ३० टक्के अधिक अधिभार असं त्याचं स्वरूप आहे.

**डिडक्शन ऑफ टॅक्स ॲट सोर्स ( टीडीएस )**

लॉटरीच्या माध्यमातून ५००० पेक्षा अधिक रक्कम मिळाल्यास ती ायकर कागय्दा, १९६१ च्या कलम १९४ (बी) नुसार टीडीएस कापून दिली जाते.

काही लॉटरी योजनांमध्ये हप्त्यांनी बक्षिसाची रक्कम दिली जाते. अशावेळी प्रत्येक हप्त्याच्या वेळी असा कर वसूल केला जातो.

बक्षिसाचीक्कम एकाच वेळी पूर्णांशाने दिली जात नाही. तेव्हा बक्षीस देणाऱ्या एजंटनेच विजेत्याकडून कराची रक्कम वसूल करणे शक्य असते. जेव्हा बक्षिसाची काही रक्कम रोख व काही इतर स्वरूपात असेल तर बक्षिसाच्या एकत्रित मूल्यावर कर आकारावा लागतो. जर यातला रोखीचा व्यवहार हा करपरताव्याइतका नसेल तर मग हा व्यवहार संपूर्ण बक्षीस हस्तांतरित करण्याआधी पूर्ण करावा लागतो. अन्यथा विक्रेत्याला हा कर भरावा लागतो.

**१. टीडीएस लागू होत नाही अशा काही परिस्थिती...**

जेव्हा बक्षिसाची रक्कम एका विजेत्या लॉटरीतून आलेली असते आणि बक्षिसाची संपूर्ण रक्कम एकाच आर्थिक वर्षात दिली गेली नसल्यास जर विजेत्याने ५००० रुपयांच्या लॉटरी दोन वेगवेगळ्या आर्थिक वर्षात जिंकल्यास त्यांची एकत्रित रकमेवर कर भरावा लागत नाही. विजेत्यांनी ३००० रुपयांचे बक्षीस दोन वेगवेगळ्या सोडतीत जिंकल्यास त्यालाही टीडीएस लागत नाही.

दावा न केलेल्या आणि विजेत्याला न दिल्या गेलेल्या लॉटरीवर कोणताही कर लागत नाही.

लॉटरी विक्रेत्याच्या बोनसवर कमिशनरूपात मिळालेल्या पैशाला कलम १९४ (बी) नुसार कर लागत नाही.

न विकलेल्या तिकिटावर विक्रेत्यास बक्षीस लागल्यास ते व्यावसायिक उत्पन्न म्हणून ग्राह्य धरले जाते आणि त्याचा कर कापून घेतला जात नाही.

**२. कमिशनवरचा टीडीएस**

कलम १९४ (जी)नुसार लॉटरीच्या एजंटचे उत्पन्न करपात्र असते. जर एकूण बक्षिसाची रक्कम १००० पेक्षा जास्त असेल तर ही मर्यादा एकूण नव्हे तर एकाच कमिशनसाठी ग्राह्य धरली जाते.

एजटंला प्रत्यक्ष कमिशनचे पैसे मिळाल्यावर मगच टीडीएस लागू होतो. जर एजंटला सरकारकडूनच लॉटरीची तिकीटं मिळाली असतील. आणि जर कमिशनवर सवलत मिळाली असेल तर त्यावर टीडीएस लागू होत नाही.

**सेवा कर ( सर्व्हिस टॅक्स )**

नुकतंच सरकारने कमिशन एजंटची सेवा ही सेवाकरांतर्गत नोंदणीकृत केली आहे. त्यामुळे लॉटरी एजंटला मिळणाऱ्या कमिशनमध्ये आता सेवा कराचाही अंतर्भाव झाला आहे. प्रत्यक्षात हा व्यवहार खरेदी-विक्रीच्या पायावर होतो आणि तिकिटांची खरेदी-विक्री ही सेवा करात येत नाही.

**विक्री कर :**

सरकार पेपर आणि ऑनलाइन आणि दोन्ही लॉटरींवर विक्री कर लादते. केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, पंजाब आणि हरियाणातही राज्य सरकार विक्री कर घेतात. विक्री कराची टक्केवारी राज्यनिहाय वेगवेगळी असते.

## लॉटरी सुरळीत चालण्यासाठी

भारतीय लॉटरी व्यवसायाच्या एकूणच चलनवलनाच्या पद्धतीतील त्रुटींसाठी लॉटरी चालकांवर अनेक आरोप केले जातात. जर हे आरोप अगदी पूर्णत: नाही तरी अंशत: खरे असतील तर त्याचा अर्थ सरकारच्या उत्पन्नातील बऱ्यापैकी हिस्सा गमावला जात आहे. मात्र अशी परिस्थिती उद्भवली आहे कारण लॉटरी पद्धतीत कोणतीही कठोर नियमप्रणाली नाही. आणि बंदी आणल्यामुळे काही अनियमिततेवर तोडगा निघत नाही.

काही राज्य सरकारं लॉटरी चालकांकडून ठराविक नफा घेतात. किती लॉटरी तिकिटांची विक्री झाली याचा अंदाजही न घेता काहीवेळा नफा म्हणून प्रत्येक सोडतीमागे अवघे ५५० रुपयेही घेतले जातात. त्यामुळे नुसतीच लॉटऱ्यांची संख्या वाढत जाते आणि त्याचा फायदा चालकांना होत जातो. जर सरकारला या व्यवसायातून फायदा होत आहे तर त्यांनी त्यांचा फायदा तिकिटाच्या दर्शनी किमतीच्या विशिष्ट टक्केवारीच्या स्वरूपात निश्चित करायला हवाय. निदान किमान ५ टक्के मानधन तरी आकारायला हवंय.

त्याचप्रकारे राज्य सरकार विक्री कराची एकच ठराविक रक्कम निश्चित करतं. लॉटरी तिकिटांच्या उलाढालीशी त्याचा संबंध त्यामुळे राहात नाही. त्याचा फायदा चालकांना होतो आणि राज्य सरकारच्या तिजोरीत काहीच जमा होत नाही. तिकिट विक्रीची उलाढाल आणि विक्री करांची श्रेणी यांची सांगड घातली जाणं आवश्यक आहे. उदाहरणार्थ ४० लाखांपर्यंतच्या तिकिट विक्रीवर २०,००० रुपयांचा विक्रीकर आकारला जाऊ शकतो तर ४० ते ६० लाख उलाढालीच्या श्रेणीवर ४० हजार इतका विक्री कर आकारला जाऊ शकतो.

सरकार जेव्हा लॉटरीवर बंदी आणतं तेव्हा प्रत्यक्षात सरकारचं उद्दिष्टं कधीच सफल होत नाही. कारण इतर राज्यांच्या लॉटरी सुरूच राहतात. साधारणत: ११ रुपयांचं तिकिट मग बेकायदेशीररित्या साडेअकरा रुपयांना विकलं जाऊ लागतं. तरीही खेळाडू तिकिटं विकत घेतात आणि सरकार आपल्या विक्री कराच्या महसुलाला मुकतं.

समजा स्थानिक सर्व लॉटरींवर बंदी जरी आणली तरीही परदेशी ऑनलाइन लॉटरींचा पर्याय लोकांसाठी खुला राहतोच. त्यामुळे आपल्या परकीय चलनाला गळती लागते.

अनेकदा लॉटरी योजनेतून सरकारला हवा तेवढा फायदा होत नाही याला अधिकारीवर्गाकडून निविदा पद्धतीत तसेच करारनाम्यात केली गेलेली हेळसांड कारणीभूत असते.

काही राज्यांमध्ये करारातच प्रत्येक लॉटरी स्कीममध्ये किती संख्येने तिकिटं छापली जावीत याचा काहीच तपशील नसतो. जर राज्याने मानधन तिकिटांच्या संख्येवर

आकारायचे ठरवल्यास चालक छोट्या योजनेला प्राधान्य देतात. चालक कमीत कमी तिकिटं छापतात आणि नंतर मग फक्त विजेत्या क्रमांकाचीच तिकिटं छापून घेतात. त्यामुळे प्रत्यक्षात खेळाडूंच्या हाती पडणं आवश्यक असणारी बक्षिसं चालकांच्या हाती पडतात. राज्याने निश्चित मानधन ठरवल्यास मग चालक मोठ्या लॉटरीला प्राधान्य देतात. प्रत्यक्षात तो विक्रीसाठी आवश्यक गरजेपेक्षाही अधिक तिकिटं छापून घेतो. उदाहरणार्थ एका राज्याच्या लॉटरीसाठी प्रत्यक्षात ४६ लाख तिकिटांचीच आवश्यकता असताना चालकाने ५६ लाख तिकिटं छापून घेतली होती. अधिकच्या छपाईमुळे चालकाकडची तिकिटं विजेती घोषित होण्याची शक्यता कैक पटीने वाढली.

काही राज्यांमध्ये करारनाम्यातच राज्य सरकार आणि चालक (सोल सेलिंग एजंट) यांच्या नफ्याच्या हिश्श्याचं विवरण केलेलं नसतं.

एका प्रकरणी, राज्य सरकारने दर्शन मूल्याच्या ९१ टक्के रक्कम ही बक्षीस म्हणून दिली जावी असे स्पष्ट नमूद केले असतानाही प्रत्यक्षात ७८ टक्के रकमेची बक्षीसंच वितरित झाली.

जेव्हा बक्षीसं जाहीर होतात तेव्हा त्यात आयकराची वजावट नमूद केलेली नसते. मात्र सोल सेलिंग एजंटकढून आयकरा व्यतिरिक्त अतिरिक्त रकमेची वजावट बक्षिसातून केली जाते. ती आता प्रथाच पडल्यासारखी झाली आहे. या मार्गाने चालक १० ते २५ टक्केपर्यंतचा आला खर्च काढून घेतात. मात्र आपल्या बक्षिसातला काही हिस्सा गमावतो आहोत हे खेळाडूच्या लक्षात येत नाही.

काही वेळा एजंट राज्य सरकारकडून परवानगी घेऊन आयत्यावेळी सोडत रद्द करतो. मात्र राज्य सरकार तिकिटं विकली गेली आहेत किंवा नाहीत याची खातरजमा करत नाही. अशावेळी तिकिटं विकली गेलेली असल्यास सरकार आणि खेळाडू या दोघांनाही अंधारात ठेवून तिकिट विक्रीतून आलेली रक्कम चालक स्वत:कडे ठेवतो. ही रक्कम समाजविघातक घटकांपर्यंत पोहचल्याच्याही काही घटना घडल्या आहेत.

करारात नमूद केलेल्या कालावधीत चालक बक्षिसांची रक्कम आणि सरकारचे मानधन सरकारी तिजोरीत जमा करतो की नाही याचे भान ठेवणेही गरजेचे असते. त्यात दिरंगाई झाल्यास कोणतीही दंडात्मक कारवाई किंवा व्याज आकारणी करण्याची तरतूद करारात नाही.

आणखी एक संभ्रमात टाकण्याचा प्रकार म्हणजे लॉटरीच्या सोडतीच्या दिवशी चुकीचा विजेता क्रमांक घोषित करायचा आणि मग काही दिवसांनी त्याची सुधारित नोंद

प्रसिद्ध करायची. याद्वारे खेळाडूंना मूर्ख बनवलं जातं. कारण बक्षीस लागलेले नाही असं समजून अनेक खेळाडूंनी आपली तिकिटं फाडून फेकून दिलेली असतात. चालक त्यानंतर मग दावा न केलेल्या तिकिटांची बनावट तयार करून बक्षिसांवर दावा करतात.

अशाही काही तक्रारी आल्या आहेत की एजंट अधिकाऱ्यांना हाताशी धरून किंवा त्यांना धमकावून विक्री न झालेल्या तिकिटांचे क्रमांक विजेते म्हणून घोषित करायला लावतात. काही वेळा मूळ निकालातही बदल केला जातो.

हे आरोप पाहिले तर लॉटरीच्या चलनवलनात पारदर्शकता येणं गरजेचं आहे तसंच सरकारकडून कठोर नियमावलींची आचारसंहिता राबवणं गरजेचं आहे, हे लक्षात येतं. सेबी किंवा ट्रायप्रमाणे लॉटरी व्यवसायातही नियमन आणण्यासाठी एखादं नियामक मंडळ स्थापन करण्याची गरज आहे.

# खेळियांचे संरक्षण

जरी लॉटरीच्या माध्यमातून सरकारला चांगला महसूल प्राप्त होत असला तरीही खेळाडूंच्या सुरक्षेचा विचार चहूअंगांनी करणं आवश्यक असतं. खेळाडूंच्या सुरक्षिततेची आवश्यकता निर्माण होण्यामागे अनेक कारणं आहेत.

लॉटरी चालक त्यांच्या विविध खेळ योजनांबद्दल जाहिरात करत असतात. जाहिरातींद्वारे लॉटरीचे समर्थन करत असताना त्यातून लॉटरी हा मनोरंजक खेळ असून तो काही उत्पन्नाचे स्थिर साधन नाही, हा संदेश आवर्जून पोहचायला हवा. परदेशी असा संदेश जाईल हे काळजीपूर्वक बघितलं जातं. जेव्हा खाजगी चालक लॉटरी चालवतात तेव्हा तर ही गोष्ट अधिक काळजीने वापरली पाहिजे. युनायटेड किंगडमच्या नॅशनल लॉटरीने खेळाडूंच्या सुरक्षिततेसाठी काही मार्गदर्शक तत्त्वेच घालून दिली आहेत. ती आपल्याकडेही अनुकरणीय आहेत. इंग्लंडच्या बेटिंग ॲण्ड गेमिगं ॲक्ट, १९६० नुसार आवश्यकता आणि मागणी असतानाच अशा खेळांची संधी दिली जावी असे स्पष्टपणे म्हटलेले आहे. जाहिरातीसाठीही आचारसंहिता असून त्यात जाहिरातीतला मजकूर, तिकिटाची रचना, अपेक्षित ग्राहक इत्यादी गोष्टींचा तपशील आहे. आर्थिक विपन्नावस्थेतून बाहेर काढणारा मार्ग अशा पद्धतीने लॉटरीवर प्रकाशझोत येणार नाही याची काळजी घेतली जाते. पेपर लॉटरी किंवा ऑनलाइन लॉटरीच्या तिकिटावरही तसा संविधानिक इशारा देण्यात आलेला असतो.

पेपर आणि ऑनलाइन तिकिटं विकणाऱ्या दुकानांमध्ये प्रत्येक योजनेची लॉटरीची पद्धत, बक्षिसांची रचना आणि जिंकण्याच्या बहुशक्यता यांची विस्तृत माहिती देणारी पत्रकं लावणं बंधनकारक आहे. खेळाडू केवळ बक्षिसाच्या अवाढव्य रकमेकडे आकृष्ट होऊ नये यासाठी बक्षीस प्राप्त होण्याची बहुशक्यता लक्षात आणून देणं गरजेचं असतं. साधारणत: ज्या योजनेत बक्षिसं अधिक रकमेची असतात तिथे जिंकण्याच्या शक्यता कमी होतात. अमेरिकन लॉटरींच्या तिकिटावर जिंकण्यातील विषम तत्त्वे अधोरेखित केलेली असतात.

सरकारने तिकिटावर आयकराव्यतिरिक्त इतर कोणतीही फी आकारली जाणार नाही हे स्पष्टपणे लिहिणं आवश्यक आहे जेणेकरून खेळाडू नाडला जाणार नाही.

आणखी एक मुद्दा सामाजिक चळवळींचे कार्यकर्ते आणि लॉटरीविरोधक लॉबीनेही लक्षात आणून दिलाय तो असा की अचानक प्रचंड पैसा हाती आल्यानंतर व्यक्तीवर होणारे काही घातक परिणाम. जॅकपॉट जिंकणाऱ्या निम्न वा मध्यमवर्गीय व्यक्तीच्या बाबतीत असं बऱ्याचदा घडतं. पैशाबरोबर येणाऱ्या बदलांशी विशेषत: सामाजिक प्रतिष्ठा

आणि प्रसिद्धी माध्यमांचा आकर्षणबिंदू होण्याबाबत ते जुळवून घेऊ शकत नाही. जॅकपॉट लागल्यानंतर कुटुंबकलह वाढून घटस्फोटाचे प्रमाण वाढल्याची काही उदाहरणं परदेशात आहेत. त्यावर एक तोडगा अमेरिकेत असा काढलाय की बक्षिसाची रक्कम एकदम विजेत्याच्या हाती देण्याऐवजी ती काही वर्षांच्या टप्प्यात देण्यात यावी. त्यामुळे एकदम मोठ्या प्रमाणावर पैसा खेळाडूच्या हाती येत नाही. जरी सध्या हा तोडगा पर्यायी असला तरी तो बंधनकारक होण्याचीही शक्यता आहे.

लॉटरीची योजना अशी असावी की खेळाडूंचा अनियंत्रित होईल इतका अतिसहभाग निर्माण होऊ नये. खेळाडू लॉटरीतील विषम तत्त्वांचा विचार न करता बक्षिसाच्या रकमेने हुरळून जातात. मानसोपचारतज्ज्ञांनी पुराव्यानिशी असं सिद्ध करून दाखवलंय की खेळाडून आपल्या जिंकण्याच्या शक्यतेबद्दल अवाजवी कल्पना बाळगतात किंवा वैयक्तिक धोक्याकडे काणाडोळा करतात आणि लॉटरीवर प्रचंड पैसा उधळतात. हा प्रकार भारतात सिंगल डिजिट आणि स्क्रॅच तिकिटांच्या लॉटरीच्या बाबतीत बऱ्याचदा होतो. सध्या या दोन्ही प्रकारच्या लॉटरींवर बंदी आहे. याच कारणांसाठी अमेरिकेतही झटपट लॉटरीवर भरमसाठ पैसे लावण्यावर मर्यादा आणल्या गेल्या आहेत. इंग्लंडमध्ये तर कोणत्या लॉटरी खेळाने खेळाडूंना भरमसाठ पैसे लावण्यास उद्द्युक्त केल्यास त्या लॉटरी चालकाचा परवाना रद्द करण्याचा अधिकार सरसंचालकांना बहाल केला आहे. इंग्लंडमध्ये लॉटरी खेळाडूच्या पैसे खर्च करण्याच्या पॅटर्नवर आणि वर्तनावर अभ्यास केला गेला असला तरीही अधिकाधिक पैसे लावून खेळण्याच्या वृत्तीवर अजून संशोधन झालेले नाही.

जॅकपॉटच्या रकमेवरही मर्यादा आणण्याची गरज आहे. इंग्लंडमध्येही असं लक्षात आलंय की जेव्हा जॅकपॉटची रक्कम उत्तरोत्तर वाढत जाते तेव्हा खेळाडूंचा सहभाग ६२ ते ७४ टक्क्यांनी वाढत जातो. शिवाय अभ्यासाअंती असं लक्षात आलंय की जेव्हा जॅकपॉटची रक्कम अधिक असते तेव्हा आपल्या खर्च करण्याच्या क्षमतांच्या बाहेर जाऊन खेळाडू तिकिटावर पैसे उधळतात. मात्र जेव्हा बक्षिसाची रक्कम कमी असते, तेव्हा सरकारला फारच थोडका महसूल उपलब्ध होतो. त्यामुळे बक्षिसाची रक्कम अशी असावी की त्यामुळे सरकारच्या महसुलाला ओहोटी लागणार नाही आणि खेळाडूच्या अतिरिक्त उधळपट्टीलाही पायबंद बसेल.

सर्वच देशांनी बक्षिसाच्या रकमेचा दावा करण्यासाठी मुदत घालून दिलेली आहे. मात्र दिलेल्या मुदतीत दावा करूनही प्रत्यक्षात चालक बक्षिसाची रक्कम देण्यात दिरंगाई करतात. त्यायोगे चालक व्याजाची रक्कम लाटतात आणि विजेत्यांचा एकूणच रसही कमी होतो. जॅकपॉट आणि बंपर बक्षिसांच्या बाबतीत बऱ्याचदा असं घडतं.

लॉटरीचा खेळ हा अल्पवयीन मुलांसाठी असू नये. अनेक देशांनी लॉटरी खेळण्याचं वय मुक्रर केलेलं आहे. महाराष्ट्रात लॉटरी खेळण्याचं किमान वय १८ वर्षे असणं बंधनकारक आहे. जगातल्या अनेक देशात हे वय १८ इतकंच असलं तरीही इग्लंडमध्ये मात्र हे वय १६ इतकं आहे. मलेशियासारख्या देशात मात्र ही वयोमर्यादा २१च्या वर आहे. ब्रिटिश कोलंबिया ऑफ कॅनडा आणि अमेरिकेतल्या नेब्रास्कामध्ये मात्र हे वय १९ इतकं आहे. तरीही काही अल्पवयीन मुलं लॉटरी खेळतात. बऱ्याचदा असं करणाऱ्या मुलांनी ही दीक्षा आपल्या पालकांकडूनच घेतलेली असते. तरीही सिंगापूर पूल्सने खेळाडूंना असा सल्ला दिलाय की पालकांनी लॉटरी खेळण्यासाठी आपल्या मुलांना सोबत आणू नये, त्यांच्या उपस्थितीत तिकिट फाडू नये किंवा मुलांना नंबर निवडायला सांगू नये. तिकिट घेणाऱ्या व्यक्तीच्या वयाबाबत संशय आल्यास विक्रेता ओळखपत्र विचारू शकतो. एखादा विक्रेता अशा अल्पवयीन व्यक्तीस तिकिट विकताना आढळल्यास त्याच्यावर दंडात्मक कारवाई होऊ शकते किंवा त्याचा परवानाही रद्द होऊ शकतो.

इंग्लंडमध्ये व्यापार दर्जा विभागाला विविध उत्पादनांची चाचणी खरेदी करण्याचा अधिकार दिला गेला आहे. हा विभाग १६ वर्षाखालील काही मुलांना लॉटरीच्या चाचणी खरेदीसाठी पाठवते. जर विक्रेता अशा मुलांना तिकिटं विकताना आढळल्यास तो तीन महिन्यांकरता निलंबित होतो. आतापर्यंत याच कारणापायी ११८ टर्मिनल्स काढून टाकण्यात आली आहेत. इंग्लंडच्या लॉटरी चालकांनीही स्वत:चा असा एक टेस्टिंग प्रोग्राम तयार केला आहे. त्याला ऑपरेशन चाइल्ड असेच नाव आहे.

इंग्लंडमध्ये एक गेम डिझाइन प्रोटोकॉलही अंमलात आणला जातो. समाजशास्त्रज्ञ, अभ्यासक आणि मार्केट रिसर्चर्स यांच्या सहयोगाने एक असं परिक्षण परिमाण बनवलंय. त्यायोगे खेळाची व्यक्तीच्या पैसे लावण्याच्या सवयीचा एक आराखडा तयार केला जातो. त्याची उच्च, मध्यम आणि निम्न अशी श्रेणी तयार केली जाते. अल्पवयीन, आर्थिकदृष्ट्या विकल आणि व्यसनी लोकांच्या लॉटरीच्या सवयीच्या अभ्यासातून ही श्रेणी विकसित झाली आहे. व्यक्तीची प्रत्यक्ष इच्छा आणि त्याच्याकडून व्यक्त झालेली कृती यांची सांगड घालून हे परीक्षण त्या व्यक्तीच्या वर्तनाबद्दल भाष्य करतं. या कारणापायीच नवे खेळ हे एकाचवेळी सादर केले जातात. इंग्लंडमध्ये संगणकप्रणालीद्वारे लॉटरी विक्रेत्याचं व्यापारी स्थान, निम्नउत्पन्न गट इत्यादींवर जाहिरातींचे धोरण ठरवले जाते.

अमेरिकेतील लॉटरी चालक जॅकपॉट विजेत्याला आर्थिक आणि कायदेशीर सल्ला देऊ करतात. इंग्लंडमध्ये ज्या विजेत्याला ५० हजार पौंडापेक्षा अधिक रक्कम मिळते त्याला आर्थिक आणि कायदेशीर बाबींवर एक पुस्तिकाही दिली जाते. जर बक्षिसाची रक्कम अडीच लाख पौंडाच्या वर असेल तर कायदेशीर आणि आर्थिक सल्लागाराची

सेवाच ऑफर केली जाते. अशी पावलं उचलल्यामुळे विजेता खेळाडू त्याला मिळालेल्या पैशाने गुदमरून जाण्याऐवजी त्याचा योग्य उपभोग घ्यायला सिद्ध होतो.

आपले खेळाडू एखाद्या लॉटरी स्कॅमच्या कचाट्यात सापडू नयेत म्हणून अनेक लॉटरी चालक जागृती मोहीम राबवत असतात. कोलोरॅडो लॉटरी त्यांच्या ग्राहकांना नेहमी ॲलर्ट करत असते आणि या ॲलर्टचं ॲक्रोनिम पुढीलप्रमाणे असतं.

**आस्क क्वेश्चन**

**लिसन केअरफुली**

**एज्युकेट युवरसेल्फ**

**रिफ्युज टू बी प्रेशर्ड**

**टेल द ऑथॉरिटीज**

## सुरक्षिततेचे उपाय

लॉटरीच्या तिकिटांमध्ये फेरबदल केलेले नाहीत, सोडतीची कार्यवाही योग्य चालली आहे की नाही, तसेच यंत्रं त्रुटिविरहीत आहेती की नाही याची खातरजमा करण्यासाठी प्रत्येक देशाने सुरक्षितेतेचे उपाय योजलेले आहेत.

### मुद्रित तिकिटातील सुरक्षिततेचे उपाय

रिझर्व्ह बँकेने संमत केलेले सिक्युरिटी प्रिंटर्स किंवा भारतीय बँकांच्या संघटनेने आपल्या अखत्यारित छपाई केल्यासच भारतातील लॉटरीची तिकिटं छापली जाऊ शकतात. लॉटरीच्या तिकिटावरील आद्याक्षरांची मालिका छापण्यासाठी सुरक्षित शाई वापरली जाते.

राज्य सरकार लॉटरीवर आपलं बोधचिन्ह तसेच अधिकृत सरकारी अधिकाऱ्याची फॅसिमाइल सही तिकिटावर छापली जाते. काही विशिष्ट सुरक्षा चिन्हंही त्यावर छापली जातात. ती ठराविक आठवड्यांनी बदललीही जातात. त्यामुळे त्यांची नक्कल होण्याचा धोका टळतो. प्रिंटरला तिकिटांचा विमा उतरवावा लागतो. प्रिंटिंग झाल्यानंतर वापरलेल्या प्लेट्स निकालात टाकाव्या लागतात. इतर सुटे भाग, कचरा तसेच दोषपूर्ण तिकिटंही लॉटरी संचालनालयाच्या अधिकाऱ्यांच्या समोर नष्ट करावी लागतात. याशिवाय राज्य सरकार चालकाकडून सुरक्षा ठेव तसेच बँक गॅरंटीही घेऊन ठेवते.

चीनमध्ये बीझेडपी (बीजीन झोन्काय प्रि.कं.लि.) ही संस्था लॉटरी तिकिटांवर दर्जात्मक नियंत्रण ठेवते. यात प्रकाशीय, विद्युत, रासायनिक तसेच यांत्रिक परीक्षणं केली जातात. तिकिटं कारखान्याच्या बाहेर जाण्याआधी दोषपूर्ण तिकिटं शास्त्रीय पद्धतीने विशेष भागात नष्ट केली जातात. इस्त्रायलमध्ये मायफल हपाईस फोर्जरी होऊ नये म्हणून तिकिटं परदेशातच छापून घेते. इंग्लंडमध्ये प्रत्येक स्क्रॅच कार्डला एक वेगळा व्हेरिफिकेशन नंबर आणि बार कोडही असतो. मिसुरीमध्ये स्क्रॅच तिकिटांची ऑर्डर आल्यानंतर प्रिंटर, मिसुरी लॉटरी आणि मिसुरी हायवे पेट्रोल लायब्ररी यांच्या प्रतिनिधींकडून बारकाईने तिकिटं पारखली जातात. तिसऱ्या वेळचं परीक्षण हे वर्षातून एकदाच पण स्वतंत्र ऑडिटरकरवी केलं जातं.

### मार्केटिंग एजंटकडून घेतलेली सुरक्षिततेची खबरदारी

विक्रीसाठी तिकिटं पाठवण्याआधी मार्केटिंग एजंट सर्वात महत्त्वाचं म्हणजे तिकिटांवरील क्रमांक अनुक्रमाने आहे की नाही हे तपासतो. जर तिकिटं परत आली तर ती लॉटरी संचालनालयाकडे बदलीसाठी किंवा नष्ट करण्यासाठी जातात.

## न खपलेली तिकिटं

न खपलेली तिकिटं विक्रीची तारिख उलटल्याबरोबर कोणताही दुरुपयोग केला जाऊ नये म्हणून पंच केली जातात. पंच केलेली ही तिकिटं विजेता क्रमांक घोषित होईपर्यंत कपाटबंद ठेवली जातात.

## बक्षीस विजेते तिकिट

जेव्हा खेळाडू त्याची बक्षीस विजेती तिकिटे सादर करतात तेव्हा ती पंच केली जातात. त्यांचं बारकाईने पुन:पुन्हा परीक्षण केलं जातं. त्याचे क्रमांक, सोडतीची तारीख इत्यादी बाबी अचूकरित्या पडताळून पाहिले जातात. बक्षिसाच्या दाव्यासाठी एखादं बनावट तिकिट सादर केलं जाऊ नये यासाठी ही काळजी घेतली जाते.

## सोडतीच्या काळातली सुरक्षितता

लॉटरीच्या सोडत लॉटरी योजनेच्या संचालकांनी तसेच संचालनालयाने नेमलेल्या परीक्षकांच्या उपस्थितीतच व्हायला पाहिजे असे निर्देश राज्य सरकारांनी दिले आहेत. प्रत्येक सोडतीच्या आधी सोडतीच्या यंत्राचेही परीक्षकांमार्फत बारकाईने परीक्षण केले जाते. अमेरिकेतील ओरेगॉन येथे ओरेगॉन राज्य पोलीस दलाच्या खेळ कार्यवाही विभागातर्फे तसेच बाहेरच्या प्रयोगशाळेतर्फे यंत्राचं परीक्षण केलं जातं. ओरेगॉनमध्ये लॉटरीचं चलनवलन सुरक्षित, स्वच्छ आणि सुयोग्य वातावरणात होतं की नाही याची खातरजमा केली जाते.. राज्य पोलीस दलाच्या खेळ कार्यवाही विभागातर्फे योग्य सुरक्षा व्यवस्था पुरवलेली असते. खेळाच्या सोडतीला हजर राहण्यासाठी सर्व नागरिकांना मुभा असते.

इस्त्रायलसारख्या देशात लॉटरीचे निकाल व्यावसायिक सांख्यिकी लेखापरीक्षकांद्वारे तपासले जातात.

उत्तर अमेरिकेतील राज्यात सर्व लॉटरी प्रक्रिया पारदर्शक असते. लॉटरीचा रेकॉर्ड सर्व नागरिकांना आणि प्रसिद्धी माध्यमांनी तपासण्यासाठी खुला असतो. अनेक राज्यात लॉटरी चालक कंपनीच्या कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या नातेवाईकांना लॉटरी खेळण्यास मज्जाव असतो. एखादा कर्मचारी विजेता ठरल्यास लोकांना लॉटरी प्रक्रियेबाबत शंका वाटू शकते म्हणून ही खबरदारी घ्यावी लागते. मिसौरी लॉटरीची सुरक्षिततेच्या उपायांसाठी स्वत:चा असा सुरक्षा विभागच आहे.

अमेरिकेत मशीनमध्ये वापरले जाणारे चेंडू सीलबंद पेटीत ठेवले जातात. महिन्यातून एकदा प्रत्येक चेंडूचं वजन केलं जातं आणि त्याचं आकारमान मोजलं जातं. चेंडूच्या

वजनात आणि आकारमानात फरक पडलेला नाहीना याची खातरजमा याद्वारे केली जाते. त्याबरोबरच चेंडूची घनता, स्थितीस्थापकत्व, गोलाई या गोष्टींची तपासणीही केली जाते. लॉटरीचा खेळ एकाच दिवशी दुपारी आणि संध्याकाळी असल्यास एकच संच वापरला जात नाही. लोटो किंवा टेक फाइव्हसारख्या खेळात चेंडूंचा संच दर तीन महिन्यांनी बदलला जातो. विन ४ ला दर महिन्याला तर पिक १० या खेळासाठी दर दोन महिन्यांनी चेंडूंचा संच बदलला जातो. सोडत झाल्यानंतर यंत्र एका खोलीत बंद ठेवलं जातं आणि २४ तासासाठी त्यावर लक्ष ठेवलं जातं. त्या खोलीत मूव्हमेण्ट डिटेक्टर अलार्म असतो. खोलीच्या चाव्या दोघांकडे असतात. एक चावी खाजगी प्रतिनिधीकडे असते. खोलीत प्रवेश करण्यासाठी मेटल नंबर्ड सील तोडावं लागतं. भविष्यातील पडताळणीसाठी तो क्रमांक लॉगबुकमध्ये नोंदवावा लागतो. स्वयंचलित ड्रॉ मशीनमध्ये हार्डवेअरलाच नंबर्ड सिक्युरिटी सील असतं. ती कुणी तोडू शकत नाही. यदृच्छ पद्धतीने अनुक्रम काढणाऱ्या सॉफ्टवेअरमध्येही कुणी बदल करू शकत नाही.

इंग्लंडमध्ये विक्रेत्यांच्या दुकानात क्लोज्ड सर्किट टीव्ही बसवलेले असतात. त्याद्वारे कधी कधी गुन्हेगारांना पकडता येतं. ड्रॉ मशीन्स ही ब्रिटिश स्टॅण्डर्डस् इन्स्टिट्यूशनच्या निकषाप्रमाणे तयार केलेली असतात. त्याची वजन-मापं नियमितपणे घेऊन यंत्राची एकसामायिकता जपली जाते. क्लोज्ड सर्किट टीव्हीद्वारे मशीन्सवर सतत लक्ष ठेवलं जातं, जेणेकरून कुणी त्यात फेरबदल करू नयेत.

**कॉम्प्युटर आणि ऑनलाइन लॉटरीतील सुरक्षितता**

कॉम्प्युटर आणि ऑनलाइन लॉटरीच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि संघटनात्मक मुद्दे असा चहूअंगाने विचार करावा लागतो. या यंत्रणेतला ॲक्सेस करण्यासाठी पासवर्ड वापरावा लागतो. काही महत्त्वाच्या अधिकाऱ्यांकडेच हा पासवर्ड असतो. हे सगळं नेटवर्क रिलायन्स, एचसीएल किंवा सत्यमसारख्या सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांकडूनच चालवलं जातं. उच्च दर्जाची सुरक्षितता केवळ अशा कंपन्याच उपलब्ध करू शकतात.

प्रत्येक रिटेल पीओएस टर्मिनल मुख्य सर्व्हरला जोडले जाऊ शकते. मात्र त्यासाठी एजंटचा पासवर्ड लागतो. संपूर्ण नेटवर्क अशा पद्धतीने काम करतं की समजा एखाद्या टर्मिनलमध्ये काही समस्या उद्भवली तर ते टर्मिनल मुख्य सर्व्हरपासून तोडता येते.

**१. तिकिटांची छपाई :**

तिकिट किंवा टर्मिनलमधून मिळणारी अडव्हाइस स्लिप किंवा खरेदीचा कोणताही

पुरावा हा मुख्य सर्व्हरमधून एक विशिष्ट क्रमांक घेऊन येतो. या क्रमांकाद्वारे असं निर्देशित होतं की हे तिकिट मुख्य सर्व्हरने अधिसंमत केलं आहे. त्याशिवाय प्रत्येक तिकिटाला आगळा बार कोड असतोच.

सरकारी निर्देशाप्रमाणे ऑनलाइन लॉटरीची तिकिटं जरी विक्रेत्याच्या दुकानावर टर्मिनलमधून येत असली तरी त्यावर सरकारचं बोधचिन्हं आणि सरकारी अधिसंमतीची फॅसिमाइल सही छापली गेली पाहिजे. तिकिटावर छपाईपूर्व सिरियल क्रमांकही हवेत आणि टर्मिनलवर प्रिंट होतानाची वेळ त्यात नमूद होणं गरजेचं आहे. तिकिटांचा कागद हा वेगळ्या वैशिष्ट्यांसह असावा जेणेकरून त्याची बनावट होऊ शकणार नाही.

**२. बक्षिसाचे वितरण**

बक्षीस देण्याआधी बक्षीस विजेत्या तिकिटाचे बारकाईने परीक्षण केले जाते. तिकिट देताना मुख्य सर्व्हरमध्ये जो डेटा साठवलेला असतो, त्याच्याशी तिकिटाच्या परीक्षणानंतर उपलब्ध झालेला डेटा पडताळून पाहिला जातो. मुदतीची तारीख उलटून गेल्यावर सर्व्हर दावा न केलेल्या बक्षिसांची यादीही तयार करतो. त्यामुळे मग त्या बक्षिसाची रक्कम सरकारजमा होण्याचा मार्ग मोकळा होतो.

# किरकोळ विक्रेत्यांची भूमिका

लॉटरीचं यश हे बहुतेकदा किरकोळ विक्रेत्यांच्या जाळ्यावर अवलंबून असतं. ते लॉटरी चालक आणि लोकांच्या मधला दुवा म्हणून काम करतात. ग्राहकांशी त्यांचा थेट संपर्क असल्यामुळेच लॉटरीचं यश त्यांच्यावर अवलंबून असतं. त्यामुळेच सरकार आणि लॉटरी चालक या विक्रतेत्यांना प्रेरणा देण्यासाठी अनेक पावलं उचलत असतात.

भारतात केरळमध्ये ३५ हजार विक्रेते आहेत, महाराष्ट्रात सुमारे दीड लाख, पंजाबमध्ये ३० हजार, हरियाणात २० हजार तर कर्नाटकात दीड लाख किरकोळ लॉटरी विक्रेते मुक्रर केलेले आहेत.

भारतात कुणीही लॉटरीचा किरकोळ विक्रेता बनू शकतो. त्यासाठी शैक्षणिक पात्रता आवश्यक नसते. फक्त त्याची स्टॉल उभारण्याची आणि तो चालवण्याची क्षमता पाहिजे. अनेक देशांप्रमाणे भारतातही विक्रेत्याने विकलेल्या तिकिटाला जर बक्षीस लागलं तर काही बोनस कमिशन त्या विक्रेत्यालाही मिळतं. उदा. सिक्किमच्या पहिल्या ऑनलाइन लॉटरी जॅकपॉटचं बक्षीस ८.६१ कोटी इतकं होतं. ते जाहीर झाल्यावर त्यावरचे एक टक्के कमिशन अर्थात ८.६१ लाख रुपये विक्रेत्यालाही मिळाले. हे त्यांच्या नियमित कमिशनच्या अतिरिक्त कमिशन गणले जाते. तिकिटाची किंमत साधारणत: ११ रुपये इतकी असते. राज्यांप्रमाणे जरी कमिशनचा दर बदलत गेला तरीही साधारणत: रुपयात २५ पैसे विक्रेत्याला, १५ पैसे स्टॉकिस्ट आणि वितरकाला, २० पैसे उप-वितरकाला तर २५ पैसे राज्य सरकारला मिळतात. उरलेली रक्कम बक्षिसरूपात जाते.

कनेक्टिकटमध्ये मिस्ट्री शॉपर प्रोग्राम नावाचा एक प्रकार आहे. संचालनालयाचे प्रतिनिधी कोणत्याही पूर्वसुचनेशिवाय किरकोळ विक्रेत्याच्या दुकानाला भेट देतात. त्यांच्या अहवालावर मग त्या विक्रेत्याला उत्तम डिस्प्लेसाठी वगैरे पारितोषिक दिले जाते. त्यांच्याकडे प्रिमिअम पॉइण्ट रिवॉर्ड प्रोग्रामही असतो. त्यानुसार विक्रेते काही खेळांची तिकिटं विकताना काही पॉइण्ट्स मिळवतात. हे पॉइण्ट्स त्याला काही उत्पादनं किंवा गिफ्ट सर्टिफिकेटच्या स्वरूपात रुपांतरित करता येतात.

बेल्जिअमच्या नॅशनल लॉटरीचा मार्केटिंग विभाग त्यांच्या वितरक जाळ्याशी अगदी वैयक्तिक संवाद विकसित करण्यावर भर देतो. त्यांचे नवे खेळ आणि खेळाडूंच्या प्रतिसादाचा अभ्यास तर सुरू असतोच शिवाय मार्केटिंग आणि जाहिरात विभाग विक्रेत्यांसाठी काही प्रेरणा शिबीरं आयोजित करतो आणि त्यांच्या विक्रीच्या कार्यक्षमतेसाठी पारितोषिकही देऊ करतो.

केनटुकीच्या विक्री ध्येय साध्यासाठी उत्तेजनार्थ बक्षीसंही दिली जातात.

इस्त्रायलमध्ये सर्वोत्कृष्ट आकर्षक बूथ अशी उत्तेजनार्थ बक्षीस योजना आहेच. शिवाय विक्रेत्यांच्या कार्यशाळा घेऊन त्यांना प्रशिक्षणही देऊ केलं जातं.

मेसॅच्युसेट्स स्टेट लॉटरीमध्ये एक ड्रॉ हा खास एजंट्सचा ड्रॉ असतो. त्यात एजंटची सर्व तिकिटं विकली गेल्यावरच एजंट या सोडतीसाठी पात्र ठरतो. या सोडतीत साधारणत: हजारेक एजंट्सना साधारण ५० ते १०,००० डॉलर्सपर्यंतची बक्षीसं मिळतात. दोन महिन्यांतून एकदा ग्रॅण्ड प्राइज ड्रॉही होतो. त्यात पहिलं बक्षीस अडीच लाख डॉलर्सचं तर ५० हजार डॉलर्सची चार बक्षीसं असतात.

न्यू मेक्सिकोमध्ये लॉटरी संचालनालय उत्तेजनासाठी उत्तम पीओएस, उत्तम डिस्प्लेनुसार सुवर्ण किंवा रजत दर्जा बहाल करतं. सुवर्ण दर्जाला अधिक ०.५ टक्क्यांचे कमिशन मिळते तर रजत दर्जाला ०.२५ टक्क्यांचे अधिक कमिशन मिळते.

न्यू मेक्सिको लॉटरी ऑथॉरिटी त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी एक अभिनव योजना राबवते. प्रतिनिधी मंडळाने एखाद्या दुकानाला भेट दिल्यास नव्या खेळांविषयी आणि नव्या योजनांविषयी अचूक, आणि योग्य माहिती सांगणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही काही पारितोषिकं दिली जातात.

त्रिनिदाद अ‍ॅण्ड टोबॅगोमध्ये एजंटला सुरुवातीला तिकिटाच्या दर्शनी किमतीच्या तिप्पट डिपॉझिट भरावं लागतं. यथावकाश ते तिकिटाच्या दर्शनी किमतीइतकं होतं. एजंटला १५ टक्के कमिशन मिळत असतं. यशस्वीरित्या लॉटरी चालवल्यास ते १७ टक्के केलं जातं. त्यामुळे त्यांना त्यांच्या कामात उत्तेजन मिळतं.

# पूरक उद्योग

लॉटरी उद्योगामुळे अनेक छोट्यामोठ्याउद्योग धंद्यांना पाठबळ मिळतं. पैकी जाहिरात, छपाई, लॉजिस्टिक्स, गेमिंग सेवा पुरवठादार, टेलिकॉम सेक्टर तसेच मुद्रण आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया यांनाही या लॉटरी व्यवसायाचा लक्षणीय फायदा होतो.

## जाहिरात उद्योग

जाहिरात उद्योग हा एखादं उत्पादन समर्थनीय जाहिरातीद्वारे लोकप्रिय करण्यासाठी उपयुक्त उद्योग आहे. फलक, पोस्टर्स, डॅन्गलर्स आणि प्रसिद्धीमाध्यमांचा उपयोग करून जाहिराती केल्या जातात.

इंग्लंडमध्ये लॉटरी चालक दरवर्षी साधारणत: एक दशलक्ष स्टर्लिंग पौंड इतकी रक्कम त्याच्या चार लोकप्रिय झटपट लॉटरीच्या प्रसारासाठी खर्च करतात. उत्तर अमेरिकेत जाहिरातीचा खर्च हा लॉटरी महसुलाच्या १.१७ टक्के इतका असतो. अर्थात मद्यउत्पादक आणि सौंदर्य प्रसाधनांच्या उत्पादनांच्या ७.५ आणि ८.८ टक्के इतक्या आकडेवारींच्या जाहिरातीच्या तुलनेत लॉटरीवरच्या जाहिरातींचे बजेट अगदीच तुटपुंजे आहे. १९९६ साली अमेरिके ४०० दशलक्ष डॉलर्स जाहिरातींवर खर्च झाले आणि त्यामुळे त्यांच्या विक्री ३४ अब्ज डॉलर्सची घसघशीत वाढ झाली.

भारतात जेव्हा ऑनलाइन लॉटरी सुरू झाली तेव्हा सर्व मुख्य शहरांमध्ये प्रचंड मोठी पोस्टर्स झळकली होती. नव्याने सादर होत असल्याने चालकांनी वर्तमानपत्रांमधून मोफत कूपनही वाटली. ज्या राज्यांमधून लॉटरी सुरू होती त्या राज्यातील १० भाषांमधील ६८ प्रकाशनांकरवी जाहिराती सुरू होत्या. सुरुवातीला या नव्या लॉटरी पद्धतीचा लोकांना परिचय व्हावा हा उद्देश होता. आता मात्र जाहिरातींचे टोक आता वैयक्तिक खेळांवर केंद्रीत झाले आहे. एक ऑनलाइन चालक तर नव्याने सादर होणाऱ्या जाहिरात मोहिमेवर सुमारे अडीच कोटी खर्च करतो. त्यांचं जाहिरातींचं वार्षिक बजेट तर ६५ कोटी इतकं असून साप्ताहिक आणि रोजच्या खेळांच्या जाहिराती दोन वेगवेगळ्या जाहिरात संस्था हाताळतात.

आणखी एका चालकाने त्यांचा नवा लॉटरी ब्रॅण्ड सादर केला तेव्हा सुरुवातीलाच ८५ कोटी रुपयांच्या जाहिरातींचा मारा केला होता. अर्थात या बजेटचा वाटा कोणत्या जाहिरातींसाठी जातो हे लॉटरीच्या योजनेप्रमाणे ठरत जातं. काही खेळांच्या ९९ टक्के प्रिंट जाहिराती भाषिक वर्तमानपत्रांना जातात. साधारणत: या जाहिरातींचं वार्षिक अंदाजपत्रक २५ कोटींचं आहे. आणखी एका चालकाने प्राथमिक जाहिरातींवर १५० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक आखले होते.

टीएएम ॲडेक्स या माध्यम संशोधन संस्थेच्या विश्लेषणाप्रमाणे २००२ साली भारतातील एकूण जाहिरातींच्या ७० टक्के इतक्या जाहिराती या लॉटरींच्या होत्या. २००३ साली हा आकडा ८० टक्क्यांवर गेला. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल आणि केरळ इथे लॉटरीची बाजारपेठ व्यापक असल्याने इथे लॉटरींच्या जाहिरातीही मोठ्या प्रमाणावर होतात. लॉटरी उद्योगाचा जाहिरातींवरचा एकूण खर्च २००२ साली१.०७ टक्के होता, २००३ साली तो १.३४ टक्के झाला.

**छपाई**

लॉटरी तिकिटांची छपाई ही सिक्युरिटी प्रेसमध्येच होते. ऑनलाइन तिकिटं पीओएस टर्मिनलवर उपलब्ध होतात. ब्रिटनची नॅशनल लॉटरी आठवड्याला २५ दशलक्ष तिकिटं छापते. महाराष्ट्रात आठवड्याला दोन आकडी लॉटरींची १ कोटी ६८ लाख तिकिटं छापली जातात. सोडतींच्या आवर्तनांवर तिकिटांच्या संख्येचा आवका अवलंबून असतो. दर आठवड्याला भारतीय ऑनलाइन चालक १ कोटी ७० लाख तिकिटं विकतात. ब्रिटिश कोलंबिया लॉटरी कॉर्पोरेशन सहा लाख ६० हजार तिकिटं छापतं. सिंगापूर स्वीम या लॉटरीत २.७ दशलक्ष तिकिटं छापली जातात. या आकडेवारीमुळे एकूणच लॉटरीची व्याप्ती लक्षात येते. तिकिटांशिवाय जाहिराती, पत्रकं आणि पोस्टर्सच्या छपाईची मोठीच उलाढाल होत असते.

**कागद उद्योग**

कागद उद्योग हा लॉटरी उद्योगाचा अप्रत्यक्ष लाभार्थी आहे. तिकिट छपाईचा जो प्रचंड आवाका आहे त्यासाठी टनावारी कागदाची आवश्यकता असते.

**लॉजिस्टिक्स :**

वाहतूक व्यवसायालाही लॉटरी उद्योगाचा फायदा होतो. कारण एका ठिकाणाहून अनेक ठिकाणी लॉटरीची तिकिटं वाहून न्यावी लागतात.

**गेमिंग सर्व्हिस प्रोव्हायडर**

पेपर लॉटरी या केवळ ड्रॉ मशीन्सच्या मागणीपुरत्या मर्यादित असतात. ऑनलाइन लॉटरी दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत. त्यामुळे गेमिंग मशीन्सना खूपच मागणी आली आहे. यात मानवचलित कार्य खूपच मर्यादित असतं.

गेमिंग सर्व्हिस प्रोव्हायडर्समध्ये झटपट स्क्रॅच तिकिटांचे उत्पादक, नव्या क्लृप्त्या तयार करणारे, पेपर तसेच ऑनलाइन खेळांच्या नव्या रचना तयार करणारे, लॉटरी किओस्कच्या नवे आराखडे तयार करणारे, नेटवर्किंगच्या कल्पना राबवणारे, मशीनचे

उत्पादन करणारे असे सारेच येतात. सायंटिफिक गेम्स कॉर्पोरेशन, ओबेर्थर गेमिंग टेक्नॉलॉजीज, आणि जीटीईसीएच गेमिंग सोल्यूशन्स या काही आंतरराष्ट्रीय स्तरावर असणाऱ्या गेमिंग सर्व्हिस प्रोव्हायडर कंपन्या आहेत. सायंटिफिक गेम्स ही कंपनी अमेरिकेतल्या १६ राज्यांसाठी गेम्स तयार करून देते. कोरिया, नॉर्वे, स्वित्झर्लंड आणि शांघाय या ठिकाणीही या कंपनीची व्याप्ती आहे. जीटीईसीएच या कंपनीने आतापर्यंत ४ लाख पीओएस टर्मिनस स्थापन केली आहेत. ओबेर्थर गेमिंग टेक्नॉलॉजीजचे ५० देशांमध्ये १००हून अधिक ग्राहक आहेत.

चेन्नईतील ऑटोमेशन कंपनीतील डिझाइन विंग लॉटरी टर्मिनल्सच्या रचनेवर काम करते. या रचनेत ३६० अंशात फिरणारा डिजिटल डिस्प्ले, मोठा प्रिंट रोल ठेवण्याची जागा, सुटी तिकिटं ठेवण्याची सोय तसेच जॅम झाल्यास पेपर काढून टाकण्यासाठी उघडता येण्याजोगं झाकण या गोष्टी भारतीय वातावरणाचा अंदाज घेऊन तयार केल्या गेल्या आहेत. ऑनलाइन खेळात खूपच कमी वेळ लागत असल्याने मशीन्स हायस्पीडवर ऑपरेट होणं गरजेचं असतं. ही मशीन्स तासाला ९०० तिकिट तयार करण्याच्या क्षमतेची असतात. देशात ऑनलाइन लॉटरीची आतापर्यंत १० हजारांहून अधिक पीओएस टर्मिनल स्थापन केली गेली आहेत. एचसीएल ही कंपनी मोठ्या प्रमाणावर भारतात ऑनलाइन टर्मिनलचा पुरवठा करते.

भारतात लॉटरी चालकांसाठी हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर हे आंतरराष्ट्रीय लॉटरी आणि टोटलायझेटर सिस्टिम्सकडून पुरवली जातात. ड्रॉ मशीन्स अमेरिकेतल्या स्मार्टप्ले इंटरनॅशनल इनकॉर्पोरेशन पुरवली जातात. मात्र सुगल ॲण्ड दमानी यांनी स्वत:च आपल्या सिस्टिम्स विकसित करून स्थानिक कंपन्यांकडून सॉफ्टवेअर तयार करून घेतलं आहे.

साऊथ कॅरोलिनामध्ये टू बिटल क्रायटेरियन मशीन सोडतीसाठी वापरले जाते. या मशीनद्वारे एक सफेद चेंडू आणि एक लाल चेंडू निवडला जातो.

**सॉफ्टवेअर उद्योग**

जरी टोटलायझेटर या कंपनीकडून ऑनलाइन खेळाचं सॉफ्टवेअर पुरवलं जात असलं तरीही चालकांना इतर आणखी काही सॉफ्टवेअर व्यवसाय चालवण्यासाठी लागतात. आर्थिक आवक-जावक, निकालांचं नियमित अपडेट आणि स्वयंचलित पद्धतीने निकालांचं विश्लेषण, वितरक, एजंट, विक्रेते यांचं नियोजन करण्यासाठी सॉफ्टवेअरची गरज लागते. याशिवाय प्रत्येक गेमिंग सोल्यूशन प्रोव्हायडर, लॉटरी चालक आणि लॉटरी संघटना यांची स्वत:ची वेबसाइट असते. त्या वेबसाइटचं होस्टिंग, अपग्रेडिंग यासाठी

विविध सॉफ्टवेअरची गरज भासत असते.

## टेलिकॉम सेक्टर

ई-मेल, फोन आणि एसएमएसद्वारे खेळात सहभागी होण्याचे पर्याय जसे विकसित झाले तसं टेलिकॉम सेक्टरलाही लॉटरी उद्योगाचा प्रचंड लाभ होऊ लागला. व्हीसॅट, सीडीएमए आणि जीपीआरएस या तंत्रज्ञानाच्या वापरातून टेलिकॉम कंपन्यांचा व्यवसाय फुलू लागला. रिलायन्स, एअरटेल या डेटा सर्व्हिस पुरवणाऱ्या कंपन्यांचा मोठा ग्राहक म्हणून लॉटरी उद्योग पुढे येत आहे.

## वर्तमानपत्र

वर्तमानपत्रांना लॉटरी उद्योगातून जाहिराती मिळतात तसेच सोडतीच्या दिवशी वर्तमानपत्रांचे वितरण वाढते. युगलक्ष्मी, अथिरष्टम तसेच धनवर्षा ही ही काही नियतकालिकं पूर्णत: लॉटरी व्यवसायाला वाहून घेतलेली आहेत. त्यांच्या मजकुराचा ९५ टक्के भाग हा लॉटरीविषयक बातम्या आणि निकालांनी भरलेला असतो.

## संशोधन आणि विकास

लॉटरी योजना आणि खेळ हे सतत कात टाकत असतात. नवनवीन कल्पना हे लॉटरी खेळांच्या यशाचं गमक आहे. त्यानुरूप अत्यंत वेगवान मशीन्स तयार करण्यासाठी संशोधन आणि विकासाची मोठीच आवश्यकता असते. गेमिंग प्रोव्हायडर्स आणि सॉफ्टवेअर इंडस्ट्री त्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत असते.

# लॉटरीचे नियम

## लॉटरी चालक

लॉटरी चालकांसाठी असलेले नियम हे देशभर साधारण सारखेच आहेत. लॉटरी ही सरकारतर्फे चालवली जाते की खाजगी चालकातर्फे यावरच या नियमांमध्ये फरक दिसून येतो. भारताप्रमाणेच युरोप आणि अमेरिकेतही लॉटरी स्थानिक सरकारांकडून चालवली जाते. थायलंड आणि स्पेन या देशांमध्ये केंद्र पातळीवर लॉटरी चालवली जाते. डेन्मार्क, नेदरलॅण्ड, जर्मनी, इटाली आणि पोर्तुगाल इथे लॉटरी स्थानिक स्वराज्य संस्था चालवतात. साधारणत: लॉटरींचं नियंत्रण हे अर्थ किंवा महसूल खात्याकडे असतं.

अझरबैजनमध्ये अझरलॉटरेया या संस्थेला नवी लॉटरी योजना जाहीर करताना आधी राज्य सरकारच्या सुरक्षा समितीला तपशील कळवावा लागतो. या तपशीलात लॉटरी योजनेचा प्रकार, नाव, काळ, वर्णन, सोडतीची तारीख, बक्षीस रचना, वितरणाचे नियम आणि कोणकोणत्या प्रदेशात ही लॉटरी विकली जाणार आहे हे सगळं कळवणं गरजेचं असतं.

युनायटेड किंगडमची नॅशनल लॉटरी ही नॅशनल लॉटरी कमिशनद्वारे चालवली जाते. जपानी कायद्यांप्रमाणे लॉटरी बँकांद्वारे चालवल्या जातात.

## तिकिटं :

जगातील सर्व देशांमध्ये लॉटरीच्या तिकिटावर छापल्या जाणाऱ्या माहिती संदर्भात एकसामायिक निर्णय घेतात. तिकिटावर संचालक कंपनीचे नाव, लॉटरीचं नाव आणि प्रकार, तिकिटाचा नंबर, तिकिटाची किंमत, मालिका क्रमांक, बक्षीसाची रक्कम, सोडतीचा दिनांक या गोष्टी नमूद करणं आवश्यक असतं. अझरबैजनमध्ये लॉटरी तिकिटाचा प्रिंटर, प्रिंटरचा रजिस्ट्रेशन नंबर आणि लॉटरीचा परवाना देणाऱ्या संस्थेचं नावही नमूद करावं लागतं.

अमेरिकेच्या अनेक राज्यांमध्ये ऑनलाइन तिकिटं विकत घेता येत नाही किंवा पत्राद्वारे तिकिट पाठवता येत नाही. जरी अनिवासी लोकांना लॉटरी खेळण्याची परवानगी असली तरीही तिकिट विक्रेत्याकडूनच घेणं बंधनकारक आहे. तिकिट केवळ रोख पैसे देऊनच घेता येतं. क्रेडिट कार्ड वापरून तिकिट खरेदी करता येत नाही. बक्षीस विजेता ठरल्यास निवासी व्यक्तीला केवळ विक्री कर भरावा लागतो तर अनिवासी व्यक्तीला त्या व्यतिरिक्त २८ टक्क्यांचा फेडरल टॅक्सही भरावा लागतो. भारतात केवळ भारतीय रहिवाशालाच लॉटरीत सहभाग घेता येतो. मात्र स्पेनसारख्या देशात इंटरनेटवरूनही लॉटरीत सहभाग घेता येतो. त्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यातून इथली लॉटरी खेळता येते. काही देशांमधल्या

लॉटरीचं वर्गणीदार होता येतं आणि संभाव्य लॉटरीसाठीही खेळता येतं.

काही देशांमध्ये केवळ विकल्या गेलेल्या तिकिटांच्या नंबरातूनच सोडतीचा निकाल काढला जातो. अझरबैजान त्यापैकीच एक आहे. भारतीय राज्यांमध्येही हेच तत्व राबवले जाते. महाराष्ट्रात बम्पर ड्रॉमध्ये खात्रीची किंवा बिनखात्रीची बक्षिसं असतात. बिनखात्रीच्या सोडतीत सर्व छापलेल्या तिकिटांवर निकाल जाहीर होतो तर खात्रीच्या सोडतीत फक्त विकल्या गेलेल्या तिकिटांवर निकाल जाहीर होतो.

### सोडत

सर्व देशांमध्ये सोडती या सार्वजनिक असतात व टीव्हीवरही त्यांचे प्रक्षेपण केले जाते. लॉटरी संचालनालयाचा प्रतिनिधी त्यावेळी उपस्थित असणं आवश्यक असतं. ओरेगॉनमध्ये स्टेट गेमिंग एन्फोर्समेण्टचा अधिकारी सोडतीच्या वेळी उपस्थित असणं अनिवार्य असतं. भारतातल्या काही राज्यांमध्ये पाचसदस्यीय समिती आणि अध्यक्षांसह उपस्थित असणं आवश्यक असतं. महाराष्ट्रात लॉटरी संचालनालयाच्या उपसंचालक पदावरच्या व्यक्तीने मासिक लॉटरी सोडती तसेच बम्पर ड्रॉवर पर्यवेक्षणाचं काम करावं लागतं. सोडतीत निकाली काढलेले क्रमांक तपासून, नोंदवून समितीने त्यावर सही करावी लागते. उत्तर अमेरिकेत काही लॉटरींच्या सोडतीत स्वतंत्र खाजगी लेखा परीक्षकाच्या प्रमाणपत्राने लॉटरी व्यवस्थापन समितीला सोडतीचे आयोजन करावे लागते. सोडतीची प्रक्रिया लेखी स्वरूपात नोंदवून लॉटरी संचालकांकडून संमत करून घ्यावी लागते. स्वतंत्र प्रतिनिधी या प्रक्रियेची खातरजमा करून घेतो. प्रक्रियेत काही संशयास्पद आढळल्यास तो ही प्रक्रिया थांबवण्याचा आदेश देऊ शकतो. अशा प्रसंगी त्याने विस्तृत लखी अहवाल लॉटरी संचालकांना देणं बंधनकारक आहे. सोडतीच्या पद्धतीबद्दल पुस्तकात इतर प्रकरणात विस्तृत माहिती आलेली आहे.

पेनसिल्व्हेनिया राज्यात विक्रेत्यांनाही लॉटरीत सहभाग घेता येतो. अझरबैजन, फ्लोरिडा इथल्या लॉटरी कंपनीच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या नातेवाईकांना, चालकांना आणि पुरवठादारांनाही लॉटरीत सहभागी होता येत नाही.

### बक्षिसांसाठीचा दावा

बक्षिसांसाठीच्या दाव्यासाठी कालमुदत वेगवेगळ्या देशात वेगवेगळी आहे. भारतात ही मुदत ९० दिवसांची आहे. जॉर्जियामध्ये झटपट खेळासाठी ही मुदत ९० दिवसांची तर इतर खेळांसाठी ती १८० दिवसांची आहे. त्रिनिदाद आणि टोबागोमध्ये सहा महिन्यात दावा करू शकतो तर स्क्रॅच गेम्ससाठी एक वर्षांचा अवधी मिळतो. सर्वच देशांमध्ये एका मर्यादेपर्यंतचे बक्षीस विक्रेत्याकडे मिळू शकते. मोठी रक्कम ताब्यात घेण्यासाठी

मात्र दावा करून लॉटरी संचालनालयाकडे अर्ज करावा लागतो. अझरबैजनमध्ये बक्षिसांचे वितरण सोडतीच्या निकालापासून सात दिवसात सुरू होते.

अमेरिकेसारख्या बहुराज्यीय देशात ज्या राज्याची लॉटरी लागली आहे, त्याच राज्यात जाऊन बक्षिसाचा दावा करावा लागतो.

**वितरणाची प्रक्रिया**

अनेक देशांतील नियमांनुसार लॉटरी उत्पन्नातील ५० टक्के रक्कम बक्षीस म्हणून दिली जाते. रशियन फेडरेशनच्या कायद्याप्रमाणे कमीत कमी ५० टक्के आणि जास्तीत जास्त ८० टक्के इतकी रक्कम बक्षीस म्हणून वितरित केली जाणं गरजेचं आहे. लॉटरी उत्पन्नाच्या विनिमयाचा विचार करून त्याप्रमाणे बक्षिसांच्या वितरणाची टक्केवारी ठरवली जाते. ओरेगॉनमध्ये १६ टक्के इतकी रक्कम प्रशासकीय कामासाठी खर्च करण्याचे ठरवले गेले आहे. दक्षिण कॅरोलिनामध्ये लॉटरी व्यवस्थापनाचा खर्च आणि विक्रेत्याचे कमिशन हे एकत्रितरित्या १५ टक्क्यांपेक्षा अधिक जाता कामा नये. सर्व लॉटरी आयोजक देशांमध्ये दावा न केलेली रक्कम भावी बक्षिसांच्या निधीत जमा होते. अपवादात्मक ठिकाणी ही रक्कम सामाजिक उपक्रमासाठी वापरली जाते. अमेरिकेतील मोन्ताना येथे दावा न केलेली संपूर्ण रक्कम सार्वजनिक निधीत जमा होते. भारतात दावा न केली गेलेली रक्कम सरकारी तिजोरीत जमा होते.

युकेमध्ये जॅकपॉट न लागल्यास तीन वेळा पुढच्या जॅकपॉटमध्ये सामावला जाऊ शकतो. त्यानंतरही कुणीच विजेता झाला नाही तर तो जॅकपॉट बोनसबॉल प्राइझ फंडात जमा होतो.

**विक्रेता / एजंट**

विक्रेत्याचा परवाना हा त्याच्या स्थानावर तसेच त्याच्या क्षमतेवर ठरत असतो. अमेरिकेतील दिलावर लॉटरीच्या एजंटला आपला परवाना दुकानात लावावा लागतो आणि त्याच्या स्थानाशिवाय इतरत्र तो लॉटरीची तिकिटं विकू शकत नाही.

केरळसारख्या राज्यात एजंटचं वय २१ वर्षे असणं गरजेचं असतं आणि त्याला राज्यातील एकाच विभागासाठी परवाना मिळू शकतो. तो केरळचा रहिवासी असणं गरजेचं असतं आणि त्याने विसिष्ट संख्येची तिकिटं विकण्याची क्षमता दाखवली पाहिजे.

भारतात एजंटची निवड करतानाच त्याच्याकडून परवाना शुल्क घेतलं जातं. पेनसिल्व्हेनियात परवानाशुल्क १५ डॉलर्स इतकं असून तिकिटविक्रीसाठी ते घेतलं जातं. मिसौरीमध्ये ५० डॉलर्सच्या बॉण्ड फीनंतर परवाना वितरित केला जातो.

मिसौरी लॉटरी कायद्याप्रमाणे लॉटरी व्यावसायिकांच्या उप-कंत्राटदारांपैकी १० टक्के व्यक्ती या अल्पसंख्याक असणं गरजेचं आहे तर ५ टक्के कंपन्यांच्या मालक महिला असणं गरजेचं आहे.

## इतर राज्यांच्या लॉटरी

भारतात राज्याची स्वत:ची लॉटरी अस्तित्त्वात असली तरी ते राज्य इतर राज्यांच्या लॉटरींवर बंदी आणू शकत नाही. खेळाडू कोणत्याही राज्याच्या लॉटरीचं तिकिट घेऊ शकतो आणि बक्षिसविजेताही ठरू शकतो. अमेरिकेत मात्र राज्य आपल्याच प्रदेशात लॉटरीचे तिकिट विकू शकतात. शेजारच्या राज्यातील खेळाडू प्रवासात तिकिट घेऊ शकतो. बक्षीसविजेता ठरल्यास त्याला त्या राज्यात येऊनच त्या बक्षिसाचा दावा करावा लागतो. भारतात लॉटरी आयोजन नसलेल्या राज्यातील खेळाडू प्रवासात इतर राज्यातील लॉटरी खेळू शकतो. तो जिंकल्यास त्याला आपल्या राज्यात राहूनही त्या बक्षिसासाठी दावा करता येतो. कारण राज्यात लॉटरी विक्रीवर बंदी असली तरी लॉटरी खरेदीवर बंदी घालता येत नाही.

## इतर कायदे

साऊथ डॅकोटातील लॉटरी कायद्यानुसार जे कंत्राटदार लॉटरीसाठी आवश्यक कच्चा माल पुरवतात ते लॉटरी कंपनीच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला कुठल्याही प्रकारे भेटवस्तू वा इतर आर्थिक स्वरूपात फेवर करू शकत नाही.

अझरबैझनमध्ये लॉटरी चालकाने न विकलेल्या तिकिटांचा तपशील आणि त्यांची विल्हेवाट लावल्याचे पुरावे सोडतीच्या एक तास आधी समितीला दाखल करावे लागतात. सोडतीनंतर तीन दिवसांच्या आत निकालाची तपशीलवार माहिती समितीला सादर करावी लागते. निकाल तीन दिवसांच्या आत स्थानिक प्रसिद्धीमाध्यमात जाहीर करावा लागतो.

नियमांचं पालन न केल्यास एजंटचा परवाना रद्द करण्याची तरतूद सर्वच देशांच्या कायद्यांमध्ये आहे. या नियमभंगांमध्ये अल्पवयीन व्यक्तीस तिकिट देणे, तिकिटाच्या नंबरात बनावटपणे फेरबदल करणे, बक्षिसाची रक्कम योग्य मुदतीत न देणे हे मुद्दे येतात. इंग्लंडमध्ये २७ विक्रेत्यांचा परवाना पहिल्याच वर्षी नियमभंग दाखवून रद्द केला गेला होता. त्रिनिदाद आणि टोबागोमध्ये एजंटचा परवाना दोन महिन्यांच्या नोटिशीद्वारे रद्द करता येतो.

भारतात अस्तित्त्वात असलेल्या धोरणांप्रमाणे लॉटरी व्यवसाय, जुगार आणि बेटिंग हे परदेशी गुंतवणुकीसाठी पात्र नाहीत. एफडीआय, एफआयआय पोर्टफोलियो इन्व्हेस्टमेण्ट, एनआरआय/ ओसीबी पोर्टफोलियो इन्व्हेस्टमेण्ट यांद्वारे लॉटरीत पैसे गुंतवता येणार नाहीत. फॉरेन् व्हेन्चर कॅपिटल गुंतवणूकदारांनाही लॉटरीत पैसे घालता येत नाही.

लॉटरीचे आयोजन करणाऱ्या १२० देशांमध्ये फक्त चीन हाच एकमेव देश आहे ज्याने लॉटरीचे आयोजन करण्यासाठी कायदेशीर नियमन केलेले नाही. भारतात खालील राज्यांनी लॉटरी रेग्युलेशन ॲक्ट, १९९८ अंतर्गत काही नियमावली केलेली आहे.

अनुक्रमांक राज्य कायदा / नियमाचे नाव

१ केरळ

दी केरळ स्टेट लॉटरीज ॲण्ड ऑनलाइन लॉटरीज (रेग्युलेशन) रूल्स, २००३

२. कर्नाटक

अ) दी कर्नाटक टॅक्स ऑन लॉटरीज ऑर्डिनन्स, २००३

ब) कर्नाटक कॉम्प्युटराइज्ड नेटवर्क लॉटरी रुल्स, २००१

क) कर्नाटक स्टेट लॉटरी रुल्स, १९९८

३. पंजाब

१. पंजाब स्टेट लॉटरी रुल्स, १९९८ सुधारित १९९९.

२. पंजाब स्टेट लॉटरी (पहिली सुधारणा) रुल्स, २००१

४. जम्मू ॲण्ड काश्मीर

जम्मू ॲण्ड काश्मीर लॉटरी रुल्स, २००४

५. राजस्थान

राजस्थान स्टेट कॉम्प्युटराइज्ड नेटवर्क लॉटरी रुल्स २००३

६. हरयाना

हरयाना स्टेट ऑनलाइन लॉटरी (रेग्युलेशन) रुल्स, २००२.

७. मिझोराम

मिझोराम स्टेट लॉटरी रुल्स २००

८. महाराष्ट

अ)महाराष्ट्र स्टेट ऑनलाइन लॉटरी (रेग्युलेशन रुल्स, २००१.

ब) महाराष्ट्र स्टेट (मेन) लॉटरी रुल्स.

९. तामिळनाडू

अ) तामिळनाडू स्टेट ऑनलाइन लॉटरी (रेग्युलेशन) रुल्स, २००२

ब) तामिळनाडू स्टेट लॉटरीज (रेग्युलेशन) रुल्स, २००२

१०. मेघालय

मेघालय स्टेट लॉटरी रुल्स, २००२

११. हिमाचल

हिमाचल प्रदेश स्टेट लॉटरी रुल्स, १९९९

१२. अरुणाचल प्रदेश

अरुणाचल प्रदेश स्टेट लॉटरी रुल्स, २००१

# लॉटरी घोटाळे

## कॉम्प्युटर हॅकिंग

मॉस्कोमधील एका गावातील लोक सातत्याने बक्षीस विजेते होत होते. तिकिटं बनावट होण्याचा धोकाच नव्हता कारण एकूण ३० सुरक्षा कमानीतून ती तपासली जात होती. नंतर लक्षात आलं की या गावातील दोन तरुणांनी कंपनीच्या कार्यालयातील कॉम्प्युटर हॅक केले होते.

## टेलिफोन लॉटरीची भामटेगिरी

२००२ साली इंग्लंडमधील अनेक लोकांच्या घरात फोन कॉल्स गेले की ते कॅनडाच्या नॅशनल लॉटरीत मोफत सहभाग घेऊ शकतात आणि त्यानंतर लोकांना बक्षीस लागल्याचेही फोन गेले. मात्र त्यावेळी बक्षिसाची रक्कम घेण्यासाठी प्रथम प्रोसेसिंग फी भरावी लागेल असं सांगायला कॉलर्सनी सुरुवात केली. अर्थात विजेत्याला आपल्या बक्षिसाच्या दाव्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज नसते हे लोकांनी ओळखायला हवं.

## बेकायदेशीर स्थलांतरित विजेते

अशाच प्रकारे विजेत्या तिकिटाच्या घोटाळ्यात २००२ साली कोलोरॅडोतील वरिष्ठ नागरिकांना लक्ष्य केलं गेलं. या भामट्यांची एक गँगच होती. मग स्पॅनिशमध्ये बोलत हे भामटे सांगत की तुम्हाला तिकिट लागलंय पण तुम्ही बेकायदेशीर नागरिक असल्याने तुम्हाला त्यावर दावा करता येणार नाही. गँगमधला दुसरा माणूस रस्त्यातून सहज जात असल्याचा बहाणा करत त्या वरिष्ठ नागरिकाजवळ येऊन ते तिकीट खरेच असल्याची खात्री पटवून जायचा. मग हा भामटा त्यांच्याकडचे पैसे प्रोसेसिंग फी घेऊन पसार व्हायचा आणि बनावट तिकिट त्या वृद्धाकडे राहायचं.

मात्र अधिकाऱ्यांनी नंतर या प्रकरणी आवर्जून सांगितलं की एखादा स्थलांतरित त्याच्याकडे नागरिकत्वाचे दस्तावेज नसतानाही जॅकपॉटच्या रकमेवर हक्क सांगू शकतो.

## पैशाच्या मोबदल्यात तिकिटांची अदलाबदल

भारतात बनावट विजेत्या तिकिटांच्या बदल्यात पैसे घेतले गेल्याच्या काही घटना आहेत. बक्षिसाची रक्कम यायला वेळ लागतो, मला पैशाची तातडीने गरज आहे, तर हे तिकिट तुम्ही ठेवा आणि मला बक्षिसापेक्षा कमी पैसे द्या असं सांगून तिकिट एक्स्चेंज करणारे भामटेही आहेत.

## विजेत्या क्रमांकाचा अंदाज

आपल्याकडे विजेता क्रमांक ओळखण्याची क्षमता असल्याचं सांगून लुबाडणारे अनेक भामटे असतात. काहीजणांनी तर विजेत्या क्रमांकावर गुंतवणूक करणाऱ्या कंपन्या वगैरे काढल्या आहेत.

**आंतरराष्ट्रीय लॉटरी**

काही ग्राहकांना ई–मेल अथवा फोन कॉलद्वारे जॅकपॉट लागल्याची माहिती दिली जाते. विजेत्याने काही कर किंवा ॲडमिनिस्ट्रेशन फी भरून ही रक्कम ताब्यात घ्यायची असते. या पैशातून कराची वजावट का होत नाही याचा कुणी विचारच करत नाही. भामटे सांगताना सांगतात की लॉटरी चालकाला पूर्णच रक्कम तुम्हाला द्यायची आहे. या लॉटरी चालकांचा पत्ता अर्थातच खोटा असतो. या कंपनीच्या नावाचं मूळ लॉटरी चालक कंपनीशी साधर्म्य असलं तरी सगळा फसवेगिरीचाच मामला असतो. सायबर क्राइम पोलिसांनी अशा ५०० हून अधिक कंपन्यांची यादी केली असून त्यात युके ओव्हसीज लोटो लि., रायल स्पॅनिश स्वीपस्टेक इण्टरनॅशनल आणि लोटो नेट इंटरनॅशनल या कंपन्याही आहेत.

**हरवलेला पैसा परत देण्याची बोली**

लॉटरी खेळाडू आता हुशार झालेत त्यांना फसवणुकीची माहिती असते हे गृहित धरून काही भामट्यांनी त्यांना पुन्हा फसवल्याची उदाहरणंही आहेत. एकदा मामा बनलेल्या लोकांची माहिती काढून तुमचा हरवलेला पैसा आम्ही परत मिळवून देऊ असं सांगणारे महाभागही भेटतात. अर्थातच असा पैसा मिळवून द्यायची फी ते घेतात.

**बँक अकाऊंट नंबर**

काही भामटे लागलेलं बक्षीस थेट तुमच्या बँक अकाऊंटमध्ये डिपॉझिट करतो असं सांगून अकाऊंट नंबरबद्दल विचारतात. एकदा नंबर हातात आला की ते त्या व्यक्तीला घेरून लुबाडणूक करतात.

**चिनी घोटाळा**

चीनच्या शान्क्सी प्रांतातल्या झिऑन शहरातला एक कंत्राटदार आणि त्याचा कर्मचारी दोघे विजेत्या नंबरांची तिकिटं म्हणून खुणा केलेली तिकिटं जास्त दराने विकायचे. एकदा चुकून दुसऱ्या एका कामगाराकडे ते खूण केलेलं तिकिट गेलं आणि हा घोटाळा उघडकीस आला. लॉटरी चालकाने ही तिकीटं बनावट असल्याचा निर्वाळा दिला.

शेन्झेन नावाचा लॉटरी चालक काही क्रमांकांच्या चेंडूंना चुंबक लावायचा. साहजिकच

ते चेंडू सोडतीच्या यंत्राच्या वर यायचे. अनुभवाने काही लोकांना त्याची माहिती झाली होती आणि ते त्या नंबरांच्या संगतीवर पैसे लावायचे.

# लॉटरी कोटेशन्स

**थॉमस जेफरसन**

‘‘लॉटरी हे एक हितावह माध्यम आहे, म्हणूनच म्हणावं लागतं की जे फार जाणीवपूर्वक घातक न वागता बक्षिसाच्या अभिलाषेने तिकिटाच्या पैशांची जोखीम घेऊ शकतात त्यांच्यासाठी हा केवळ एक कर म्हणून ऐच्छिकरित्या आकारला जाऊ शकतो.’’

‘‘माझे प्रजाजन लॉटरी खेळत असतील तेव्हा ते एकमेकांचा अपमान करायला विसरतील, एकमेकांशी भांडणतंटा करताना देवाला बदनाम करणंही विसरतील.’’

बायबलमधील उक्ती, १८-१८

‘‘दैवदान आजमावल्याने तंटे स्थिर होतात आणि हाडवैरीही दूर राहतात.’’

डॉ. मनोज शर्मा, विद्यापीठ शाळा, पंजाब विद्यापीठ:

‘‘लॉटरी जर मर्यादेत राहिली तर त्यात वावगं काहीच नाही. या व्यवसायातून उत्पन्न होणारा निधी हा विविध सरकारी योजनांनाच जातो. त्यासाठी सरकारला अन्यथा कर लादावा लागला असता. म्हणूनच लॉटरी म्हणजे मनोविजनातून ऐच्छिक करदान म्हणता येईल.’’

एम. सी. छागला, माजी सरन्यायाधीश

‘‘सरकारच्या अनेक महत्कृत्यांपैकी एक म्हणजे विद्यापीठ. मेक्सिकोतील सर्वात लोकप्रिय वास्तूरचनाकाराने ती बांधली आणि त्याला प्रचंड मोठं आवार आहे.

या विद्यापीठासाठी आवश्यक निधीसंकलन हे राज्य लॉटरीच्या संयोजनातून शक्य झाले. जुगाराचं प्रेम हा दक्षिण अमेरिकी जनतेचा विशेष गुण आहे. आणि इथल्या सरकारने त्यांच्या या वृत्तीचा उत्तम उपयोग करून घेतला आहे. मेक्सिकोच्या माझ्या पहिल्या भेटीनंतर मी नेहरुंना इथळ्या विद्यापीठाबद्दल लिहून कळवलं आणि आपणही लॉटरी सुरू करून असं सुचवलं. आयर्लंडने त्यांची बहुतांश हॉस्पिटल्स उभारली ती लोकप्रिय आयरिश डर्बी स्वीप स्टेक्सच्या नफ्यावर याचीही आठवण मी त्यांना करून दिली. त्यांचा उलटटपाली संदेश आला:‘‘आपल्या देशाला काही परंपरा आहेत आणि राज्य लॉटरी सुरू करून जुगारी प्रवृत्ती जाग्या करणे अनैतिक ठरेल. सरकार अशा प्रयत्नांना चालना देण्याऐवजी त्यावर नियंत्रण ठेवू पाहील आणि शक्य झालं तर थांबवण्याचाच यत्न करील.

मला आनंद वाटतंय की खूप वर्षांनी मी हे लिहितोय, कारण जवळजवळ प्रत्येक राज्याने लॉटरीचे आयोजन केल्याचं मी आता पाहतोय. दुर्दैवाने भारतातल्या लोकांना इतर देशांच्या अनुभवातून काही गोष्टी शिकायला खूप वेळ लागतो. आपण प्रतिबंधाच्या अमेरिकन अनुभवातून काहीएक बोध घ्यायला नकार दिला, परिणामस्वरूप आपला कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाला. उलट भ्रष्टाचार पोलीस आणि वकिलांपर्यंत पोहचला आणि न्याययंत्रणेलाही त्याची धग लागली. इथेही आपण आपली पावलं सुधारून घेतो आहोत, पण कोणत्या किमतीवर?''

**स्व. श्री. अण्णादुराई, माजी मुख्यमंत्री तामिळनाडू**

''विझुन्थाल वीट्टिर्कू, विझाविट्टाल नाटिर्कू'. (खेळाडू जर लॉटरीचा खेळ जिंकला तर त्याचा फायदा होतो, तो हरला तर देशाचा फायदा होतो.)''

**७.४.९९ च्या दी हिंदूमधील संपादकीयातील एक उतारा**

''दोन इतर क्षेत्रही विचारात घेतली पाहिजे. लॉटरीच्या आयोजनाबद्दल टोकाची भूमिका घेणं टाळायला हवं. प्रथम त्याचा आर्थिक अनुषंगाने विचार करू. महत्त्वाची गोष्ट ही की भारतातील सर्व राज्य लॉटरींची सुरुवात ही सामाजिक-आर्थिक उद्दिष्टांनीच झाली आहे. त्याशिवाय रोजगाराच्या दृष्टिनेही लॉटरीचं महत्त्व लक्षणीय आहे. आणि गेल्या काही वर्षांमधला अभ्यास असं सिद्ध करतो की लॉटरीच्या माध्यमातून अपारंपरिक माध्यमातून राज्य सरकारांना महसूल प्राप्त झाला आहे.''

**इकॉनॉमिक टाइम्समधील उतारा, दिनांक १.४.९९**

''केंद्रीय मंत्रीमंडळाने लॉटरीवर आणि देशभरातील जुगारावर बंदी आणण्याचा निर्णय घेतला आहे. संसदेत याबाबतीत हा 'सामाजिक राक्षस' गाडण्यासाठी एकवाक्यताही दिसून येते आहे.

यावर काही विचारमंथन

सरकार उच्च नैतिकतेचा डंका वाजवू शकत नाही. सरकारने स्वत:च अनेक चुकीच्या गोष्टींसाठी लोकांच्या पैशांवर जुगार खेळलेला आहे. सरकारी बँकांच्या पीएसयूज आणि एमपीएजच्या उभारणीतल्या तोट्याला दुसरं काय म्हणणार? दुसरं म्हणजे संसदेने हे लक्षात घेतलं पाहिजे की लोकशाही म्हणजेही एक जुगारच आहे. राजकारणी निवडणुकीच्या स्वीपस्टेकवर आपल्या नशिबाचं दान लावतात. मग आपण आपल्या पैशावर मुक्त जोखीम का घेत नाही. मनोरंजनासाठी जुगार हा नागरी खेळ आहे. तिसरं म्हणजे सरकार जुगारावर बंदी नाही आणू शकत. त्यामुळे भूमिगत पातळीवर

लॉटरी कार्यरत राहील. परिणती ही की गुन्हेगार आणि गुन्हेगारीकरण झालेले राजकारणी पोलिसांच्या सहकार्याने त्याचा फायदा घेतील. खरंच कायदे आपण असे करतोय की त्यामुळे पोलिसांनी अधिकच भ्रष्ट व्हावं. प्रत्यक्षात त्यांनी आपल्या जीव आणि मालमत्तांच्या रक्षणासाठी झटायला हवं. सरकारने ही लॉटरी बंद करण्याऐवजी कायदेशीर करणं गरजेचं आहे. (कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये जुगाराच्या अड्ड्यावरच्या पर्यवेक्षणावर एक उत्तम प्रकरण आहे.) सरकारने या लॉटरीच्या संयोजनातून आर्थिक मिळकत करून ती सामाजिक कामांवर वापरणं गरजेचं आहे. या अशा खोट्या नैतिकतेच्या कल्पनांमुळे आपण मोठ्या औद्योगिक पर्यायाला मुकतो आहोत.''

**श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे विधान. महाराष्ट्र टाइम्स २५.२.९९**

''जर लॉटरी थांबवली तर केवळ महाराष्ट्राचाच महसूल जाणार नाही तर त्यावर अवलंबून असलेली कुटुंबही देशोधडीला लागतील, याची आम्हाला जाणीव आहे. त्यामुळेच आम्ही हे होऊ देणार नाही. आम्ही महाराष्ट्र राज्य लॉटरी सुरूच ठेवू.''

**प्रकाशसिंह बादल, मुख्यमंत्री पंजाब**

**( प्रसिद्धीपत्रक डीपीआर सीएम. ९९/१२३० )**

''सध्याची पारदर्शक यंत्रणेची जागा आता सट्टा आणि मटका घेत आहे. हा बेकायदेशीर जुगार समाजविघातक शक्ती आणि काळा बाजारवाल्यांकडून चालवला जातो. या प्रस्तावित बंदीमुळे बेरोजगारी वाढेल. त्यामुळे राज्य अर्थव्यवस्थेचं शेकडो कोटींचं नुकसान होईल. राज्यातर्फे चालवल्या जाणाऱ्या लॉटरीतून आयकर, सेवाकर यास्वरूपात केंद्र सरकारलाही महसूल प्राप्त होत होता. यु.के.मधील नॅशनल लॉटरी समाजकल्याण, पुरातत्त्व जतन अशा चांगल्या कारणांसाठी निधी पुरवते.''

लालकृष्ण आडवाणी, माजी केंद्रीय गृहमंत्री, २१.१२.९९ रोजी लॉटरी विधेयक सादर करताना केलेले विधान

''लॉटरीतील गैर प्रकारांचा थेट परिणाम समाजातील गरीब घटकांवर होत होता. त्यामुळे सरकारने या वर्गाचं परिनिरीक्षण केलं आणि त्यातून लक्षात आलं की एक आकड्याची तसेच झटपट लॉटरी या प्रकारामुळे अभिलाषेन गरीब वर्गातील अनेक घरांवर परिणाम दिसून आला. सरकारच्या तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांना या अनुषंगाने अनुसरूनही ही दुष्प्रवृत्ती थांबवता आलेली नाही. त्यामुळे केंद्रीय विधीमंडळाने गरिबांच्या संरक्षणासाठी लॉटरी आयोजनाला नियमित करण्यासाठी पावलं उचलण्याचं ठरवलं. लॉटरी नियमन कायदा, १९९८ हा त्याचाच भाग म्हणून संसदेने

संमत केला होता. संसदेत यावर चर्चा होताना दोन्ही सभागृहात लॉटरीच्या प्रतिबंधाला प्रचंड अनुकूलता मिळाली. मुख्यमंत्र्यांच्या परिषदेतही साधारण सर्वसंमतीचा तोडगा असाच होता की लॉटरी कायद्याद्वारे बंद केली जावी.''

**क्रीस रॉलिन्सन, ब्रिटिश ॲथेलिट**

''लोक लॉटरी खेळतात म्हणून माझ्यासारख्या ॲथेलिटला ऑलिम्पिकसाठी तयारी करणं शक्य होतं, हे अनेक लोकांना माहीत नाही.''

**मिशायला ब्रीझ, ब्रिटिश वेटलिफ्टर**

''दर आठवड्याला लॉटरी खेळणाऱ्या लोकांना धन्यवाद. ते माझ्यासारख्या ॲथेलिटला ऑलिम्पिकच्या पदकाचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी मदत करत असतात.''

**एड कुडी, ब्रिटिश रोवर**

''ऑलिम्पिकमध्ये तिनापैकी दोन पदकांसाठी लॉटरीचा निधी कामी येत असतो.''

**तेरसा जोवेल, सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर कल्चर**

''लॉटरी ही विजेते निर्माण करते. ती आयुष्य बदलवते, ती समाज घडवते.''

# लॉटरी टिटबिट्स

लोटोलॉजी : लॉटरी तिकिटांचे संकलन, अभ्यास आणि संशोधन

लोटोलॉजिस्ट : लोटोलॉजीचा अभ्यासक

चिनी किनो हा खेळ 'व्हाइट पिजन गेम' म्हणून ओळखला जायचा. कारण निकाल पाठवण्यासाठी गावागावात कबुतरं धाडली जायची.

लॉटरी हा खेळ नशिबाच्या दानाचा असल्यामुळे इथे अंधश्रद्धाही आहेत. १८९९ साली तेव्हाची लोकप्रिय स्पॅनिश लॉटरी ही त्या शतकातली शेवटची लॉटरी म्हणून काही तरी अपशकुन घेऊन येईल अशी भावना पसरली होती.

पहिला लोटो मॅनिया १७५५ साली नोंदला गेला. इंग्लंडमधल्या तिकीट कार्यालयात पहिल्याच दिवशी हुल्लड झाली आणि लोकांनी कार्यालयाचा दरवाजा तोडून टाकला.

मॅसॅच्युसेट्स लॉटरीच्या 'द गेम' ची उद्घाटनाची सोडत १९७२ साली बोस्टनच्या फॅन्युएल हॉलमध्ये झाली. गमतीचा भाग म्हणजे हा फॅन्युईल हॉल १७००व्या शतकात लॉटरीच्या महसुलातून बांधला गेला होता.

सोळाव्या शतकात इटालियन रिपब्लिक ऑफ जेनोओमध्ये एकूण ९० पैकी ५ सेनेट सदस्यांची निवड केली जायची. नागरिकांनी या ५ सदस्यांची नावं अचूकपणे सांगायची. त्यासाठी त्यांना पिस्तोलाचं (सोन्याचं नाणं) बक्षीस दिलं जायचं. जो पाचही नावं अचूक सांगायचा त्याला जॅकपॉट मिळायचा. पुढे बेनेडेट्टो जेण्टाहाच्या सूचनांनंतर व्यक्तींऐवजी आकडे आले आणि आधुनिक लोटोचा जन्म झाला.

दक्षिण भारतात मध्ययुगात गावातले पंच 'कुडावोलई' या लॉटरी पद्धतीने निवडले जायचे. वोलई अर्थात पाम वृक्षाच्या पानावर उमेदवारांची नावं लिहून ती एका मडक्यात ठेवलेली असायची. त्यातून निवडून सदस्य घोषित व्हायचा.

जॉर्जियाच्या कॅश ३ या खेळामध्ये १९९४ च्या ऑगस्ट महिन्यात लागोपाठ तीन रात्री ५७१ हाच क्रमांक अवतरला होता. त्यानंतर मार्च १९९५मध्ये ७०६ हा क्रमांक लागोपाठ तीन वेळ निघाला होता.

जॉर्जियामध्येच ८८८ हा क्रमांक अनुक्रमे फेब्रुवारी १९९७, फेब्रुवारी १९९८, जुलै १९९९ आणि नोव्हेंबर १९९९ मध्ये निघाला होता.

४४४ हा क्रमांकही नोव्हेंबर १९९४, डिसेंबर १९९७ आणि जून १९९८ मध्ये

अवतरला होता. कॅश ४ या खेळात २२२२ हा क्रमांक मार्च १९९८मध्ये अवतरला तर नोव्हेंबर १९८९ साली ७७७७ हा क्रमांक सोडतीत निघाला होता.

इंग्लंडमध्ये कोका कोलाच्या खपाच्या सातपटीने अधिक खप ऑनलाइन लॉटरीचा होतो.

फेब्रुवारी १९९५ मध्ये मिशिगनच्या लोटो खेळात एका मिनिटात ३९,००० तिकिटं विकली गेली तर एका तासात २२ लाख तिकिटं संपली.

गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या नोंदीनुसार डॅरेन हाक आणि बातेए बे या न्यू साऊथ वेल्सच्या रहिवाशांकडे स्क्रॅच तिकिटांचं सर्वात मोठं संकलन आहे. १९९३ पासूनची फेब्रुवारी २००० सालापर्यंतची ३११३६२ कार्डस् त्यांच्याकडे आहेत.

१९९६ साली उत्तर अमेरिकेतील लॉटरीतून ५२ दशलक्ष डॉलर्सची बक्षिसं रोज वितरित केली जात होती. दर मिनिटाला ३६००० डॉलर्स या लॉटरीतून दिले जात होते.

लॉटरीच्या प्रत्यक्ष सोडतीला अवघे ६० सेकंद लागतात. मात्र सोडतीपूर्व चाचण्या, सोडती पश्चात चाचण्या, चेंडूसंचाची निवड, सुरक्षिततेच्या उपायांचे परीक्षण या व्यवस्थेत ३ तास जातात.

भारतातल्या काही प्रथांनुसार दिवाळीच्या दिवशी जो जुगार खेळत नाही तो पुढच्या जन्मी गाढव बनतो. त्यामुळे दिवाळीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर लॉटरी खेळली जाते. जुगाराऐवजी लॉटरी हा चांगला पर्याय असल्याचं आता मानलं जातं.

नेदरलॅण्डची राष्ट्रीय पोस्टकोड लॉटरीचे तिकीट क्रमांक हे नेदरलॅण्डच्या पोस्टल कोड सिस्टिमवर आधारित असतात. तिकीट पोस्टाद्वारेच थेट पाठवली जातात. एकाच पोस्टल विभागातील विजेत्यांना साप्ताहिक स्ट्रीट प्राइज, जॅकपॉट आणि मेगा समर तसेच नूतन वर्षाचा 'पोस्टकोड कान्जेर' विभागून दिला जातो. विजेते शेजारी एकाच भागात राहात असल्यास त्यांना आणखी काही पारितोषिकंही मिळतात.

ऑस्ट्रेलियातील इन्स्टंट मनी गेममधल्या फ्रॅन्क या बोलक्या कुत्र्याला एका टीव्ही जाहिरातीत १९९३च्या स्पर्धेतला सर्वोत्तम लॉटरी परीक्षक म्हणून घोषित करण्यात आलं होतं.

मे २००४ मध्ये सिडनीत ६० वर्षांच्या एका गृहस्थाने एकाच खेळाची तीन वेगवेगळी तिकिटे वेगवेगळ्या एजंटकडून घेतली. हे तीनही क्रमांक त्या सोडतीचे विजेते ठरले.

अरुबामधल्या रॉड्रिक चिन या गृहस्थाने तीन वेळा (मार्च २०००, जानेवारी २००३

आणि ऑगस्ट २००४) अरुबाचा लोटो लॅकपॉट जिंकला.

स्पेनमध्ये 'नवीदाद' हा खेळ इतका लोकप्रिय आहे की काही कुटुंबांनी एकच क्रमांक ५० वर्षांहून अधिक काळ आरक्षित करून पिढ्यानपिढ्या जपण्याचा निर्धार केला आहे.

एप्रिल २००४ मध्ये पंजाबमधल्या असिस्टंट लाइन्समनच्या पत्नीला बम्पर लॉटरी लागली. या दांपत्याने त्या पैशात त्यांच्या गावातल्या सर्व गरीब मुलींची लग्न थाटामाटात लावून दिली.